म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ५३८

ग्रंथ १०१६

REFBK-0001342
REFBK-0001342



श्री० ब्रह्मनिष्ठ रा. रा. वामनस्वामी सद्गुरु—ग्रंथकार.

जन्म शके १७६०] [मृत्यु शके १८०९ फा. शु. १२

# काव्यकोष.

( यांत—१ भजनमाला, २ श्रीमौनिस्वामिचरित्र, ३ सिद्ध-बोधानुवाद, ४ स्वरूपज्ञानादर्श, ५ रामगीता, ६ श्रुति-स्तवन, ७ षट्पदी, ८ परापूजा-इतकीं काव्यें आहेत. )


ग्रंथकर्ता

ब्रह्मनिष्ठ सद्गुरुमहाराज वामन नानाजी देशपांडे,

कुळकर्णी, सिन्नरकर.

प्रसिद्धकर्ता

पुत्र व शिष्य—श्रीधरशास्त्री हरिदास अग्निहोत्री,

वस्ती श्रीक्षेत्र नासिक पंचवटी—गोदातट हल्लीं मुक्काम मुंबई.



प्रथमावृत्तिः, प्रति १,०००.

रसिक जनांस विनामूल्य अर्पण करण्यास्तव

मुंबईत "निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

हें पुस्तक

तुकाराम जावजी शेट जे. पी. यांनीं धर्मार्थ छापून दिलें आहे.

सन १९१६ शके १८३७.

पब्लिशर—**श्रीधर वामन देशपांडे शास्त्री हरिदास अग्निहोत्री,**
श्रीक्षेत्र नासिक पंचवटी.

---

प्रिन्टर—रामचंद्र येसु शेडगे, नं० २३, कोलभाट लैन,
"निर्णयसागर" प्रेस-मुंबई.

# समर्पण.

श्रीगणेशाय नमः श्रीसरस्वत्यै नमः श्रीसद्गुरुभ्यो नमः
श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः श्रीराधाकृष्णाय नमः
श्रीमातापितृभ्यो नमः ।

॥ गीति ॥

ओव्या पदें अभंगा,
भूपाळी लावणी सुकटिबंध ॥
श्लोका आर्या आर्त्या,
दिंड्या साक्या सवाई विनिबंध ॥ १ ॥
जो पाळणाऽष्टकासह,
भजनमाला असे तया नांव ॥
अर्पण रामा गुरुपदिं,
सज्जनकंठीं वसो हि मद्भाव ॥ २ ॥

# प्रस्तावना.

या सृष्टींत ईश्वरभजनाचे मार्ग अनेक आहेत, परंतु सांप्रतकाळीं सुगम साधन ईश्वराचें नामस्मरण आहे; तद्द्वारा जीवांची चित्तशुद्धि होऊन परंपरा ईश्वरप्राप्तीचा योग अनायासें व्हावा हें उत्तम अधिकाऱ्यास फळ असून, संसारिक जनांसहि पुण्यातिशय होण्याचें साधन परमेश्वराचें नाम आहे; म्हणून भजनमालेची प्रवृत्ति आहे. कोठें कोठें संस्कृत श्लोकांचे अर्थाचें प्रतिवचनाप्रमाणें वृत्त आहे; तें जरी अर्थांतर नाहीं तरी कथोपयोगी साकीवृत्त गोड असतें म्हणून अन्यवाक्य भाषांतर केलें, त्याची क्षमा असावी. या भजनमालेंत ज्या देवतेचें वर्णनाधिक्य आहे; ती ग्रंथकर्त्याची मुख्य देवता; रघुनाथपदाचा अन्वय श्रीराम व गुरु यां उभयांसी आहे; ही कविता स्फुट आहे हिचा करण्याचा प्रसंग नवीन प्रथम आहे, तरी बुद्धिदोषानें अशुद्ध असल्यास सज्जनांनीं क्षमा करावी. अशुद्ध असलेलें कोणीं आम्हांस कळविल्यास पुन्हा सुधारलें जाईल. अज्ञान मुलाचे बोबडे बोल जसे सज्ञान बाप ऐकतो तसे रसिकजन या प्राकृत शब्दांचा स्वीकार करणार समर्थ आहेत.

सर्वांचा कृपाभिलाषी ग्रंथकर्ता,

**वामन नानाजी ( नारायण ) देशपांडे व कुळकर्णी.**

**सिन्नर जि० नाशीक.**

३१०२१

# उपोद्घात.

आमच्या वडिलांनीं हा ग्रंथ केला, हा या कवींनीं केलेल्या पद्यात्मक आठ काव्यांचा संग्रह (भांडार) असल्यानें यास "काव्य-कोष" हें नांव दिलें आहे. १ भजनमाला, ह्यांत बहुतेक सर्वप्रकारच्या छंदांचीं पद्यें रचून ग्रंथकर्त्यांनीं भक्तिमार्ग दाखविला आहे. २ श्रीमौनिनाथचरित्र, ह्या ओंव्या करून गुरुभक्ति व त्यांच्याप्रमाणें सत्कर्म करून मनुष्यदेहाचें सार्थक करावें असा कर्ममार्ग सांगितला. ३ सिद्धबोधानुवाद, ह्यामध्यें बहुतेक प्राकृत श्लोकांचीं वृत्तें घालून, स्वतःसिद्ध असलेला जो बोध म्हणजे ज्ञान त्याचा अनुवाद केला आहे; येणेंकरून ज्ञानमार्ग प्रतिपादन केला. ज्ञान हेंच मुख्य आहे. साधनद्वारा साध्यपर्यवसायी ज्ञानच असल्यानें त्याचेंच दृढीकरण होऊन श्रेष्ठत्व सिद्ध करण्यास्तव पुढें प्रस्तुत कवींनीं पांच काव्यें केलीं. कारण परमनिःश्रेयस मोक्ष, तत्प्रापक ज्ञान आहे. ४ स्वरूपज्ञानादर्श, वृत्तश्लोकबद्धकाव्य, परंतु हें थोडें देहपातामुळें अपूर्ण राहिलें, आणि म्हणूनच कर्त्यांचा नामनिर्देश वगैरे त्याचे शेवटीं आला नाहीं. ५ श्रीरामगीता, हें मूळ अध्यात्मरामायण उत्तरकांडांतर्गत रामगीता हिचें प्राकृत भाषांतर अगदीं श्लोकास श्लोक असें रचलें आहे. ६ श्रुतिस्तवन, हें वेदस्तुति(श्रुतिस्तुति) श्रीमद्भागवत दशमस्कंधस्थित हिचें प्राकृत भाषांतर श्लोकबद्ध केलें आहे. ७ षट्पदी, हें श्रीमदाद्यशंकराचार्यविरचित षट्पदीस्तोत्र-आर्यात्मक, तिचें मराठी भाषांतर आर्यात्मकच आहे. ८ परापूजा हीहि श्रीमच्छंकराचार्यग्रथित संस्कृत श्लोकात्मक अपरोक्षज्ञानजनक उपदेशांचें

महाराष्ट्र भाषेंत श्लोकात्मक वर्णन आहे. अस्तु, याप्रमाणें श्रीमत् तीर्थरूपचरण व मोक्षप्रापक अपरोक्षज्ञानदायक श्रीसद्गुरुवामनस्वामी आपासाहेब महाराज यांणीं परोपकारार्थ हा ग्रंथ केला आहे.

यास्तव सुज्ञांनीं निदान एक वेळ तरी हा समग्र वाचून त्याप्रमाणें कांहीं बोध घ्यावा, व सार्थक करावें; ही हस्तद्वय जोडून परमनम्रतेनें दीनाची सप्रेम प्रार्थना आहे.

सदरहु "काव्यकोष" केवळ परोपकारबुद्धीनें धर्मार्थ छापून देऊन मजला उपकृत केलें; खरोखर, श्रीमान् शेटसाहेब **तुकाराम जावजी चौधरी, जे. पी.** निर्णयसागर छा०चे मालक यांणीं, अशा विश्वयुद्धसंकटसमयीं कागद फार महाग झाले असतांनाहि, बोलल्याप्रमाणें, जरी अडचणी व अडथळे आले तथापि त्यांस न जुमानतां अंगीकृत कार्य पूर्ण केलें ह्या सत्कृत्यानें मजवरच नव्हे तर सर्व वाचकवर्गांवरहि उपकार केले आहेत. श्रीसर्वेश्वर सर्वांचें सर्वप्रकारें कल्याण करो, ही अंतःकरणपूर्वक इच्छा आहे.

सर्वांचा नम्र सेवक प्रसिद्धकर्ता,

**श्रीधरशास्त्री अग्निहोत्री.**

॥ श्रीगजानन समर्थ ॥

# अथ भजनमालाप्रारंभः ।

॥ ओंव्या ॥

श्रीगणेशा मंगलमूर्ती ॥ विघ्ननाशक तुझी कीर्ति ॥ द्यावी मज कविता-स्फूर्ती ॥ भजनमाला रचावया ॥ १ ॥ नमूं आतां सरस्वती ॥ वाग्देवी विद्या-दाती ॥ सिद्धि बुद्धिही नमिती ॥ नवनिधिदायक जी ॥ २ ॥ सर्व देवांस ब्राह्मणांस ॥ वेदादिकां साधुसंतांस ॥ श्रीगुरूस मातापित्यांस ॥ अनंत नमन साष्टांग ॥ ३ ॥ नासिकसमीप ब्रह्मपुरीं सिन्नरग्रामीं ॥ देशस्थ शुक्लयजुर्वेदी नामी ॥ वाजसनेयी माध्यंदिनीय शाखास्वामी ॥ कुळकर्णी देशपांडे वतनदार ॥ ४ ॥ रत्नपारखी उपनाम ॥ ग्रामलेखकाचें काम ॥ मामलतीहि करूनी दाम ॥ बहूत मेळविला ॥ ५ ॥ भारद्वाज गोत्र जयांचें ॥ तीन प्रवरही त्यांचे ॥ भारद्वाज अंगीरस बार्हस्पत्य साचे ॥ ब्राह्मण साधु सत्कुळ ॥ ६ ॥ कुळदैवत मल्लारी ॥ जो नांदे क्षेत्रीं जेजूरी ॥ आणि सप्तश्रृंग गिरीं ॥ देवी दूसरी ॥ ७ ॥ ऐसा श्रेष्ठ सत्कुलजन्म ॥ लाधला भिकाराम शर्मे ॥ स्वार्थ आणि परमार्थ परम ॥ संपादिला जेणें ॥ ८ ॥ शेवटीं घेउनि संन्यास ॥ सिन्नरीं सरस्वतीनदीतटास ॥ सुंदर स्थापूनि समाधीस ॥ ब्रह्मीभूत होय तो ॥ ९ ॥ त्यांचा पुत्र नारायण ॥ नारो भिकाजी तोच मौनी जाण ॥ नारायणेंद्रसरस्वती अभिधान ॥ संन्यास आश्रमांत ॥ १० ॥ साठीं वर्षीं चतुर्थाश्रम ॥ होतां चातुर्मास छत्तीस वर्षें परम ॥ तीन तपें आचरोनि उपरम ॥ शाहाण्णवे वर्षीं ॥ ११ ॥ यांहीं वेदांत प्रकट केला ॥ गांवोगांवीं शिष्यवृंद उपदेशिला ॥ शांकर अद्वैतमार्ग कथियेला ॥ मुक्त केले नरनारी ॥ १२ ॥ पुढेंही व्हावया जगदुद्धार ॥ मुंबईंत श्रीराममंदिर मौनी ठाकुरद्वार ॥ संस्थानीं स्थापुनी शिष्य स्ववंशस्थ सुंदर ॥ जेथें स्थूलसमाधि असे ॥ १३ ॥ हाच नारायण माझा पिता ॥ आणि श्रीस-

द्गुरूहि तत्वतां ॥ म्हणून वामन नानाजी म्हणतां ॥ लोकां हौस वाटे ॥ १४ ॥ माझे सद्गुरू मोक्षदाते श्रीमौनीनाथ ॥ त्यांसी उत्तीर्णता नोहे यथार्थ ॥ तथापि स्वबोधपरिशुद्ध्यर्थ ॥ त्यांचे गुणगण गातसें ॥ १५ ॥ परमगुरू नासिकस्थ भटजी रघुनाथ ॥ इष्ट देवता जानकी रघुनाथ ॥ परात्पर गुरु श्रीदत्त अवधूत ॥ यांचीही स्तुति वर्णीतसें ॥ १६ ॥ श्रीगुरु-दत्त दिगंबर ॥ त्र्यंबकीं देउनि दर्शन सुंदर ॥ उपदेशिती श्रीरघुनाथ भटजीस सत्वर ॥ भटजींचे शिष्य श्रीमौनीनाथ ॥१७॥ श्रीमौनीचे शिष्य अगणित ॥ बहुत ग्रामांत आणि जातींत ॥ थोर थोर ज्ञानवंत कुळवंत ॥ साक्षात्कारी जे ॥ १८ ॥ धोंडभट्टशास्त्री बाळंभट्ट रत्नाकर ॥ आपा जोशी गणेशशास्त्री मालवणकर ॥ शिवराम लेखक अंबुशास्त्री नासिककर ॥ राजारामबुवा निसाळ हरिदास ॥ १९ ॥ श्रीमंत धुंडिराज विनायक विवलकर ॥ केशव बरवे नानासाहेब कोल्हटकर ॥ गोपाळराव पेंडसे नाना पाध्ये काशीकर ॥ सदाशिव कोण्हेर नारायण पंडित ॥ २० ॥ मौनीशिष्य बडोद्यांत रामबुवा वैरागी ॥ त्यांचे शिष्य बापूबोवा व जयकृष्ण विरागी ॥ विश्वनाथजी जामनगरभार्गी ॥ देवकृष्ण ममुमहाराज ॥ २१ ॥ असो आंता विस्तार ॥ सर्वांस माझे साष्टांग नमस्कार ॥ तद्वत् माता यमुनेस साचार ॥ आणि भूतमात्रां ॥ २२ ॥ क्षेत्र काशींत श्रीमौनीस्थान ॥ गंगेसमीप ब्रह्मघाटीं असे जाण ॥ जेणें वंशस्था काशीवास पुण्यप्रमाण ॥ काशीखंडपुराण पहा ॥ २३ ॥ प्रायः देशस्थ निर्मळ गृहस्थांत ॥ भोळे भाविक बहुतेक साधु होत ॥ त्यांतही यजुर्वेद्यांस याज्ञवल्क्य देत ॥ आशीर्वाद ब्रह्मज्ञानाचा ॥ २४ ॥ ही भजनमाला हरिदासादि सर्वांनीं ॥ वाचावी भक्तिभावें आद-रांनी ॥ योग्यतेनुरूप भुक्ति मुक्ति जनीं ॥ जोडे श्रवणीं भक्तिज्ञान ॥ २५ ॥ श्रीशंवंदे ॥

## ॥ पद १ ॥

श्रीगणेशदेव आधिं नमुनी शारदा ॥ रामचंद्र दत्तगुरु स्मरुनि नारदा ॥ ध्रु० ॥ हरिहर विधिरूप दत्त ॥ ध्याती मुनी सदा सुचित्त ॥ दैशीक रघुनाथ मौनी ॥ स्वामी वरदा ॥ १ ॥ साह्य तुमचें चरणरज ॥ स्फूर्ति द्यावी कीर्तनीं मज ॥ दीनानाथ म्हणूनी सांभाळीं ॥ आपुले ब्रिदा ॥ २ ॥ निजानंद पदीं ठेउनी ॥ प्रेमरसा भक्ति देउनी ॥ भवमुक्त करि वामनासी ॥ संत शारदा ॥ ३ ॥

## ॥ पद २ ॥

राम सदय वरद अभय भक्तपावनी ॥ साधुरक्षणार्थ धनु धरियलें करीं ॥ ध्रु० ॥ सीतारमण दुरितहरण ॥ साधकजीवन तुझे चरण ॥ जेणें जीवा भवसिंधुतरण ॥ शरण येउनी ॥ १ ॥ विरहशोकाक्रांत भरत ॥ मुखीं नाम तुझें वदत ॥ त्यासी भेटि द्यावी उचित ॥ स्वपुरिं येउनी ॥ २ ॥ विभो लक्ष्मणासि नीज ॥ रूप लक्षविलें सहज ॥ प्रसन्नविलें तेणें तूज ॥ रामसेवनीं ॥ ३ ॥ भाग्यवंत हनुमंत ॥ तव भक्तियोगें कीर्तिमंत ॥ तेणें पुजीला मूर्तिमंत ॥ स्कंधिं वाहुनी ॥ ४ ॥ निशिदिनीं तव नाम जपत ॥ रामा पवनतनय सतत ॥ कमलनयनीं भजनीं रत ॥ श्रीपद सेउनी ॥ ५ ॥ दशानना पाडिलें रणा ॥ राज्य दिलें बिभीषणा ॥ अंगिकारिं वामना ॥ पदारिं घेउनी ॥ ६ ॥

## ॥ पद ३ ॥

तव कीर्तनीं दे मज प्रेमरे ॥ करुनी कृपाश्रय तमहरणा ॥ ध्रु० ॥ हे गुरुदेवा वडो तुझी सेवा ॥ हेंचि देईं मजला दानरे ॥ जगदुद्धारालागीं समर्था ॥ जगीं धरिला अवताररे ॥ १ ॥ तव सदनीं ज्ञानामृत लक्षुनी ॥ येती याचक द्वारींरे ॥ त्यांसि आपुलें निजगुज देउनि ॥ केले भवनिधिपाररे ॥ २ ॥ त्वंपद तत्पद वाच्य निरसुनी ॥ दाविसी उभयाधाररे ॥ श्रीगुरुचरणरजांकित वामन ॥ झाला स्वरूपाकाररे ॥ ३ ॥

## ॥ पद ४ ॥

रामा धांवरे धांवरे धांवरे ॥ ध्रु० ॥ जानकीरमणा ॥ संकटहरणा ॥ दे मज चरणीं ठावरे ॥ दिनानाथ हे ब्रिदा स्मरुनी ॥ झडकरि मजला पावरे ॥ १ ॥ सुरसुखकरणा मुनिजनस्मरणा ॥ तूंचि सकला आधाररे ॥ सीताकांता हारिं मम चिंता ॥ सन्निध दे मज थाररे ॥ २ ॥ कपिवरवहना दुर्जनशमना ॥ तुजविण सकल असाररे॥ सद्गद भावें तुला नमूनी ॥ वामन तव पद साररे ॥ ३ ॥

## ॥ पद ५ ॥

मौनीनाथ दयाघन स्वामींरे ॥ ध्रु० ॥ दंड कमंडलु भगवीं वस्त्रें ॥ परमहंसदीक्षा धरि स्वीय नामींरे ॥ १ ॥ सुबोधेंकरूनि अनुभव देसी ॥ ब्रह्म-

रूप शिष्य मोक्षगामींरे ॥ २ ॥ तव कृपेची छाया वामनासी ॥ वास घडो तव पदधामींरे ॥ ३ ॥

॥ पद ६ ॥

दिनींदिनीं दिनींरे दर्शन देईं रामारे ॥ ध्रु० ॥ रामा तुझें पाहुनि मुख ॥ डोळां विश्रांति होय सुखधामारे ॥ १ ॥ मायापाशें गुंतुनि श्रमलों ॥ रामसेवक मला कारिं कामारे ॥ २ ॥ तव पदकमलमकरंदभृंग हा ॥ वाली रुंजी वामन जयरामारे ॥ ३ ॥

॥ पद ७ ॥

ठेवीं ठेवीं ठेवींरे मस्तक गुरुपायींरे ॥ ध्रु० ॥ मना त्यासिच शरण गेलिया ॥ तुटे लक्ष्यचौऱ्यांशीं योनीफेरींरे ॥ १ ॥ निजगुज देऊनी समरस करिती ॥ जोडे पुमर्थ तत्काळ येचि देहींरे ॥ २ ॥ तत्पद सेउनी तल्लिन राहीं ॥ त्याविण वामना गति नाहींरे ॥ ३ ॥

॥ पद ८ ॥

तारिं तारिं तारींरे दयाळा रामरायारे ॥ध्रु०॥ दुस्तर भव हा दुर्गम वाटे ॥ कशी गति माझी होईल वारिं मायारे ॥१॥ अचपल मन हें दुःसह माझें ॥ विपयासंगें भ्रमत अनुपायारे ॥ २ ॥ वामनदासा भवांतुनी काढीं ॥ देउनियां देवा तव दिव्य पायांरे ॥ ३ ॥

॥ पद ९ ॥

दाविं दाविं दावींरे श्रीगुरू तुझे पायरे ॥ ध्रु० ॥ पायासाठिं भाविक भक्तें ॥ लोटांगणें सिणविला अपुला कायरे ॥ १ ॥ शरण आलिया समुळची भवतीं ॥ तनमनधन संसार जेणें जायरे ॥ २ ॥ भुलुनी त्यांसिच निजजन धरिती ॥ पायांवांचुनि वामन निरुपायरे ॥ ३ ॥

॥ पद १० ॥

रामा तारक तुझे पाय ॥ ध्रु० ॥ स्थिरचर व्यापुनी अगणित उरले ॥ माया लाजुनी जाय ॥ १ ॥ जो भवरोगें ग्रस्त तयासी ॥ औषध तीर्थ उपाय ॥ २ ॥ स्पर्शें मुक्तचि गौतमजाया ॥ होउनि भवना जाय ॥ ३ ॥ अमरचि झाला सेउनि मारुती ॥ सागर उतरुनि जाय ॥ ४ ॥ भवपाशांतुनी सोडवीं वामना ॥ कौतुक पहासी काय ॥ ५ ॥

## ॥ पद ११ ॥

श्रीगुरु पावन तुझे पाय ॥ ध्रु० ॥ सकलां पावन करिती तीर्थें ॥ त्यां पावन हे उपाय ॥ १ ॥ भूषण मानुनि श्रीभगवंतें ॥ लोकीं मिरवी काय ॥ २ ॥ ज्याच्या प्रतापें पापतापदैन्य ॥ तत्क्षणीं नासुनि जाय ॥ ३ ॥ कामादिक रिपू राक्षसकुळ हें ॥ जेणें निवटुनि जाय ॥ ४ ॥ वामन सेवक ठेउनि मस्तक ॥ वंदित लवउनी काय ॥ ५ ॥

## ॥ पद १२ ॥

सुंदर रूप चला पाहूं ॥ दर्शन रामाचें घेऊं ॥ ध्रु० ॥ दिनानाथ दीनबंधु ॥ जानकीनाथ कृपासिंधु ॥ जयाचा चरणतीर्थबिंदु ॥ शुष्क करिल हा भव-सिंधु ॥ १ ॥ सुहास्यवदना पाहुनि घेणें ॥ मना विश्रांति होय जेणें ॥ जन्म-मरण आणि विघ्नतापा ॥ भस्म करिल सर्व दैन्यपापा ॥ २ ॥ धन्य हनुमंत दास ज्याचा ॥ मुनी वाल्मीक भाट त्याचा ॥ अनुदिनीं वामना रक्षीं रामा ॥ भक्तकैवारि पूर्ण कामा ॥ ३ ॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

## ॥ पद १३ ॥

पावन पाय चला पाहूं ॥ देशिकसदनाप्रति राहूं ॥ ध्रु० ॥ राहिल्या गुरुकृपेचेनि कोडें ॥ निष्काम पुण्य पदरीं जोडे ॥ पुण्यें अंतःकरणशुद्धी ॥ तया उपजे मोक्षबुद्धी ॥ १ ॥ मुमुक्षु तीव्र अनुतापें ॥ शरण जाय गुरु मायबापें ॥ सद्गुरुराय दयाभरित ॥ जीवात्मैक्यबोध करित ॥ २ ॥ सच्चित्सुख ब्रह्मलक्षी ॥ प्रतीति तीन्ही देउनि साक्षी ॥ प्रगटोनि तीव्र बोध-भानु ॥ गत अज्ञान तम काय वानुं ॥ ३ ॥ जीवन्मुक्त करी जो कां ॥ कृत-कृत्य होय मुक्त शोका ॥ अनुदिनीं वामन लक्षि पायां ॥ उपेक्षा नसे गुरु-राया ॥ ४ ॥ जय जय गुरुधीर समर्थ ॥

## ॥ पद १४ ॥

राम दयाघन रघुपति राघव ॥ दे चरणाश्रय देव निरंजन ॥ ध्रु० ॥ हे मुनिरंजन दशरथनंदन ॥ संसृति दुर्धर निरसुनि उद्धर ॥ १ ॥ राजीव-लोचन पापविमोचन ॥ धांव सितापती हे सुखसागर ॥ २ ॥ कामादि तस्कर दुस्तर दूर कर ॥ वामन दास विनवी कृपा कर ॥ ३ ॥

## ॥ पद १५ ॥

करिं कृपा गुरु देव दयानिधे ॥ मम जीवन दे निजपदसेवन ॥ ध्रु० ॥

विषय सवासन दुर्घट मम मन ॥ श्रवण मनन दे जें सुखसाधन ॥ १ ॥ बोधसुधारस देउनि गहन ॥ शांत करीं मज हे तमहरण ॥ २ ॥ चरण-रजातुरसेवक वामन ॥ तव कृपेविण सर्व असाधन ॥ ३ ॥

॥ पद १६ ॥

आदिपुरुषा निर्गुण रामरायारे ॥ शेषवाणी कुंठित गुण गायारे ॥ ध्रु० ॥ तूं अद्वय सच्चिदानंद मूर्तिरे ॥ वेदशास्त्रें वर्णिती तुझी कीर्तिरे ॥ १ ॥ तूंचि सर्व नियंता जगपाळारे ॥ ब्रह्मादिकां वर्तक ज्ञानकळारे ॥ २ ॥ उभा विराट न होय सर्व जडरे ॥ ज्ञानकळेवांचूनि अवघडरे ॥ ३ ॥ स्वादु स्वादु भोग हे चर्मखंडारे ॥ देह भिंत चालवी दुडदुडारे ॥ ४ ॥ दीनबंधु दयाळा दीनानाथारे ॥ तुझे चरणीं वामन ठेवी माथारे ॥ ५ ॥

॥ पद १७ ॥

सीता माता चित्कळा आदि मायारे ॥ जीचा अंत न कळे आदितेयारे ॥ ॥ ध्रु० ॥ ब्रह्मादिकां आश्रय हीच शक्तीरे ॥ सृष्टिकार्या करणें यथायुक्तीरे ॥१॥ सर्व भूतें नाचवी निजसूत्रींरे ॥ खान पान व्यवहार एकतंत्रींरे ॥ २ ॥ ज्याच्या योगें करित नाना खेळरे ॥ त्यासि अलिप्त ठेउनि निर्मळरे ॥ ३ ॥ तच्छक्ती आश्रय जया सोडिरे ॥ कृतिकार्या असमर्थ घडामोडीरे ॥ ४ ॥ जीचें रूप सुंदर दिव्य कायारे ॥ ठेवी मस्तक वामन तिचे पायांरे ॥ ५ ॥

॥ पद १८ ॥

सीते पालक माझी माय ॥ पालक० ॥ ध्रु० ॥ बोधपयातें पाजुनि माते ॥ तृप्तिसुखें मन धाय ॥ १ ॥ भक्तिपाळण्यामध्यें घालुनी ॥ स्वरूपीं निजउनि गाय ॥ २ ॥ विरागऔषध देउनि मजला ॥ भवरोगनष्टउपाय ॥ ३ ॥ कामादिक हे खेळगडी मज ॥ विटंबुनि मारिति घाय ॥ ४ ॥ शांतिभातुका प्रेमरसें मज ॥ वामना दे तव पाय ॥ ५ ॥

॥ पद १९ ॥

मायिक फल्गु प्रपंचविलास ॥ ध्रु० ॥ अघटित घटना कुशला माया ॥ विद्याअविद्यारास ॥ मा० ॥ १ ॥ जैसी विद्या तैसी अविद्या ॥ स्वरूपीं मिथ्या भास ॥ मा० ॥ २ ॥ द्वादश कल्पें शोधुनि पहातां ॥ शेखीं मोघचि खास ॥ मा० ॥ ३ ॥ धन सुत जाया दाउनि भुलवी ॥ पुरुषा लावुनि आस

॥ मा० ॥ ४ ॥ सुखसाधन हें विषयोपार्जनीं ॥ करि जीवा परवश दास ॥ ॥ मा० ॥ ५ ॥ नाना छंदें विषयविलासें ॥ सकल वयाचा नाश ॥ ॥ मा० ॥ ६ ॥ अभ्रासम हे जाती येती ॥ पाहुनि जीव उदास ॥ मा० ॥ ७ ॥ हरहर जीव हे विषयचि इच्छिती ॥ न सुटे आशापाश ॥ मा० ॥ ८ ॥ रामप्रसादें भवनिधि तरणें ॥ धरुनि श्रीगुरुकांस ॥ मा० ॥ ९ ॥ रामा तव पद दाउनि निरसीं ॥ संसृतिभ्रमअध्यास ॥ मा० ॥१०॥ मायाधीशा तव पदकमलीं ॥ वामनभृंगनिवास ॥ मा० ॥ ११ ॥

## ॥ पद २० ॥

नमितों गुरुराया गुरुराया ॥ सदृढ धरुनी पाया ॥ ध्रु० ॥ मौनिनाथ सद्गुरुस्वामी ॥ समाधी अद्वय निजसुखधामीं ॥ १ ॥ भयकृत भवसमुद्र भारी ॥ तूं नाविक भक्तिनौके मज तारीं ॥ २ ॥ तव ज्ञानामृतप्लुत वाणी ॥ तूं तर स्वात्मसुखाची खाणी ॥ ३ ॥ तूं चिद्रूपबोधतरणी ॥ जीवशिव-द्वैतभेदतमहरणीं ॥ ४ ॥ तूं सच्चिदानंदरूप जननी ॥ वामना रंजवीं तव सुखसदनीं ॥ ५ ॥

## ॥ पद २१ ॥

शंभू हरहररे हरहररे ॥ भक्तिमुक्तिचा संकर तो एक शंकररे शंकररे ॥ ध्रु० ॥ देहत्रय त्रिकुटाचळीं पावला ॥ अहंरूपी मठ बांधिला ॥ करुनी सखा जीव तेथें राहिला ॥ माया गिरिजेवर रूसला ॥ निजरूपीं समाधि करुनि बैसला ॥ साक्षी पर शिव नाम पावला ॥ शंभू० ॥ १ ॥ आत्म-लिंग हें हृदयीं धरुनी ॥ ऐक्यभावें गळा बांधुनी ॥ शिव शिव ऐसें मुखीं स्मरुनी ॥ सोहं सोहं शंख फुंकुनी ॥ निजभक्त तया असें भजूनी ॥ प्रसन्न वदनें वरा देउनी ॥ शंभू० ॥ २ ॥ लाउनि विरागभस्म कपाळीं ॥ राम राम जप करी कपाली ॥ शांतिगंगा शिरीं राहिली ॥ तिणें जीवाचीं पापें हरिलीं ॥ नरतनु दुर्लभ संध्याकाळीं ॥ दर्शन वामना देउनि पाळीं ॥ ॥ शंभू० ॥ ३ ॥

## ॥ पद २२ ॥

तो एक सेवकरे सेवकरे निःसीम रामउपासक ॥ ध्रु० ॥ रामप्रतापा साह्य करावें ॥ शक्त हनुमंतरूप धरावें ॥ स्वामिभक्तिगौरवा करावें ॥

भक्तिशक्तिनें उदधि उडावे ॥ सीताशुद्धीलागिं करावें ॥ दुर्घट दैत्यगर्व हरावे ॥ द्रोण पर्वता स्वाम्यर्थ आणावें ॥ अवचट पराक्रमा करावें ॥ मारुती तो ए० ॥ १ ॥ विना द्रव्य विश्वासू चाकर ॥ देणें नलगे पोटा भाकर ॥ स्वामिकार्यप्रयत्नीं सादर ॥ स्वार्जित खाउनि फलमूल सुंदर ॥ पादसंव्हना करी निरंतर ॥ हस्त जोडुनी सन्निध हाजर ॥ न गणुनि प्राणा युद्धधुरंधर ॥ करुनी सर्व प्रकारें तत्पर ॥ मारुती तो ए० ॥ २ ॥ एकनिष्ठ ब्रह्मचर्य धरावें ॥ अनुदिनीं सेवातपा करावें ॥ रामविग्रहा स्कंधीं वाहावें ॥ त्याचे स्वरूपा हृदयीं स्मरावें ॥ रामराम मुखीं जपा वदावें ॥ भक्तिमुक्तिसंगमीं रमावें ॥ भक्त भाविकां हिता खपावें ॥ तत्पदलीन वामना करावें ॥ मारुती तो एक सेवकरे० ॥ ३ ॥

## ॥ पद २३ ॥

राजा मल्लारि मल्लारि ॥ दे मज निजानंदवारि ॥ ध्रु० ॥ देह जेजुर गड पर्वती ॥ नांदसी पर शिवरूपें वरती ॥ १ ॥ सद्भंडारयुत तव काया ॥ डवडवली हे खंडेराया ॥ २ ॥ तुझें वाहन सोहं घोडा ॥ पायीं भक्तिमुक्तीचा जोडा ॥ ३ ॥ तव विरागमंदिल शिरीं ॥ धरिलें बोधखड्ग हें करीं ॥ ४ ॥ अज्ञानमल्ल असुरां ॥ मर्दुनि सुख दे साधक सुरां ॥ ५ ॥ तव समाधी विद्या जाया ॥ वाणाई म्हाळसा सेवित पायां ॥ ६ ॥ दे विषयोपराम कुत्रा ॥ साह्य वामना दर्शनयात्रा ॥ ७ ॥

## ॥ पद २४ ॥

सप्तश्रृंगनिवासिनी देवी ॥ निजभक्ता वांछित फलदे ॥ ध्रु० ॥ अष्टादशभुजप्रभावें ॥ शोभतसे निजअंगा ॥ सरल सुनासिक दृष्टि ॥ भक्त विलोकनसंगा ॥ गोंधळी गोंधळा करिती ॥ रंगणिये निजरंगा ॥ ॥ चाल ॥ तव भजनें मनोरथ पुरती ॥ पाप ताप दैन्य तयांचें हरती ॥ अतिदुर्घट भवनदी तरती ॥ चंडिके अनाथा गति दे ॥ नि० ॥ १ ॥ दासअनुग्रहविलासा ॥ करि निर्जन पर्वतवासा ॥ तव पूजनजप जे करिती ॥ मनीं धरुनि न फलआशा ॥ देऊनि सद्गती त्यांतें ॥ मुक्त करी भवपाशा ॥ ॥ चाल ॥ त्रिगुणरूपिणी जगदंबे ॥ करिं निर्जररक्षण अंबे ॥ निवटुनि शुंभनिशुंभे ॥ सज्जना पाळुनि सुख दे ॥ नि० ॥ २ ॥ वैष्णवी शैवी दुर्गा ॥ कालिका सुभद्रा माया ॥ शांभवी मम कल्याणी ॥ दे शक्ती तव गुण गाया ॥

वारुनि त्रिविध तापां ॥ दे आश्रय मज तव पायां ॥ चाल ॥ हरिहरविधि तव शक्ति समर्थ ॥ त्वत्कृपें साधिति निजस्वार्थ ॥ अनन्य भजे जो दे त्यासी पुमर्थ ॥ अंबिके वामना वरदे ॥ निजभक्ता० ॥ ३ ॥

## ॥ पद २५ ॥

भज मन विठ्ठल विठ्ठलरे ॥ ध्रु० ॥ वैकुंठवासी वसे पंढरीसी ॥ नामें जग तरलेंरे ॥ १ ॥ निजभक्तांसाठीं देव जगजेठी ॥ भूलोकीं अवतरलेंरे ॥ २ ॥ न टळेचि व्रीदा पुंडलीक वरदा ॥ भावें अनुसरलारे ॥ ३ ॥ वामनदास म्हणे हरिदास ॥ अनुषंगें भव तरलेरे ॥ ४ ॥

## ॥ पद २६ ॥

शेपशायी गोकुळीं अवतरले ॥ ध्रु० ॥ भूगोब्राह्मण करुनि संरक्षण ॥ राक्षसकुळ हरलें ॥ १ ॥ नंद यशोदा करितां धंदा ॥ नवनीत मुखीं भरलें ॥ २ ॥ मुनिजन–योगी गोपीजन–भोगी ॥ अनुषंगें भव तरले ॥ ३ ॥ पांडवपाळण कौरवहेळण ॥ द्रौपदीदुःख हरलें ॥ ४ ॥ भक्तकैवारि कृष्ण मुरारि ॥ वामन मनीं भरले ॥ ५ ॥

## ॥ पद २७ ॥

वद वद वद रसने दत्त दत्त दत्त दत्त ॥ ध्रु० ॥ अत्रिअनुसूयात्मज ॥ त्रिगुणात्मक मूर्ती अज ॥ भक्ताभयवरद सहज ॥ स्तवुनि शुद्ध चित्त ॥१॥ भस्मासित दिव्य कांती ॥ त्रिशूळ डमरू धरिले हातीं ॥ गळां माळ वैजयंती ॥ स्मरुनि सावचित्त ॥ २ ॥ औदुंबरवृक्षछाया ॥ तेथें वास करुनि काया ॥ संत रक्षि दाउनि माया ॥ नमुनी सुचित्त ॥ ३ ॥ अवधूत अन्यरूपें गुप्त ॥ अभक्त डोळां पाहुनि सुप्त ॥ साधक सुमनें भाउनि तृप्त ॥ वामनैकचित्त ॥४॥

## ॥ पद २८ ॥

मंगल मूर्ति गजवदना ॥ तव पदाश्रय दे मजला ॥ ध्रु० ॥ स्वामी चतुर्भुज एकदंता ॥ लंबोदर व्यापक अनंता ॥ अभयवरद भगवंता ॥ द्वैमातुर गणराया ॥ मं० ॥१॥ शुंडादंडविराजित काय ॥ मूषकवाहना सुरपतिराय ॥ विघ्ननाशक तव गणपति पाय ॥ दयाघन यशदाता ॥ मं० ॥२॥ कार्यारंभीं तुज पुजिती ॥ स्तुती वंदनादि जन करिती ॥ जन्ममरणरूप भवा तरती ॥ दे दर्शन वामनदासा ॥ मंगल० ॥ ३ ॥

॥ पद २९ ॥

कैलासनायक दिनानाथ ॥ शिव शंकर भोला ॥ ध्रु० ॥ प्रभू परमेश्वर वृषवहना ॥ भस्मसिततनु पन्नगभूषणा ॥ शितिकंठ सांब अघहरणा ॥ तव पदाश्रय दे मजला ॥ १ ॥ पिनाक धनु करीं कृत्तिवासा ॥ शिरिं स्रवतसे गंगा जगदीशा ॥ त्रिलोचना महादेव ईशा ॥ शोभवी मस्तकीं जटाजूटा ॥ २ ॥ मुनी हृत्पद्मकोश सुखशयना ॥ भक्ता अभय वरद ईशाना ॥ जीव अज्ञान भ्रम तमहरणा ॥ वंदी वामन तव चरणा ॥ ३ ॥

॥ पद ३० ॥

शेषशायी लक्ष्मीकांत ॥ क्षीरसागरवासी ॥ ध्रु० ॥ विभो करुणाकर मेघश्याम ॥ चतुर्भुज पीतवसन अभिराम ॥ श्रीवत्सलांछन हृदयीं सुखधाम ॥ माधवपदाश्रय दे मजला ॥ १ ॥ शंख चक्र गदा पद्म करिं धरिले ॥ कंठिं वैजयंती कौस्तुभ पदक गमलें ॥ शिरिं रत्नमुगुट दिशीं तेज भरलें ॥ गरुडासन जगज्जीवना ॥ २ ॥ जगदुद्धारास्तव रूप साकार ॥ घे अंबरीषकारण दश अवतार ॥ देवा आश्रय देउनि दैत्यां मार ॥ भवपार करीं वामनदासा ॥ ३ ॥

॥ पद ३१ ॥

देव नारायण सविता ॥ तव पदाश्रय दे मजला ॥ ध्रु० ॥ जगभासक तव प्रकाश ॥ सर्वां आश्रय कार्यविलास ॥ चतुर्विध पुरुषार्थां उल्लास ॥ अघनाशक सुखकिरणा ॥ १ ॥ उदयाचलीं दिव्य मूर्ती ॥ सप्ताश्वरथी मंडल ज्योती ॥ आदित्य तुज ब्राह्मण ध्याती ॥ हे दिनकर तमहरणा ॥ २ ॥ हरिहरविधिरूप ईशा ॥ करि जगजनिस्थितिनाशा ॥ छेदुनी वामनभवपाशा ॥ त्रिगुणात्मक आदिरूपा ॥ ३ ॥

॥ पद ३२ ॥

लक्ष्मी क्षीराब्धितनया ॥ देवी मूळ माया ॥ ध्रु० ॥ मनीं धरुनी तव प्रेक्षालव आस ॥ करिती मुनिवर उग्र तपास ॥ करुनि योग बहू सायास ॥ जनीं उदास तुजसाठीं ॥ १ ॥ सहेतुक करिती तव जयकार ॥ त्यां फल देउनी तूं करिं उपकार ॥ निष्काम भक्तां करुनि भवपार ॥ देउनि अक्षय अपवर्गा ॥ २ ॥ जगकारण तूं पालक कमले ॥ सर्वनियामक चालक विमले ॥ तव पदिं वामन बालक रमलें ॥ मायात्रिगुणात्मकरूपा ॥ ३ ॥

## ॥ पद ३३ ॥

रामा निर्गुण तूं भगवान ॥ मायामानुषरूपा ॥ ध्रु० ॥ श्यामसुंदरतनु आकर्णनयना ॥ सरल नासिक सुहास्यवदना ॥ आजानुबाहो कोमल-चरणा ॥ चापशरांकित रघुवीरा ॥ १ ॥ रावणें लोकां केला अपकार ॥ त्या मारुनि तूं केले उपकार ॥ भक्तां सुखी करुनि जयजयकार ॥ दिनजन-संकटहरणा ॥ २ ॥ हे मुनिमानसचकोराचंद्रा ॥ जानकीजीवन सुमन-भद्रा ॥ कपिवहन ईश रामचंद्रा ॥ वंदी वामन तव चरणा ॥ ३ ॥

## ॥ पद ३४ ॥

नारायणस्वामी श्रीगुरुराज ॥ करूं वंदन तव पायां ॥ ध्रु० ॥ तव पद-दर्शन निजध्यास ॥ निशिदिनिं होतें मन उदास ॥ होतो सकल वयाचा नाश ॥ म्हणुनी पदाश्रय दे मजला ॥ १ ॥ हे करुणाकर दीनदयाळ ॥ मी अपराधी परि तुझा बाळ ॥ क्षमा करुनी तूं कारिं प्रतिपाळ ॥ क्षमा-सागरा गुरुवर्या ॥ २ ॥ विभो सच्चिदानंदधामा ॥ भक्तकैवारि पूर्णकामा ॥ भाविक जनमनअभिरामा ॥ वामन दास प्रार्थितसे ॥ ३ ॥

## ॥ पद ३५ ॥

जगदीश्वरा व्यंकटेशा ॥ तव पदाश्रय दे मजला ॥ ध्रु० ॥ वैकुंठनायक व्यंकटरमणा ॥ करि जगजनिस्थितिरक्षणा ॥ करुणाकर मम संकट-हरणा ॥ भक्तां पावन बालाजी ॥ १ ॥ शिरीं मुगुट गळां रत्नमाळा ॥ कटीं पीत वसन रत्नमेखळा ॥ दे स्मित मुखदर्शन भक्तांला ॥ विभो स-च्चिदानंदरूपा ॥ २ ॥ शंख चक्र तूं करीं धरिले ॥ भूगोब्राह्मण संत पाळिले ॥ मकरध्वजरूपा कामें वरिलें ॥ वंदी वामन तव पायां ॥ ३ ॥

## ॥ पद ३६ ॥

नृसिंहनारायण भगवान ॥ तव पदाश्रय दे मजला ॥ध्रु०॥ हिरण्यकश्यपें प्रल्हाद छळिला ॥ भक्तरक्षणीं तूं अनुसरला ॥ स्थिरचर व्यापुनी जगीं भरला ॥ फोडुनी स्तंभ अवतरला ॥१॥ संध्याकाळीं तूं सभाद्वारीं ॥ वज्रनखीं उग्र नर-हरी ॥ वक्ष विदारुनि असुर मारीं ॥ केलें निर्भय देवगणा ॥२॥ प्रसीद ह्म-णुनी तुज स्तविलें ॥ आलिंगुनी लक्ष्मीभया हरिलें ॥ प्रल्हादा अभिषेकीं योजियलें ॥ वामनदास वंदी चरणा ॥ ३ ॥

## ॥ पद ३७ ॥

माझें कुलदैवत हो राम ॥ तच्चरणसरोजीं मन लागो ॥ध्रु०॥ अभिनवरूप करीं धनु साजे ॥ दशमुखकंदन सुमनसकाजे ॥ अघटित त्रिभुवनीं कीर्तिकारणा ॥ अवतरलें सुख धाम ॥ १ ॥ धवधवतेज जयाचें पाहूं ॥ मनोहर दर्शन पावन घेऊं ॥ सुंदरनवनवउत्सवपारणा ॥ मन रमलें अभिराम ॥ ॥२॥ निशिदिनीं ध्याती योगी जयातें ॥ वाल्मीक गाय रामायण त्यातें ॥ वामनदास इच्छित तत्पादसेवना ॥ हृदिं भरलें जयराम ॥ ३ ॥

## ॥ भजन ॥

दिनानाथ हे देव समर्था वंदन तव चरणा ॥ रामा सच्चिद्घन सुखरूपा मुनिजनमनरमणा ॥ १ ॥ रघुराज समर्थ ॥

## ॥ पद ३८ ॥

मौनीनाथगुरुचरणसरोजा स्मर वारंवार ॥ अनन्यभावें शरण गेलिया त्या करि भवपार ॥ ध्रु० ॥ जगदुद्धारालागीं समर्थें धरिलें अवतारा ॥ त्रिभुवनसुंदर कीर्ति जयाची त्यजिलें संसारा ॥ विषवत् विषय सवासन टाकुनी गृहसुतधनदारा ॥ साधन बोधन सुगम जयाच्या युक्ती अनिवारा ॥ १ ॥ सच्चिद्घन सुखरूप जयाचें सज्जनसुख-धाम ॥ अधिकारासम करी अनुग्रह संतपूर्णकाम ॥ अखंड रामीं वृत्ती उन्मन समाधिविश्राम ॥ अशन शयन व्यवहारीं वर्ततां वदे ईशनाम ॥ २ ॥ अभिनव विग्रह साकार जयाचा यती वेषधारी ॥ दंडकमंडलुधारण पुस्तकसंग्रह बहुवारी ॥ स्वानंदसुखाचा दाता श्रीगुरु साधकश्रमवारी ॥ रघुनाथ गुरुतत्त्व जयाचें पावन अधिकारी ॥ ३ ॥ भक्ति ज्ञान विरागें पूर्ण स्वरुपीं निवास ॥ नवविधभक्तिमहिमा ईश्वरभजनीं उल्लास ॥ प्रपंचउपरमकारण धरिला विद्वत्संन्यास ॥ ब्रह्मसनातन दैशिक त्याची वामन धरि कांस ॥ ४ ॥

## ॥ भजन ॥

मौनीनाथ गुरुदेव समर्था वंदन तव चरणा ॥ सच्चिद्घन सुखरूप दयाळा दिनजनभवहरणा ॥ १ ॥ गुरुराज समर्थ ॥

## ॥ पद ३९ ॥

प्रातःस्मरा तुम्ही रघुपति रामहो ॥ दुर्लभ नरदेहीं भजा पूर्णकामहो ॥

ध्रु०॥ कलियुगीं साधन स्वल्प एक नामहो ॥ तप यज्ञ कर्मादिकां येथें नाहीं कामहो ॥ १ ॥ अष्ट याम घड्या जाती संसाराच्या कामाहो ॥ एक घडी नाम स्मरणें शुद्ध सर्व यामहो ॥ २ ॥ अजामीळवाल्मिकादिकां तत्त्व नाम हो ॥ वामन दास म्हणे तुम्ही मुखीं जपा राम हो ॥ ३ ॥

॥ पद ४० ॥

करिं सत्संग संसृतिभंग ॥ हो गुरुराजपदाब्जीं भृंग ॥ ध्रु० ॥ सेउनि ज्ञानामृतमकरंद ॥ मुक्त करि भवबंद ॥ धरि भक्तिज्ञानविरागी छंद ॥ उपासुनि जगदानंद ॥ गुरु मुक्तिलतेचा कंद ॥ हा केवळ सच्चिदानंद ॥ चाल ॥ जो संतुष्ट सदा भगवान् ॥ जो निष्पक्ष निरअभिमान ॥ जो अधिकाऱ्या मोक्ष निदान ॥ धरुनि तया आनुषंग ॥ १ ॥ कृपाअनुग्रहविलासा ॥ या जगीं करितसें वासा ॥ शरण जाउनी सन्निध आसा ॥ जो कदा नुपेक्षी दासा ॥ सोडुनि ही विषयदुराशा ॥ करुनि मना अवकाशा ॥ चाल ॥ जयीं शम दम करुणा विलासे ॥ जणुं कल्पवृक्ष समान विकासे ॥ जया अभय वरद ब्रिद आसे ॥ टाकुनि दुर्जनसंग ॥ २ ॥ जो करि तत्त्व उपदेशा ॥ प्राप्ति तशी जगदीशा ॥ करि अंतरिं ज्ञानप्रकाशा ॥ चिदचिद् ग्रंथीं खुलासा ॥ वासनाक्षय करवि मनोनाशा ॥ समाधियोगाभ्यासा ॥ ॥ चाल ॥ देउनि अक्षय साधका पुमर्थ ॥ अपणापरि तात्काळ समर्थ ॥ यत्कृपें वामना घडे परमार्थ ॥ प्रेम धरि अंतरंग ॥ हो गुरुराजपदाब्जीं भृंग ॥३॥

॥ पद ४१ ॥

कलेवर काळाचें खाजें ॥ त्या म्हणसी तूं माझें माझें ॥ ध्रु० ॥ आधिव्याधिपीडेनें गाजे ॥ वरवर सुंदर हें माजें ॥ १ ॥ पुनरपि मी हें असें वाजे ॥ वदतां वाणी कशी न लाजे ॥ २ ॥ अहं मम घडि घडि याला जे ॥ वदसी परि एक न साजे ॥ ३ ॥ तुजहुनि असें जरी दूजें ॥ परि मीमी कोण हे न सुजे ॥ ४ ॥ वामन म्हणे हो या काजें ॥ शरण जावें हो श्रीगुरुराजें ॥ ५ ॥

॥ पद ४२ ॥

मनीं भरला राम ॥ सर्वा उपरंजक ॥ध्रु०॥ पिंडब्रह्मांडचराचर व्यापुनी ॥ जनीं वनीं अवघा एक ॥१॥ घटिं मृत् पटिं सुत जसें अनुस्युतची ॥ बाह्यांतरिं व्यापक ॥२॥ अस्तिभातिप्रियरूप हाचि रामदेव ॥ नामरूपा प्रकाशक ॥ ३ ॥

दृश्य द्रष्टा दर्शन त्रिपुटि गेली लोपून ॥ सारें ब्रह्मकौतुक ॥ ४ ॥ वामनदास म्हणे ऐसी स्थिती यत्प्रसादें ॥ धन्य गुरुनायक ॥ ५ ॥

॥ पद ४३ ॥

कांरे मना राम नाठविसी ॥ध्रु०॥ परमपुरुषदेव सच्चित्सुखघन ॥ विसरुनी विषयांमधीं रमसी ॥ अंतरा ॥ वासना वमनासम जाणुनी ॥ चंचल गतीहि सोडिं मना दुर्गमना ॥ वृथा भ्रमसी ॥१॥ नरतनुचें वय घडिपळलव जात ॥ कमलदलजलवत नास्मरसी ॥ अंतरा ॥ भावना भजनाची अनुदिनीं ॥ चिंतन कर रघुराजपदा न सोडिं कदा ॥ तरि सरसी ॥ २ ॥ कर सुखसाधन श्रवण मनन तूं ॥ श्रीगुरुराजमुखें व्यर्थचि कां श्रमसी ॥ अंतरा ॥ सुमना जीवना सम मानुनी ॥ भक्तिविराग धरिं गहना पावें वामना ॥ भवा तरसी ॥ ३ ॥

॥ पद ४४ ॥

असा करिं संग ॥ जेणें होय त्वरित भवभंग ॥ ध्रु० ॥ सुसंग तो हा पुण्यजनाचा ॥ परउपकारि कल्पद्रुमाचा ॥ कीर्तिगौरव भागवताचा ॥ नामानुषंग ॥ १ ॥ धन्य नारद प्रल्हादाचा ॥ वसिष्ठ पराशर मुनि व्यासाचा ॥ शुक योगींद्र परीक्षितीचा ॥ प्राप्त श्रीरंग ॥२॥ भीष्म पुंडलीक अंबरीषाचा ॥ बिभीषण अर्जुन रुक्मांगदाचा ॥ अंजनीसुत ध्रुव अक्रूराचा ॥ पाहुनी दंग ॥ ३ ॥ भरत उद्धव सुदामाचा ॥ पुण्यकारक श्रीदत्ताचा ॥ रघुनाथ यति मौनिगुरूचा ॥ वामना संग ॥ ४ ॥

॥ पद ४५ ॥

मना धर रघुनाथमुनीचें ध्यान ॥ जो कीं परमगुरु भगवान ॥ध्रु०॥ नाशिक क्षेत्र पुण्यभूमिप्रती ॥ तप आराधनस्थान ॥१॥ राहे निरंतर गंगातटिं मठीं ॥ भटजी द्वितीय अभिधान ॥ २ ॥ जपतपस्नान त्रिकाल करोनी ॥ करिं भिक्षा जलपान ॥३॥ सच्चित्सुख घन रूप जयाचें ॥ भक्ता दे वरदान ॥४॥ भक्ती मुक्ती दे सकलार्थी ॥ वामनसौख्यनिदान ॥ ५ ॥

॥ पद ४६ ॥

मौनीसद्गुरु कल्पतरू हा ॥ चरपादपविश्रामी ॥ अधिकाऱ्यातें सफल मोक्षद ॥ मुक्त करि परिणामीं ॥ध्रु० ॥ यतिस्वरूपें जगीं विराजत ॥ पूर्णप्रीति ज्या रामीं ॥ दंडकमंडलु पुस्तकमाला ॥ करधृत जो अजगामी ॥ १ ॥ सीत

भस्म हें भालीं चर्चित ॥ जसा शूली निःकामी ॥ काषायवस्त्र कटीं वेष्टित ॥ वसे स्वात्मसुखधामीं ॥ २ ॥ प्रणवात्मकही सोहं दीक्षा ॥ धरिली नारायण-नामीं ॥ म्हणे वामन पूर्ण ब्रह्मरूप ॥ दिसे दत्त जेवीं स्वामी ॥ ३ ॥

॥ पद ४७ ॥

यतिवर तव पदवंदना ॥ करित नारायण पावना ॥ध्रु०॥ हे मम जीवना संसृतिहरणा ॥ सेवा ध्यावी कृपाघना ॥ १ ॥ तुजविण कोणा मी जाऊं शरणा ॥ दे मज रामउपासना ॥ २ ॥ भूदेवसुमना प्रीत दे वामना ॥ पुरवीं ही मम कामना ॥ ३ ॥

॥ पद ४८ ॥

मी मी कोण हा ऐसें पहातां ॥ अद्वय आत्मा भासे ॥ हेचि देहिंरे मुक्त-साधक तत्क्षणीं अनायासें ॥ध्रु०॥ निगमागम श्रीगुरुविचारें ॥ स्वांतरिं नित्य प्रकाशे ॥ सच्चित्सुखविभु निर्गुण ब्रह्म ॥ पिंडब्रह्मांडीं विलासे ॥१॥ पंचकोश तीनदेह अतीत ॥ साक्षीरूप जो आसे ॥ गुरुकृपें तूं अंतरमुख जरी ॥ अनुभवें निजरूपीं दिसे ॥ २ ॥ निजनिकट असा हा देव असोनी ॥ नेणसी येतसे हांसें ॥ अजुनी समज धरि म्हणे वामन ॥ लागे दैशिक कासे ॥ ३ ॥

॥ पद ४९ ॥

देव शंकर उग्र रूपा धरिलें भैरव ॥ दुष्ट शासनार्थ तुझा भीम हा रव ॥ ध्रु० ॥ भक्तरक्षणार्थ प्रगट स्वरूप हें तव ॥ क्षेत्र वाराणसीमध्यें मुख्य वैभव ॥ ठाईं ठाईं पूज्य स्थानें असती नव नव ॥ सिन्नर ग्रामीं ठाण तुझें साक्षीलाघव ॥ १ ॥ तक्षकबाधा लोकां नसे धन्यरे भव ॥ जागृत दैवत म्हणूनि जन करिती गौरव ॥ वार्षिक यात्रा भरुनी सकल लोक उत्सव ॥ नवस पुजा अनुष्ठाना करिती मानव ॥ २ ॥ तया मनोरथा पूर्ण करिसी वास्तव ॥ तुला अनन्य शरण त्याचे चुकती रौरव ॥ भूमानंद ज्ञानरूप तेज घवघव ॥ अभय वरद वामना तूं कालभैरव ॥ ३ ॥

॥ पद ५० ॥

रसनें रामनामामृत सेउनि राहिंगे ॥ क्षणभंगुर नरदेह याचा नेम नाहिंगे ॥ ध्रु० ॥ येउनि काळ कर्पुनि गात्र हरिल प्राण गे ॥ निघुनि जातां बोलावया नाहिं त्राण गे ॥ गृह सुत धन टाकुनि जातां सर्वेचि हाण गे ॥

म्हणुनी रामा वदत करिं काळक्रमण गे ॥ १ ॥ राम राम मुखीं जपत नीळकंठगे ॥ अजामिळकिरातादि पापी मूढ गे ॥ तेहि दिव्य नामाक्षरें तरले जड गे ॥ विश्वसाक्षी योगिराणा गाई दृढ गे ॥ २ ॥ तीव्र नाम स्मरणरूप करुनि तपागे ॥ कौशिकवाल्मिकादि रचित मंत्र सोपा गे ॥ खान पान विषयसुखा सोडुनि गप्पा गे ॥ वामन भवहरण योगा करि तूं जपा गे ॥३॥

## ॥ पद ५१ ॥

मौनी गुरु माउली सखे अभय करिं गे ॥ देउनि दर्शन मज दीना अंगिकारिं गे ॥ ध्रु० ॥ दुस्तर भवाटवीमध्यें भ्रमण करित गे ॥ कामक्रोध व्याघ्र सर्पें पिडितत्रस्त गे ॥ विषयचोरें मोहुनी माते हरिलें सुकृत गे ॥ दुर्घट अज्ञानरजनि तमें धरिला कुपथ गे ॥ १ ॥ म्हणुनि माते दाउनि सत्वर ज्ञानसुपथगे ॥ शास्त्रश्रवणजन्य विवेक हाचि दूतगे ॥ साह्य देउनि वैरि मारीं असंगशस्त्रें गे ॥ ठेविं निजानंद धार्मीं बोधुनि तत्वगे ॥ २ ॥ तूंचि देव माय बाप बंधु आप्त गे ॥ सच्चित्सुख निर्गुण भूमारूप शांत गे ॥ धांव पाव पाहुं नको माझें सत्व गे ॥ वामन म्हणे करिं कृपाशक्तिपात गे ॥ ३ ॥

## ॥ पद ५२ ॥

भजभज मानवा तूं जानकीजीवना ॥ तन्नामस्मरणा कलिमलदहना करि भवहरणा ॥ ध्रु० ॥ रत्नजडित जें हेमसिंहासन ॥ त्यावरि करि रघुराज सुखासन ॥ श्यामसुंदर करिं शोभे शरासन ॥ कमलनयन वद तूं निजवदना राघवस्तवना ॥ १ ॥ वास्तवरूपें जो व्यापक निर्गुण ॥ निजजनतारण स्वरूप सगुण ॥ धरुनी करी जो भूदेवरक्षण ॥ करिं मना चिंतन त्या जगजीवना तव सुखसदना ॥२॥ जो जगकारण करितसे पालन ॥ शांत जरी जग रामसच्चिद्घन ॥ राहे अखंडित मुनिजनरमण ॥ वामन करि भावें तत्पदनमना कपिवरवहना ॥ ३ ॥

## ॥ पद ५३ ॥

मौनीस्वामी अवतरले सिन्नरग्रामीं ॥ निशिदिनीं तल्लिन जे जयरामीं ॥ ध्रु० ॥ गृहसुत क्षेत्र दारावित्त ॥ इष्ट बंधु मित्र कन्या आप्त ॥ विषय विचित्र तयासि विरक्त ॥ स्वानुभवें स्थित जे निजधामीं ॥ २ ॥ सत्चित्सुखघन ब्रह्मस्वरूप ॥ निर्गुण निराकार भूमा अरूप ॥ ब्रह्मसमाधीचा ज्या साक्षेप ॥

सदा मन उन्मन जे निष्कामी ॥ २ ॥ सज्जनचातक पूर्ण सुधाकर ॥ ज्ञानपीयूषा देत निरंतर ॥ भवताप निवटुनी शांत करी नर ॥ वामन म्हणे जया प्रेम बहु नामीं ॥ ३ ॥

॥ पद ५४ ॥

राम सखा तूं जोड रे ॥ नरदेहिं प्राण्या ॥ध्रु०॥ प्रतिदेहीं अंतरिं रामचि आहे ॥ आपपर प्रतरण सोड रे ॥ १ ॥ समदृष्टि शत्रुमित्रउदासीन ॥ त्यांचें पुरवीं कोड रे ॥ २ ॥ शताधिक आयू जरि असे देहा ॥ तरि मग संग्रह गोड रे ॥३॥ नरतनुचें वय जरि हें अशाश्वत ॥ टाकीं सवासन खोड रे ॥४॥ वामन म्हणे तव विषयप्रसंगें ॥ काल करिल हिरमोड रे ॥ ५ ॥

॥ पद ५५ ॥

मजला पावन करिं तूं देवा ॥ हे प्रभो राम दयाघन रे ॥ध्रु०॥ तव नामप्रतापें वाल्मिक निष्ठुर ॥ अजामिल पापी तरले रे ॥ दीनानाथ हें ब्रीद असे तव ॥ करिं संसृतिदुःखनिवारण रे ॥१॥ गौतमजाया लाऊनि पायां ॥ झालि शिला ती कामिनी रे ॥ ऐसा महिमा तव चरणाचा ॥ करिती मुनिजन वंदन रे ॥२॥ कामादिक हे षड्रिपु वैरी ॥ निशिदिनीं गांजिती मजला रे ॥ त्यांप्रति दंडन करिं म्हणे वामन ॥ दे मज तव पददर्शन रे ॥ ३ ॥

॥ पद ५६ ॥

भज मन जानकीजीवनराम ॥ध्रु०॥ श्रवणें श्रवणा तच्चरितातें ॥ निशिदिनिं करिं अभिराम ॥१॥ नेत्रें विलोकीं अभिनव मूर्ती ॥ रूप सुंदर घनश्याम ॥२॥ रसनें प्राशुनी तच्चरणामृत ॥ तीर्था घे निष्काम ॥ ३ ॥ अनुदिनिं वाचे तन्नामस्मरणा ॥ वद तूं राम राम राम ॥ ४ ॥ दिनिंदिनीं पूजन स्वहस्तें करुनी ॥ तत्पदिं करिं प्रणाम ॥ ५ ॥ मूर्तिप्रदक्षिणा करिं तूं पायां ॥ संसृतिक्लेशविराम ॥६॥ वामन म्हणे मना सर्वप्रकारें ॥ राम रमण तव धाम ॥७॥

॥ पद ५७ ॥

प्राण्या सावध रे सावध रे ॥ पावन नाम परेशा वाचे वदवद रे वदवद रे ॥ ध्रु० ॥ दिवसयामिनी ग्रासरूपानें ॥ ग्रासी आयुष्या काळ मुखानें ॥ माय म्हणे हा थोर वयानें ॥ जेवी तृणाचा डोंगर रे डोंगर रे ॥१॥ स्थूलसूक्ष्म देहाचें कारण ॥ अनादि तुच्छ जें अज्ञान ॥ तें मायामय ती ईश्वरा अधीन ॥

ध्यान तयाचें धर धर रे धर धर रे ॥ २ ॥ दुःखमूल हा देहसंबंध ॥ अहं-ममत्वें जोंवरि सिद्ध ॥ तोंवरि न तुटे हा भवबंध ॥ म्हणोनी त्याचे छेदक रे छेदक रे ॥ ३ ॥ मायाधीशा शरण रिघावें ॥ अक्षय तद्गुण श्रवण करावे ॥ त्याचे चरिता प्रेमें गावें ॥ म्हणे वामन सादर रे सादर रे ॥ ४ ॥ पावन नाम परेशा वाचे वदवद रे वदवद रे ॥ प्राण्या० ॥

॥ पद ५८ ॥

अशाश्वत विषय विषापरि सोड ॥ तुज वृथा तयांचें कोड ॥ध्रु०॥ कधिंतरि तुज हे टाकुनी जाती ॥ तरि आतांच धरूं नको वोढ ॥ १ ॥ आपुलिया बळें जरि तूं धरिसी ॥ शेखीं करतिल तुझा हिरमोड ॥ २ ॥ तुझी त्याची तूटि निश्चित होणें ॥ तोटा नफा चिंतुन काय तुज गोड ॥ ३ ॥ वामन म्हणे त्यां सवासन निवटुनी ॥ करिं श्रीरामपदाची जोड ॥ ४ ॥

॥ पद ५९ ॥ ( राग कालंगडा. )

ऐसा नर नटकी नर नटकी ॥ दावित माया लटकी ॥ध्रु०॥ मंत्रतंत्र बहु चेटकी ॥ लोकां भोंदुनि परधन पटकी ॥ १ ॥ बांधुनी स्वतंत्र मठकी ॥ जो कां परस्त्रियेतें हटकी ॥२॥ ग्रामजोसी जो भटकी ॥ स्वगृहिं ठेवित दुर्जी बटकी ॥ ३ ॥ विधवा मडकी फुटकी ॥ मानुनी करितो त्यांचा तिटकी ॥४॥ विधुर आपण नीट कीं ॥ वृद्ध करितो स्त्री बहु बुटकी ॥ ५ ॥ पुनर्विवाही अटकी ॥ विधवे विधुर पुरुषा सुटकी ॥ ६ ॥ दांभिक वंधू धीट कीं ॥ दीना रामगुरु करि तुटकीं ॥ ७ ॥ ऐसें दुर्धट कुटकी ॥ राम वामना त्याची चिटकी ॥ ८ ॥

॥ पद ६० ॥

जीवा मन गुणिया मन गुणिया ॥ दावित नाना दुनिया ॥ ध्रु० ॥ नसतें लटकें दावी ॥ मानसगोष्ट तुम्हीं ऐकावी ॥ १ ॥ जागत पदार्थ दिसती ॥ हें मन सुस असतां नसती ॥ २ ॥ स्वप्नीं व्याघ्र असल्या ॥ भयभीत, निद्रित निर्भय सत्या ॥३॥ नाभय नेणत नागा ॥ वाटे कल्पांत स्वप्नभुजंगा ॥ ४ ॥ एकदा मंगलवाद्या ॥ ऐकवी, चाखवी नाना खाद्या ॥ ५ ॥ कार्यमंडपा करिती ॥ कोणी तिकडें बांधित बसती ॥६॥ वाहक प्रेत अमंगळ ॥ दुर्घट घोर श्वापदा जंगल ॥७॥ उत्सव असतां हंसती ॥ कोणी आप्त मरतां रडती ॥८॥

काडीसाठीं रडती ॥ बाळें थोर माडितें झटती ॥ ९ ॥ बांधव वादा उठती ॥ राष्ट्रासाठीं राजे लढती ॥ १० ॥ मनें सुखासुखभोग ॥ दुःखद जन्ममरणा योग ॥ ११ ॥ ब्रह्मबोधउपचारें ॥ मुक्त मन सत्यासत्यविचारें ॥ १२ ॥ जो जीवा मना संबंध ॥ तोचि वामना संसृतिबंध ॥ १३ ॥

## ॥ पद ६१ ॥

राम रघुवीर दयाघन हरि ॥ ध्रु० ॥ अनुदिनिं सन्मुख तूं मज होउनी ॥ कलिमलदोष निवारीं ॥ १ ॥ मन्मुखीं तुझें नामपारायण ॥ असो वांछा परउपकारि ॥ २ ॥ रामगुरुपदीं लक्ष असो मम ॥ हो वामना सुखकारि ॥ ३ ॥

## ॥ पद ६२ ॥

स्वामी गुरुराज कृपाघन मौनी ॥ ध्रु० ॥ तव पदकमला आश्रय देउनी ॥ दे दीक्षा मज निर्वाणीं ॥ १ ॥ भक्तिरसामध्यें धुंद करिं मज ॥ विराग भस्म ज्ञानधुनी ॥ २ ॥ शुभ साधन जटा निग्रह चिमटा ॥ होय वश दश मन ज्यांनीं ॥ ३ ॥ भवरुजहारक तव चरणामृत ॥ दे राममंत्र मम कानीं ॥ ४ ॥ श्रवण मनन गंगाजलमज्जन ॥ सज्जनसंग दे मज मानी ॥५॥ भिक्षामात्रा दे निजगात्रा ॥ परा शांती निजसुरवर वानी ॥ ६ ॥ वामन छात्रा करवीं यात्रा ॥ आत्मारामीं मती ज्यांनीं ॥ ७ ॥

## ॥ पद ६३ ॥

अहो नरा, समय हा बरा, शरण गुरुवरा, जाउनी भव तरा ॥ अहंबीज तम हरा, मी कवण हा शोध करा ॥ध्रु०॥ घडि न अशी रोकडि, सुकर बापुडि, करुनि तातडि ॥ ईशा धरुनी आवडि, पावा परमपदा परतीरा ॥ १ ॥ एक ईश असा, न भरंवसा, देव बहु अशा, धरुनी चौ दिशां ॥ फिरुनी तीर्थ दुर्दशा, निदानीं कवण देव अंदेशा दूर करा ॥२॥ विचार निजअंतरिं, समजता तरि, प्रगट झडकरि, मना जाणता हरी ॥ राम रमत अंतरिं सदा प्रीय जो मुनिवरा ॥३॥ मनीं विषय जैं नसे, तरिच भरंवसे, हरी तैं वसे, श्रुती वदतसे ॥ एकचि देव बा असे, जगीं देव तो खरा ॥४॥ मना धरुनी कामना, जानकीजीवना, भया भयविना ॥ भावें करुनी कीर्तना, श्रीरामीं रंग वामना प्रियकरा ॥ ५ ॥

## ॥ भजन ॥

गणपति दत्ता जयरामा ॥ मंगलरूपा सुखधामा ॥

॥ पद ६४ ॥

रंगणीं येउनी वरदानीं ॥ प्रगट असा रे मम ध्यानीं ॥ ध्रु० ॥ आदिदेव गणपति सहवाणी ॥ सुरनर नुतपद उभयांनीं ॥ १ ॥ दत्त अवधूत रघुनाथ मौनी ॥ ज्यां तनु रविभा करि गौणी ॥ २ ॥ साधुसंत श्रोते सुजनांनीं ॥ प्रेरक व्हावें मम वाणी ॥ ३ ॥ ऐकुनी विनवणी करुणांनीं ॥ अभय करावें सकळांनीं ॥ ४ ॥ वामन प्रार्थित दिनरजनीं ॥ आवडि असो मज निज-भजनीं ॥ ५ ॥

॥ पद ६५ ॥

निजरूपा समजुनी राहें तूं ॥ ध्रु० ॥ नाना तीर्थें भटकत फिरसी ॥ नाहिं पूर्ण मनांतील हेतू ॥ १ ॥ नाना दैवतपूजन करिसी ॥ एक देव विचार न पाहें तूं ॥ २ ॥ वामन निजखूण जाण आपणासी ॥ आपोआप स्थिर राहें तूं ॥ ३ ॥

॥ पद ६६ ॥

गणनाथ दयाघन देवा रे ॥ध्रु०॥ महदपराध्या रक्षियलें मज ॥ सिद्धिवि-नायक दे तव सेवा रे ॥ १ ॥ स्वप्नप्रतीती जागविलें मज ॥ संकट नाशुनी तवाश्रय द्यावा रे ॥ २ ॥ मंदमती मज वदविसी तूं ॥ वामन गातसे तव मंगल नामा रे ॥ ३ ॥

॥ पद ६७ ॥

दिनानाथा सद्गुरु ज्ञानदाता रे ॥ शरणागता वत्सला तूंचि त्राता रे ॥ ध्रु० ॥ जीवा पुण्यें फळती सकळ देव रे ॥ निष्कामा तूं देतसे निजठेव रे ॥ ॥१॥ हरण करिं जीवा हरि पाप रे ॥ पुन्हा होतां पापें जीव कांपे रे ॥ २ ॥ अनुतापें संतांपुढें जाय रे ॥ संतसंगें अघमूल तम जाय रे ॥ ३ ॥ जन्म-मरणा पुन्हा नाहिं डा वरे ॥ सर्व द्वंद्वें चूकती दृश्यभाव रे ॥ ४ ॥ नष्ट होत तैसा जीवभाव रे ॥ सत्य ज्ञानानंद प्राप्त शिवभाव रे ॥ ५ ॥ जेणें मुक्ती जीवा मौनीनाथा रे ॥ तुझे चरणीं वामन ठेवी माथा रे ॥ ६ ॥

॥ पद ६८ ॥ ( राग धनाश्री. )

भज मन मौनीगुरुचे पाय ॥ ध्रु० ॥ पाहूं जातां अंत न लागे ॥ जैं धी-गती निरुपाय ॥ १ ॥ तर्ककुतर्क तेथें न चाले ॥ संसृति निरसुनी जाय

॥ २ ॥ भावें साधक शरण जातां ॥ जेणें तरणोपाय ॥ ३ ॥ विपरीत कर्मीं शिक्षुनि साधक ॥ उद्धरी त्याचा काय ॥ ४ ॥ भुक्तिमुक्तिप्रती वामनदासा ॥ आश्रय एकचि पाय ॥ ५ ॥ रामगुरुचा वामन दास ॥ मौनीगुरुचा वामन खास ॥ ६ ॥

॥ श्रीगुरुपरंपरापर ॥ पद ६९ ॥ ( राग झिंजोटी. )

रामगुरुत्रय तत्पदीं हें मन ॥ राहुनी स्थिर हो शांत रे ॥ ध्रु० ॥ परात्परगुरू रघुवीर नारायण ॥ परमेष्ठी गुरु अवधूत रे ॥ परमगुरू रघुनाथपरायण ॥ मौनीनाथगुरु संत रे ॥ १ ॥ भक्तां भक्ती विरक्तिपरायण ॥ बोधिती जे वेदांत रे ॥ नारायण इंद्र सरस्वतीवर्णन ॥ मौनि दुजे विख्यात रे ॥ २ ॥ निजगुरु मौनीपरायण वामन ॥ राहे स्वरूपसुखांत रे ॥ ३ ॥ बाधित वृत्त्या कृतगुरुवंदन ॥ मौनीनंदन श्रांत रे ॥ ४ ॥

॥ पद ७० ॥

श्रीमौनीनाथ संतपदिं मना सतत राहें ॥ परम सुखद कलुष हरण भवा शमन बाहें ॥ ध्रु० ॥ दावी तथ्य भक्तिपथा ईशकृपा तेणें ॥ राममंत्र एक तंत्र आलिया शरण देणें ॥ १ ॥ अन्य मंत्र तंत्र अशा त्यजुनी सर्व ॥ प्रतिदिनीं गुरुनाथ स्मरुनी होय विगतगर्व ॥ २ ॥ तनु धन सुत रमणी गृहा त्यजुनि स्पृहा आशा रे ॥ आदि रम्य दिसती परि दुःखरूप सारे ॥ ३ ॥ शमदमादि षड्गुणेंकरुनी शांत होई ॥ श्रवणमननजन्य बोधें स्वीय स्वरुप पाहिं ॥ ४ ॥ रामगुरु वदत मना गोड नाम वाचे ॥ काल क्रमुनी मुक्त होय वामन वदत साचें ॥ ५ ॥

॥ पद ७१ ॥

मौनीनाथ गुरु माझे आई पायां दावीं ॥ दुष्ट शत्रु मम कामादिक वाटे लावीं ॥ ध्रु० ॥ त्राहि त्राहि मज संसृतिचक्रांतुनी परपारी ॥ दीनानाथ ब्रिद जाणुनियां तूं मातें तारीं ॥ १ ॥ कर्मनिमग्न मर्कट जैसा साहंकारी ॥ क्रियें भोग सुख मानुनी झालों मी अधिकारी ॥ २ ॥ क्षयातीत सुख मागुति जेंवी हो मृगवारी ॥ अर्थ अर्जनीं रक्षणीं नाशे दुःखें सारीं ॥ ३ ॥ मोहे चित्त विषयवासना धन सुत नारी ॥ प्रिय मानुनी दुःख भोगितों या संसारीं ॥ ४ ॥ द्रव्याविण स्त्री तुच्छ मानुनी हाका मारी ॥ पुत्र अवज्ञा निंदा सोय रे करिती भारी ॥५॥ जाय जाय मर शब्द बोलती हुंहुःकारीं ॥

गर्भापासुनी मृत्यु पावेतों त्रास शरीरीं ॥ ६ ॥ प्राणरहितपाषाणाहुनी हा जीव विकारी ॥ अहंममत्वें दुःख पावतो बहू अविचारी ॥ ७ ॥ जीव-संबंधा टाळीं देवा मम कैवारी ॥ धांव धांव गा शरण वामना हांक ऐकावी भारी ॥ ८ ॥

॥ पद ७२ ॥

मौनीनाथ गुरु दीनदयाळा ॥ केलें मम प्रतिपाळा रे ॥ भुक्तिमुक्तिचा आश्रय सगळा ॥ मजला त्वत्पदकमळा रे ॥ ध्रु० ॥ जन्मापासुनी तूं किति वेळां ॥ रक्षियलें मज बाळा रे ॥ अंगीकृत त्या कसा उन्हाळा ॥ करिं कृपा सुखकाळा रे ॥ १ ॥ श्रवणामृतरस दुर्जन व्याळा ॥ कामादिक कळिकाळा रे ॥ बाधासंभव हर कनवाळा ॥ पाजित मम शत वेळां रे ॥२॥ देसी अबलां वृद्ध गोपाळा ॥ राममंत्रजपमाळा रे ॥ छात्र उपासक सज्जन-मेळा ॥ छेदक त्या भवजाळा रे ॥ ३ ॥ वेदांतार्थी घालुनी शाळा ॥ निज-जन करि लडिवाळा रे ॥ जगदुद्धारा या घननीळा ॥ मंदिर ही तव लीळा रे ॥ ४ ॥ स्वामिविग्रह तारक सकळां ॥ ब्रह्मसुखाचा सोहळा रे ॥ तारिं वामना भाविक भोळा ॥ देउनी चिन्मय डोळा रे ॥ ५ ॥

॥ पद ७३ ॥

भज मन दत्तात्रय अवधूत ॥ध्रु०॥ विधिहरिहररूप त्रिगुणात्मक त्या हो ॥ चिंतनमात्रें पूत ॥ १ ॥ अवदुंबरस्थळीं वास जयाचा ॥ शुनीसुरभीसम भूत ॥ २ ॥ त्रिमुख षड्भुज विग्रह ज्याचा ॥ सुरनरमुनी अभिनूत ॥ ३ ॥ सच्चित्सुखरूप अखिल चराचरिं ॥ पूर्णचि जो अनुस्यूत ॥ ४ ॥ तत्पदलाभा साह्य करिं मज ॥ प्रार्थित मौनीसुत ॥ ५ ॥

॥ पद ७४ ॥

दिनकरउदयसमय जाहाला लक्ष्मण बोले ॥ कमलनयन रघुवीर दयाघन जागृत जाले ॥ ध्रु० ॥ किलबिल किलबिल शब्दगौरवें पक्षी उडाले ॥ जनकसुतासह राम मंचकीं बसते झाले ॥ शुकसनकादींसह राम-दर्शना मारुति आले ॥ रघुपतिकांकडआरती पाहून संत निवाले ॥ १ ॥ जय जय जय जय शब्द बोलतां वैष्णव धाले ॥ धिमी धिमी धिमी धिमी मृदंग वाजती तननन ताले ॥ खन खन खन खन तासघड्याळनाद निघाले ॥

घन घन घन घन घंटा शब्द गगनिं बुडाले ॥ २ ॥ थै थै थै थै संघ अप्सरा नाचत चाले ॥ पतितपावन सीतारामदर्शनवेळे ॥ छननन छननन नृत्य-संभ्रमें वाजती वाळे ॥ रुणझुण रुणझुण शब्दनेपुरें करिती चाळे ॥ ३ ॥ नगर अयोध्यावासी दर्शना सज्जन आले ॥ स्तवन करितां भक्त भाट हो तन्मय झाले ॥ तत्सुखघन परम पुरुपा लक्षित केलें ॥ नरतनु प्राप्त मौनी-नंदना दर्शन जालें ॥ ४ ॥

॥ पद ७५ ॥

नमन करोनी लक्ष्मण बोले दुर्लभ वेळे ॥ तव दर्शन कारण साधुजिवाचें पुण्य उदेलें ॥ ध्रु० ॥ पूर्ण ब्रह्म तूं प्रगटुनी जीवां पावन केलें ॥ सदानंद चिद्रूप विग्रहा रामा धरिलें ॥ १ ॥ सूर्यकोटिसम दिव्यस्वरूप तेजें भरलें ॥ सरळ भाग सम आजानुबाहो चापा धरिलें ॥ २ ॥ श्यामसुंदर रूप मनोहर पाहूं आले ॥ सुरनरकार्यां सिद्धि पाहुनी सद्गद जाहले ॥ ३ ॥

॥ अभंग १ ॥

आदिदेव गजानना ॥ सुखप्रद साधुजनां ॥ १ ॥ भक्तकामकल्पद्रुमा ॥ सर्व कल्याणाची सिमा ॥ २ ॥ वामना तूं सहायक मोक्षसिद्धीचा दायक ॥ ३ ॥

॥ अभंग २ ॥

राम सीता लक्ष्मुमण ॥ दास उभा हनुमान ॥ १ ॥ अहा मूर्तीचें वैभव ॥ द्वारिं नाचती वैष्णव ॥ २ ॥ पाहुनी रामसिंहासना ॥ प्रेमसुख वाटे मना ॥ ३ ॥ धन्य धन्य रघुवीर ॥ मुक्तिसुखाचें आगर ॥ ४ ॥ वस्तुतां तूं निराकार ॥ मायायोगें हा साकार ॥ ५ ॥ पिंडब्रह्मांडा व्यापक ॥ सर्वबुद्धिप्रका-शक ॥ ६ ॥ वामनाचें रामराया ॥ प्रेम असो तुझे पायां ॥ ७ ॥

॥ अभंग ३ ॥

राम शोभे सिंहासनीं ॥ तोचि आम्हांलागीं धनी ॥ १ ॥ त्याची भावें सेवा जरी ॥ तेथें कळी काय करी ॥ २ ॥ रामनामाचा प्रताप ॥ शांत होय भवताप ॥ ३ ॥ पूर्वपुण्याची ही ठेव ॥ ज्याचे कुळीं रामदेव ॥ ४ ॥ सर्व जडा तो चालक ॥ वामनाचा नियामक ॥ ५ ॥

॥ अभंग ४ ॥

स्वामी गुरु मौनीनाथा ॥ तुझे पायीं ठेवूं माथा ॥ १ ॥ डोळां पाहूं

तुझें मुख ॥ तेणं जोडे ब्रह्मसुख ॥ २ ॥ शोभिवंत तुझी काया ॥ भवश्रम गेले वांया ॥ ३ ॥ तव नामपारायण ॥ वाचे जोडे नारायण ॥ ४ ॥ वामनासी गुरुराया ॥ दावि दावि तुझे पायां ॥ ५ ॥

॥ अभंग ५ ॥

स्वामी गुरू नारायण ॥ सदा ब्रह्मपरायण ॥ १ ॥ वास असे ज्याचा मठीं ॥ दंडकमंडलु छाटी ॥ २ ॥ पुस्तक माला असे करीं ॥ सिद्ध भिक्षा मधुकरी ॥ ३ ॥ जेणें सत्कारिला यती ॥ तया नाहीं अधोगती ॥ ४ ॥ सर्व उपाधीचा न्यास ॥ धन्य धन्य गा संन्यास ॥ ५ ॥ ब्रह्मानंदिं सदा वास ॥ वामन धरी त्याची कांस ॥ ६ ॥

॥ अभंग ६ ॥

पंच विषयांचा केला ज्यांनीं न्यास ॥ तोचि हा संन्यास देहातीत ॥ १ ॥ देहत्रय घर ईषणा तें वित्त ॥ गुण यज्ञोपवीत तोडियलें ॥ २ ॥ तोडिला संबंध वासना शिखेचा ॥ कामादि बंधूंचा सर्व काळ ॥३॥ सर्वासक्ती कन्या माया तेचि जाया ॥ मोह या जांवाया त्यागीयेलें ॥ ४ ॥ त्यागिला कुपुत्र संकल्पद्वैताचा ॥ मठ अद्वैताचा स्वीकारुनी ॥ ५ ॥ स्वीकारिलीं भगवीं सुबोध प्रकाश ॥ नाहीं डाग ज्यांस अज्ञानाचा ॥ ६ ॥ काम्यकर्म हेंचि त्यागिलें अज्ञान ॥ निष्कर्म तें ज्ञान स्वीकारिलें ॥ ७ ॥ स्वीकारूनी सोहं शब्दाची हो दीक्षा ॥ शांती सिद्धी भिक्षा क्षेमें करी ॥ ८ ॥ क्षमाजलपूर्ण कमंडलु शम ॥ हातीं दंड दम धरियेला ॥ ९ ॥ धरिला तुरीय चतुर्थाश्रम तो ॥ सर्व दृश्यातीत नारायण ॥ १० ॥ नारायण देव याचें ज्ञान ज्यास ॥ त्याचा हो संन्यास अंतरींचा ॥ ११ ॥ अंतरिं निस्पृह परमार्थी उल्हास ॥ बाह्य त्या संन्यास असो नसो ॥ १२ ॥ असूनी सस्पृह प्रपंचीं उल्लास ॥ लोकीं जो संन्यास तरी व्यर्थ ॥ १३ ॥ जरि असे योगी अंतरिं निस्पृह ॥ बाह्य तो संग्रह कैसा करी ॥ १४ ॥ करुनी नमन श्रीगुरुचरण ॥ तयासी वामन वांछितसे ॥ १५ ॥

॥ अभंग ७ ॥

विठ्ठल हा देव राजा पंढरीचा ॥ मूळ वैकुंठींचा रहिवासी ॥ १ ॥ राहतो पंढरिं गादीचा मालक ॥ प्रजेचा पालक भक्तलोकां ॥ २ ॥ लोक रक्षुनी घे भाव करभार ॥ कथा दरबार भरविले ॥ ३ ॥ दरबारीं सद्गुरु

नेमिला हो मंत्री ॥ प्रजा बोधतंत्रीं आज्ञापूनी ॥ ४ ॥ आज्ञापूनी दृढ वैराग्यकायदा ॥ प्रपंच वायदा न मानूनी ॥ ५ ॥ न मानिति काळ मृत्यु हे सेवक ॥ कामक्रोध रंक मोडियेले ॥ ६ ॥ अदंभ गरुड नाम अर्जे घेत ॥ दर्शन करवीत विज्ञापूनी ॥ ७ ॥ नवविध भक्ति आज्ञापूनी लोकां ॥ संत रक्षी जो कां निजबळें ॥ ८ ॥ देउनि धांडोरा निजवेदशास्त्रां ॥ सुखदुःख शस्त्रां गाजवीलें ॥ ९ ॥ भक्तिमुक्ति गांव देउनि साधकां ॥ अक्षय जीविका बक्षीस ही ॥ १० ॥ दैवि संपत्तीच्या सुंदर मुद्रिका ॥ देउनि साधका तोषवीलें ॥ ११ ॥ प्रेम नजराणा देवा दे साधक ॥ करि नांदणूक पुरुषार्थी ॥ १२ ॥ नांदवी रखुमाई प्रमुख बायका ॥ वैकुंठनायका सर्व सिद्धी ॥ १३ ॥ ऐसें विठोबाचें एकछत्री राज्य ॥ भक्त हा सायुज्य भोगीतसे ॥ १४ ॥ वामनदास म्हणे विठ्ठल हा राजा ॥ परमार्थाचे काजा सिद्ध करो ॥ १५ ॥

## ॥ अभंग ८ ॥

चित्तीं वासनाघडामोड ॥ स्नानसंध्यागडबड ॥ १ ॥ पुण्याचार दाऊनी जनीं ॥ परविषयां होय धनी ॥ २ ॥ करुनी भिक्षुकीचा धंदा ॥ लोकां म्हणे आम्हां वंदा ॥ ३ ॥ स्वयें अमंगळ निष्ठुर ॥ परबोधनीं तत्पर ॥ ४ ॥ वामन म्हणे ऐशा संता ॥ संग नको भगवंता ॥ ५ ॥

## ॥ अभंग ९ ॥

स्वयें तरुनी दुसऱ्या तारी ॥ ब्राह्मण संत बलहारी ॥ १ ॥ स्वयें सोसुनी अपकार ॥ परा करी उपकार ॥ २ ॥ स्वयें नांदे धर्मस्थितीं ॥ परा दावी तीच रीति ॥ ३ ॥ न करी याचना दुराग्रह ॥ प्राणरक्षणा संग्रह ॥ ४ ॥ अल्प करी यथान्याय ॥ वामन त्याची कीर्ती गाय ॥ ५ ॥

## ॥ अभंग १० ॥

असंख्य असति ब्रह्मांडांच्या कोटी ॥ जयाच्या हो पोटीं अनंतत्वें ॥ १ ॥ अनंत ब्रह्मांडां व्यापुनी जो राहे ॥ मुंगीची जो पाहे वर्तणूक ॥ २ ॥ वर्तवी अनंत जीवांसी एकत्वें ॥ निरीक्षी समत्वें साक्षिरूप ॥ ३ ॥ पिंडब्रह्मांडासी स्वयें एक साक्षी ॥ कर्माकर्म लक्षी जीवमात्रा ॥ ४ ॥ जीवमात्रा कर्म फलाचा जो दाता ॥ सर्वांचा विधाता तोचि एक ॥ ५ ॥ एक असोनियां

अलिप्त सर्वांसी ॥ कार्यकारणासी वेगळाचि ॥ ६ ॥ वेगळा असोनी मायेचेनि योगें ॥ घडियेलीं सोंगें प्राणिवर्ग ॥ ७ ॥ प्राणिवर्गांसी जो ईशत्वें वेगळा ॥ कारण सकळा अभिन्नत्वें ॥ ८ ॥ मायायोगें सर्व करुनी अकर्ता ॥ वामन नियंता सर्वेश्वर ॥ ९ ॥

॥ अभंग ११ ॥

भक्तीविणें तुच्छ द्रव्याभरणपूजा ॥ फळ पुष्प वाजा नामघोष ॥ १ ॥ नामसंकीर्तन वेदाचें पठन ॥ कर्म आचरण यथाविधि ॥ २ ॥ यथालोक रीती करी वर्तणूक ॥ तरी सर्व चूक भक्तीवीण ॥ ३ ॥ एक भक्तियोगें देव सांभाळीतो ॥ वैगुण्य सोसीतो निजभक्तां ॥ ४ ॥ निजभक्तांसी जो देतसे पुसर्थ ॥ तोचि हो समर्थ वामनासी ॥ ५ ॥

॥ अभंग १२ ॥

सद्गुरु परेशा तव अविनाशा ॥ पदाची मी आशा करितसें ॥ १ ॥ मज सावकाश देई दर्शनास ॥ मजला निराश करूं नको ॥ २ ॥ जैसें मानहीन बुभुक्षित श्वान ॥ तैसा मी हा दीन तुझे द्वारीं ॥ ३ ॥ कृपा अन्नदाना बोध अंबुपाना ॥ तुज यजमाना वान नसे ॥४॥ आलों मी शरण न देतां मरण ॥ पदाचें स्मरण असों द्यावें ॥ ५ ॥ स्वामी मौनिनाथा स्वीकारीं अनाथा ॥ वामनाच्या माथां हस्त ठेवीं ॥ ६ ॥

॥ अभंग १३ ॥

पशु मारोनीयां यज्ञाचे सायास ॥ धरोनीयां आस स्वर्गसुख ॥ १ ॥ माझी ही विधवा राहोनीयां खास ॥ तेणें स्वर्गवास असो मला ॥ २ ॥ पराया जीवास देवोनीयां त्रास ॥ परलोका आस करीतसे ॥ ३ ॥ परवृक्षा पीडा देवोनीयां देवा ॥ बेल हा वाहावा पुण्य जोडे ॥४॥ तेंवी दुसऱ्यास दावी फळा आस ॥ दानें द्रव्य खास भोंदीतसे ॥ ५ ॥ परयोगपुण्या जोडा रे यथार्थ ॥ स्वीया तपें अर्थ कां न जोडे ॥ ६ ॥ परजीव त्रासे होती महादोष ॥ देवा नाहीं तोष यांत कांहीं ॥ ७ ॥

॥ अभंग १४ ॥

आशा ही करावी राघवपदाची ॥ कदा दुसऱ्याची करूं नये ॥ १ ॥ आशा ही दारुण जीवा दीनवाणा ॥ करी अवमाना लोकीं सदा ॥२॥ कष्ट पाप दुःखा भयाचें कारण ॥ अधर्माचें स्थान आशा एक ॥ ३ ॥ आशायोगें

थोर नीचत्व पावती ॥ दास्यत्व करीती नीचाघरीं ॥ ४ ॥ आशेनें हे लोक संकटीं पडती ॥ लपोनी राहती चोरापरी ॥ ५ ॥ पंचाग्निसाधन नवस सायास ॥ व्रतें ऊपवास आशेसाठीं ॥६॥ आशेसाठीं रांडा कुशब्द बोलती ॥ पैजारा मारिती कोंडूनीयां ॥ ७ ॥ जगामध्यें आशा सर्व दुःखमूळ ॥ जीव हा व्याकुळ चितारूप ॥ ८ ॥ अन्य सर्व सोडीं वामना तूं आशा ॥ एक देव आशा दृढ धरीं ॥ ९ ॥

## ॥ अभंग १५ ॥

जेंवी हा कृपण विसंबेना वित्त ॥ निशिदिनीं चित्त द्रव्याकडे ॥१॥ आसनीं शयनीं भोजनीं अटनीं ॥ जनीं निरंजनीं द्रव्य दीसे ॥ २ ॥ व्ययानें वियोग न साहे किंचीत ॥ अर्जनीं सुचित्त राहे सदा ॥ ३ ॥ द्रव्याचेनि प्रेमें सदा सावकाश ॥ कदान्नें खायास घरा आणी ॥ ४ ॥ मिष्टान्नाच्या गोष्टी ऐकोनीयां कानीं ॥ स्वप्नांत तीं मनीं भक्षीतसे ॥५॥ द्रव्यभय गोष्टी कानीं ऐकोनीयां ॥ स्वप्नांतहि तया रक्षीतसे ॥ ६ ॥ तेंवी हरिदास विसंबेना हरी ॥ हरिपायां-वरि चित्त सदा ॥ ७ ॥ दिवसयामीनी हरि आठवितो ॥ हरिगुण गातो सर्वकाळ ॥८॥ हरिचेनी प्रेमें प्रपंचीं उदास ॥ तेणें द्रव्यनाश सोशीतसे ॥९॥ कृपणाप्रमाणें पुण्याचा संचय ॥ करितो अक्षय सत्कर्मानें ॥ १० ॥ वामन म्हणे तो धन्य हरिदास ॥ भक्तीनें देवास प्रीय सदा ॥ ११ ॥

## ॥ अभंग १६ ॥

श्रीगुरुसी द्यावा मन हा पदार्थ ॥ साधावा पुमर्थ निजभावें ॥ १ ॥ निजभावें सेवा करोनी निष्टंक ॥ होउनी निःशंक भजावें त्या ॥ २ ॥ त्या-मुखें श्रवण तयाचें मनन ॥ तन्निदिध्यासन साक्षात्कार ॥ ३ ॥ साक्षात्कारें मुक्ती जीवा अनायासें ॥ नलगे सायासें व्रत तया ॥ ४ ॥ व्रत तप नेम सद्गु-रूचे पाय ॥ वामना साहाय परमार्थीं ॥ ५ ॥

## ॥ अभंग १७ ॥

माझा राम देव मायबाप बंधु ॥ धनी कृपासिंधू सर्व गोत ॥ १ ॥ सर्व गोत कामा न येती निदानीं ॥ राम हा निर्वाणीं अधिष्ठान ॥ २ ॥ अधि-ष्ठान सर्व एक रघुवीर ॥ अभाविकां दूर सर्व गत ॥ ३ ॥ सर्वगत एक हृदयीं प्रकाशे ॥ देहादि विनाशे अविनाश ॥ ४ ॥ अविनाशवस्तु एक आत्माराम ॥ वामन निष्काम भावितसे ॥ ५ ॥

॥ अभंग १८ ॥

आत्मारीम विष्णु हृदयमंदिरीं ॥ जानकी सुंदरी बुद्धिमाता ॥ १ ॥ बुद्धिमाता शक्ती शिव लक्ष्मण ॥ भावगजानन भरत हा ॥ २ ॥ भरत विराग शत्रुघ्न हा ज्ञान ॥ सूर्य हनुमान भक्त लक्ष्मी ॥ ३ ॥ लक्ष्मीतसे सदा हें पंचायतन ॥ राघवा चिंतन एकचित्तें ॥ ४ ॥ एकचित्तें मौनी नंदन वामन ॥ इच्छी आराधन ऐसें देवा ॥ ५ ॥

॥ अभंग १९ ॥

प्रपंचसुखाची तुजला हाऊस ॥ सुख साधनास रामा अर्पी ॥ १ ॥ अर्पुनीयां देवा भोगीं तूं विषय । नीतीनें निर्भय इच्छा जरी ॥ २ ॥ इच्छा जरी भाव पूजाउपचार । उत्सवप्रकार पुण्यतिथी ॥ ३ ॥ नानापरी देवा विलाससंभोग । कीर्तनाचा योग वारंवार ॥ ४ ॥ पुराणश्रवण हरि-जागरण । स्तवन गायन नामघोष ॥ ५ ॥ देवसंबंधाच्या निष्काम पुण्यानें । विराग तयानें मोक्षसुख ॥ ६ ॥ सर्व सौख्यदात्या सगुण रामाचें । भजन सुखाचें वामना रे ॥ ७ ॥

॥ अभंग २० ॥

प्रापंची सज्जन स्वधर्म नीतीनें ॥ लौकिक रीतीनें वर्तताती ॥ १ ॥ तेणें इहपर खुशाल नांदती । सुखातें भोगीती सर्वकाळ ॥ २ ॥ सज्ञान ब्राह्मण विरागी सुपात्र । विचारें स्वतंत्र परमार्थी ॥ ३ ॥ निष्काम स्वकर्मज्ञान ईशशक्ती । असावी विरक्ती जयालागीं ॥ ४ ॥ तया अधर्मानें पराय विपया । स्पृहेनें असूया कशासाठीं ॥ ५ ॥ दीना त्रास देणें कपट करणें । पराय चोरणें योग्य नाहीं ॥ ६ ॥ प्रापंचिकां ज्ञान सांगणार जे कीं । तेचि अविवेकी हें आश्चर्य ॥ ७ ॥ स्वधर्माची शोभा हरक दुष्कर्म । टांकी घे सत्कर्म वामना रे ॥ ८ ॥

॥ अभंग २१ ॥

दत्तात्रयबोध, स्वामी रघुनाथा ॥ त्यांचा मौनीनाथा ब्रह्मबोध ॥ १ ॥ मौनीनाथ संता, वस्ती जामनेरीं ॥ वृत्ति रोजगारी उदासीन ॥ २ ॥ गृहस्थ असतां, प्रपंचीं विरक्त ॥ देवगुरुसक्त मन ज्याचें ॥ ३ ॥ देशीक अंतारें, जाणे भगवंता ॥ मौनीनाथाप्रत बोधितसे ॥ ४ ॥ यतिरूपें स्वप्नीं, दृष्टांत देऊनी ॥ जावें जनस्थाना दर्शनास ॥ ५ ॥ रघुनाथगुरु, तया प्रबोधानें ॥

कृतकृत्य व्हावें याच देहीं ॥ ६ ॥ मौनीनाथ ऐसें, सुशर्म जाणोनी ॥ तें काम टाकोनी आनंदानें ॥ ७ ॥ आले जनस्थानीं, गंगातटमठीं ॥ होतां गुरुभेटी संतोषले ॥ ८ ॥ बोधूनी देशीकें, प्रेमें मौनीनाथा ॥ कृपाहस्त माथां ठेवियेला ॥ ९ ॥ तत्काळ विमुक्त, संसारा विरोधी ॥ अखंड समाधी ब्रह्मरूप ॥ १० ॥ ब्रह्मरूप मौनी, तेणें जें बोधिलें ॥ भवाब्धि तरले अनायासें ॥ ११ ॥ गुरुदेव मौनी सौख्यद भाविकां ॥ वामन सेवका त्राता तोचि ॥ १२ ॥

## ॥ अभंग २२ ॥

व्यास नारायण भगवंतवाणी ॥ गीता सकळांनीं वंदीजेली ॥ १ ॥ श्रीशंकराचार्य भाष्यकारवाणी ॥ प्रासादिक जनीं वंद्य असे ॥ २ ॥ दुजे साधुजन तया ग्रंथवाणी ॥ जाणावी सर्वांनीं स्पष्ट रीतीं ॥ ३ ॥ ऐसे थोर साधू स्पष्ट ग्रंथकार ॥ परां उपकार तयांचेनि ॥ ४ ॥ क्लिष्ट काव्यकर्ते जयां अर्थ गूढ ॥ तयां ग्रंथा मूढ काय करी ॥ ५ ॥ सज्ञानी शंकर व्यासग्रंथ-अर्थ ॥ तयानें समर्थ कृतकृत्य ॥ ६ ॥ डोंगर कोरोनी उंदिर काढिला ॥ अन्यार्थ निघाला ऐसें नाहीं ॥ ७ ॥ क्लिष्ट स्पष्ट ग्रंथां तात्पर्य तें एक ॥ उभयां विवेक दुजा नाहीं ॥ ८ ॥ क्लिष्ट काव्यग्रंथां पंडित मानीती ॥ गीता भागवतीं प्रेम सर्वां ॥ ९ ॥ सर्वांला जें गोड तेंचि जनार्दना ॥ सर्वांचे कल्याणा देवा कृत्य ॥ १० ॥ सर्व उपयोगी भक्तिज्ञानग्रंथ ॥ वामना सुपंथ दावियेला ॥ ११ ॥

## ॥ अभंग २३ ॥

मनुष्याचे प्रेमीं आदर प्रेमाचा ॥ नसे, सुतकाचा लोभ फार ॥ १ ॥ लोभ नाहीं जीता त्याचे देहावर ॥ क्रियेचा आदर मेल्यावरी ॥ २ ॥ मेल्यावरी श्राद्धा संतोष मानुनी ॥ द्रव्य खर्चोनी दंभ करी ॥ ३ ॥ दंभें लोकीं जया गुणाची हाऊस ॥ वादाचा पाऊस जीतेपणीं ॥ ४ ॥ जीतेपणीं सुख मेल्यावरी धर्म ॥ हें देवा सुकर्म दे वामना ॥ ५ ॥

## ॥ अभंग २४ ॥

स्वामी नारायण विरक्त महंत ॥ मौनीनाथ संत गुरु माझा ॥ १ ॥ गुरु माझा देव मायबाप बंधु ॥ धनी कृपासिंधु सर्व गोत ॥ २ ॥ सर्व गोत मौनी ब्रह्मबोधदाता ॥ तोचि माझा पीता रामरूप ॥ ३ ॥ रामरूप सर्व

विश्व चराचर ॥ परी साक्षात्कार मौनीनाथा ॥ ४ ॥ मौनीनाथा हृदयीं प्रगटला राम ॥ वामन निष्काम भावीतसे ॥ ५ ॥

॥ अभंग २५ ॥

पिता नारायण मातोश्री यमुना ॥ पितृव्य वामना उद्धवचि ॥१॥ शिवराम बंधू छळी जया तृष्णा ॥ भागीरथी कृष्णा गंगा स्वसा ॥ २ ॥ गुरुभक्तीसाठीं राहे सुसंगती ॥ काशी माई सती एकनिष्ठ ॥ ३ ॥ तया बोले माता जातां अंतकाळीं ॥ वामना सांभाळीं क्रिया बाळा ॥ ४ ॥ मातेच्या वचना पाळोनियां मातें ॥ दीन अपंगातें रक्षीयलें ॥ ५ ॥ जयाचेनि योगें सर्वार्थ वामना ॥ दैशिक चरणा वंदीतसे ॥ ६ ॥

॥ अभंग २६ ॥

साधू तो विद्वत्ता दाखविना लोकीं ॥ साळा भोळा जो कीं स्वभावानें ॥१॥ अर्थरूप ज्याची भोंगळ कविता ॥ गद्यपद्यचिंता नाहीं जया ॥ २ ॥ पतिव्रता नारी राहे साळी भोळी ॥ निरी तंग चोळी असो नसो ॥३॥ खरी नारी जी का न दावी नखरा ॥ शैलुष तो परा दावितसे ॥ ४ ॥ कद्रू वृंदावन सुंदर कोमळ ॥ तसें अन्य फळ कां न दिसे ॥ ५ ॥ कोणी स्त्री विषयश्रृंगार वर्णीती ॥ नाना अर्थ चित्तीं बहिर्मुख ॥ ६ ॥ प्रायशः विद्वान साधू ते नसती ॥ कुतर्कें ठकती परमार्था ॥ ७ ॥ अभ्यासें शिकला अर्थफळविद्या ॥ प्रत्यक्ष अविद्या जाणावी ती ॥ ८॥ आत्मज्ञानविद्या जया तो धुरीण ॥ द्रव्य आणि तृण सम जया ॥ ९ ॥ सर्व लोकसम जयाचिया दृष्टी ॥ साधू एक सृष्टीं जाणावा तो ॥ १० ॥ तरले गजेंद्र गोपिका गोपाळ ॥ उपमन्यु बाळ भोळे जीव ॥ ११ ॥ भोळा भक्त साधू तयातें वामन ॥ श्रीमौनीनंदन वंदीतसे ॥ १२ ॥

॥ अभंग २७ ॥

विप्र देह येतां जरी ॥ वैराग्याची इच्छा वरी ॥ १ ॥ विप्र असंतोषें नष्ट ॥ परआशायोगें दुष्ट ॥ २ ॥ द्विज स्वकर्मांची शोभा ॥ खरी भक्ती पद्मनाभा ॥ ३ ॥ जो ब्राह्मण खरा योगी ॥ ब्रह्मसुख सदा भोगी ॥ ४ ॥ दयाभूत जो ब्राह्मण ॥ वंदी तयातें वामन ॥ ५ ॥

॥ भूपाळी ॥

या नरदेहीं पुण्योदयीं ॥ आत्मप्रबोध मित्रोदयीं ॥ राम सच्चिदानंद

हृदयीं ॥ सद्भावें सिद्ध पूर्ण हा ॥ध्रु०॥ साक्षात्कारी हें दर्शन ॥ तेणें कृतकृत्य होउन ॥ ईश्वरअनुग्रहा स्मरून ॥ प्रेमभरें गर्जत ॥ १ ॥ धन्य धन्य हें आत्मज्ञान ॥ जेणें नाशिलें अज्ञान ॥ दुःखमूल भवा निदान ॥ सपरिवार लोपलें ॥ २ ॥ नामरूपात्मक जगनग ॥ राम सुवर्ण हें सर्वंग ॥ अस्ति-भातिप्रिय अभंग ॥ जगनग भ्रम व्यर्थचि ॥ ३ ॥ शत्रू कामादि दुर्जन ॥ अहंता ममता अभिमान ॥ यांचें समूळ अदर्शन ॥ स्वानुभवप्रतापें ॥ ४ ॥ भावाभाव लोपले सगुण ॥ प्रगट समाधि निर्गुण ॥ वामनदास म्हणे निजखुण ॥ सद्गुरुकृपें जाणिजे ॥ ५ ॥

## ॥ भजन ॥

रामा रामा रामा रामा श्रीरामा ॥ रामा रामा रामा रामा जय रामा ॥ रामा रामा रामा रामा पूर्णकामा ॥ रामा रामा रामा रामा घनश्यामा ॥ रामा रामा रामा रामा दीनबंधू ॥ रामा रामा रामा रामा कृपासिंधू ॥ रामा रामा रामा रामा पतीतपावना ॥ रामा रामा रामा रामा जगज्जीवना ॥ रामा रामा रामा रामा दीनानाथा ॥ स्वामिचरणीं अनन्य असो आमचा माथा ॥ श्रीराम समर्थ ॥

## ॥ प्रार्थना गीत ॥

धन्य अनुग्रह आतां रामा क्षमा करा दयाळा ॥ मनोरथ पूर्ण केले ही तुमची लीळा ॥ ध्रु० ॥ तुम्हां आम्हीं श्रमविलें स्वकीय काजा ॥ तुम्हांविण आम्हां कोण असे हो दुजा ॥ १ ॥ सदासर्वकाळ रामा तुमचें ध्यान ॥ मना लागो हेंचि आम्हां द्यावें हो दान ॥ २ ॥ वामनदास म्हणे आम्हां प्रसाद खरा ॥ मना तुमचे चरणीं ठेऊन जाणें हो घरा ॥ ३ ॥

## ॥ लावणी १ ॥

कली पातला धर्म लोपला अविवेक मातला घरोघरीं ॥ पुत्र पित्यासी वक्र-दृष्टिनें कलह करीतो परोपरी ॥ ध्रु० ॥ परांगना जी स्वीय अंगना समजुनी तीची आस करी ॥ दिवसयामिनी कामिनीछंदें काळ घालुनी वया हरी ॥ होउनी बावा करुनी कावा ढांगा ढोंगा जनीं करी ॥ डौलचि मोठा पुस्तक पाठा माळ मनगटा दावी करीं ॥ परधन जाया लाउनी माया निर्मळ काया बाह्य बरी ॥ सत्य दाउनी असत्पथानें परा वस्तुसंग्रहा करी ॥ स्नानसंध्या

साधित सिद्ध्या शास्त्राध्ययना कष्ट करी ॥ कपटचि हे वामनीं असोनी परावंचना सदा करी ॥ ऐसा दांभिक भाविक लोकां भोंदुनी पैका नष्ट करी ॥ यमरायाचे सदन आसनीं त्याची नित्य मिरास खरी ॥ १ ॥

## ॥ लावणी २ ॥

अवचित हा नरदेह लाभला परमार्थाचा मार्ग धर ॥ जगदीशाला शरण जाउनी दुस्तर हा भवसिंधु तर ॥ ध्रु० ॥ प्रपंचधंदा करित रिकामा कधीं होसिल मोकळा ॥ आयुष्य सरतां निघून जासी अंतकाळीं येकला ॥ शरीरकष्टें द्रव्य जोडिलें वस्तुसंग्रहा करिं सकळा ॥ जातां बराबर नये कांहिं रे एक देखिल भोंपळा ॥ पशुवहनादिक येथें राहिल वाडी शेत रे बाग मळा ॥ बंधु मित्र इष्ट सोयरे त्यजुनी जाय सत्कुळा ॥ रागरंग हें ढंग करीसी लोकप्रतिष्ठा कळा ॥ सर्व विद्या परिपूर्ण शीकला हरिभजनावीण त्या विकळा ॥ विद्यामदानें दूर टाकुनी देहबुद्धिला दूर कर ॥ गुरुकृपें ज्ञानामृत सेवुनी निशिदिनीं ब्रह्मविचार कर ॥ १ ॥ भोग भोगुनी तृप्त होउनी करूं परमार्थ विचार बरा ॥ आयुष्याचा नेम नसूनी भोग वासना अनिवारा ॥ नव नव वासना अंत नसे ज्या जेंवी हुताशन तृप्त करा ॥ तेंवीं भोगुनी सर्व भोग हे मना तृप्ति कसी सांग नरा ॥ मनीं वासना नसे जरी तरी दरिद्रभीक्षा योग बरा ॥ सर्व संपदा राज्य असे जरी मनीं काळजी एकसरा ॥ अनुदिनीं त्यासी झोंप नये बरी त्याहुनी योगी निरिच्छ खरा ॥ लक्ष्मीकांत जरि वश त्याला दिनत्व यांचें न मागे वरा ॥ अतृप्तयोगें शक्र दरिद्री विगत वासना ज्ञानिवर ॥ निरतिशय साम्राज्य सुखाची सिद्धि राहिली त्या हजर ॥ २ ॥ दृढ अहंता धरुनि रक्षिला दिवसयामिनी हा काय ॥ अग्नि कृमी वा पशु मुखीं लयातें भस्म विट्रूपा जाय ॥ कवडी कवडी जोडुनी द्रव्या करिसी रक्षणीं ऊपाय ॥ दस्यु अनल हे नष्ट करिती जरी शेष तरी पुत्र खाय ॥ बांधीं हवेल्या माड्या बैठका इंद्रभवनापरि काय ॥ तळीं बारवा विहिरी कारंजीं उदक अंतरीं न समाय ॥ देउळ मंदिरें करुनी सुंदरें बहुवस कीर्ती कवि गाय ॥ परपुरुषार्था वांचुनी सर्व हें प्रपंच गौण सुखप्राय ॥ अंतःकरणशुद्धिलागीं रे बहिरंग साधनें हीं अपर ॥ पुण्याचरण हें यथाशक्ती करिं अंतरंगसाधन उपाय धर ॥ ३ ॥ रमणी वंचना सदा करि मना वरि लटकीच करि माया ॥ अपस्वार्थ इच्छिती कुटुंब आपआपुल्या दाया ॥ जया-

तया जरि कांहीं मिळाले पडती मग पायां ॥ एक वेळ जरि न्यून पडतां मारिती वचन घाया ॥ धन सुत जाया ममत्त्व सोडुनि व्यर्थची हे माया ॥ परमगतीच्या साधनीं लागा साह्य करिल देवराया ॥ कलियुगीं नामस्मरण उपाय श्रीहरिगुण गाया ॥ त्रपा सोडुनी जपा करावें नित्य स्मरावें हरिपायां ॥ वामन दास म्हणे तूं उमज गुरुरायाची कास धर ॥ भक्तिनौकेमाजी बसोनी रामपदातें प्राप्त कर ॥ ४ ॥

## ॥ कटाव ॥ ( कटिबंध. )

रामा सज्जन मन अभिरामा ॥ पुरवीं आमुचे कामा, दुष्टविरामा ॥ध्रु०॥ जय रघुनंदन मुनिजनमंडन दशशिरकंदन सुमनस वंदन करिती तूतें ॥ रामचंद्रा सौख्यसमुद्रा सीताचेतसरोजचंद्रा नामप्रतापें सेतुसमुद्रा अंजनीसुता निजसुखमुद्रा देऊनी त्यातें ॥ सीतारमणा सुहास्यवदना विभीषणा साम्राज्य देउनी समरस केलें दुःखदरिद्रा त्याचे हरोनी ॥ बंधू सुपात्रा परमपवित्रा ज्ञानसुबोधा देउनी त्यांची तमनिद्रा दूर करोनी ॥ निज-भरताला भेटि देउनी संतोषित केलें रामराया गौतमजाया तीची काया लाउनी पायां दिव्य करोनी शापमुक्त ते तत्क्षणींच मग दक्षतेनें रामप्रतापा हृदयीं स्मरूनी ॥ तिजला पाठविलें निजधामा ॥ १ ॥ जय जय रामा मंगलधामा पूर्णकामा मनविश्रामा तुला नेणुनी मूढ जीव हे दुःख भोगिती ॥ मी मम चित्तीं अभिमान वहाति जन्ममरण भय क्लेश सोसिती संसारसुखाची प्राप्ति इच्छिती ॥ बहु श्रमानें विद्या शिकती पराजंवानें द्रव्य जोडिती निजनि-वासा गृहा बांधिती ॥ स्त्रीपुत्रांचा संग्रह करिती अवचित मृत्यु येतां मरती ॥ श्रीदयाळे ऐसें पाहुनी जीवक्लेशा भवपाशापासुनी जीवा मुक्त करावें ॥ युगायुगीं अवतार धरावे साधु रक्षुनी दुष्टांचे संहार करावे या जीवानें भव-सिंधुपासुनी सुखें तरावें ॥ स्वभक्तिनौका कर्णधार गुरु देउनी त्यातें तव प्रेरित अनुकूल वातें निजबोध तटा पावउनी मग ते निर्मुक्तचि केले लीला-विग्रह मायानाटक अन्वर्थचि झाले भक्तपालका बुद्धिचालका भक्ती देउनी मुक्त करावें ॥ निजदासा देउनी आपुले नामा ॥ २ ॥ जय जय निरंजन भवभयभंजन सज्जनरंजन ऐसा महिमा तव भजनाचा ॥ क्षेत्रो-क्षेत्रीं ठाईं ठाईंचा अपार आहे परि परंपरा विशेष महिमा तव संकेतें रचित मुळींचा भक्तिभावना परोपरीचा ॥ तीर्थराज तट मुंबापुर येथें श्रीगुरुछात्रें

निजसाह्य देउनी श्रीठाकुरद्वारामार्गीवरती मुगभाटनामा वाडीमध्यें स्थळा नेमुनी ॥ श्रीरामविग्रह प्रतिमा मूर्ति स्थापुनि सन्निध श्रीगुरुराज-समाधी स्पष्ट पादुका इष्टभाउका ऐसें सुंदर मंदिर तुझें रचूनी ॥ रामा भाविक जन उत्साह करीति पूर्ण मनोरथ त्यांचे होती नवविध भक्ती प्रकार तुझा तव कृपेनें चालो निरंतर वामनाला तव चरणाचा वियोग नसावा श्रीगुरूचा लोभ असावा ॥ हेंचि मागणें रामा विभो घनशामा ॥ ३ ॥

## ॥ कटाव ॥ ( कटिबंध )

प्रार्थिले श्रीसद्गुरू भगवान ॥ भाविकमोक्षनिदान ॥ ध्रु० ॥ हे गुरो निरंजन सदर्थमंडन कुतर्कखंडन षड्रिपुदंडन सज्जन वंदन करिती तूतें ॥ स्वामी यतींद्रा सौख्यसमुद्रा भाविक चित्तसरोजचंद्रा ज्ञानप्रतापें संसार-समुद्रा तारक साधक निजबोध तयांतें ॥ हे गुरु मातें देउनी त्यांतें जन्मजन्म तिहिं सुकृतें करुनी अवचित हा नरजन्म पाउनी ॥ त्रिविधतापतप्त अनुतापें करुनी कायावाचामनापासुनी तूज दैशिका शरण येउनी ॥ त्राहि त्राहि मज असें प्रार्थुनी शुद्ध चित्त अधिकार पाहुनी सदुपदेशा तयां देउनी ॥ त्वंपद तत्पद वाच्य निरसुनी उभय लक्षीं निजऐक्य करूनी पिंडब्रह्मांड चराचर व्यापुनी ॥ एक अखंड सच्चिदानंद लक्षउनी दुर्घट तमनिद्रा दूर करोनी निरतिशय साम्राज्य देउनी दुःखदरिद्रा त्यांचें हरोनी ॥ भक्ति देउनी मुक्तीचें दान ॥ १ ॥ हे गुरुराया अमोल काया नरतनुचें वय जातसे वांया धन-सुतजाया लाउनी माया ॥ कामादिक हे मारिति घाया दाखवीं पायां देउनि ठाया करीं कृपेची निर्मल छाया दे मज स्फूर्ति तव गुण गाया ॥ परम पवित्रा तुझे चरित्रा वर्णनशक्ती दे मज गात्रा रक्ष रक्ष मम अपंग छात्रा ॥ सत्वर दे तव दर्शनयात्रा असुनी साक्षी माझे हरद्रा मदर्थ कैशी तुज निद्रा लागली गुरुमाउली होय पावली नेई राउळीं मूर्ति सांवळी ॥ श्रीरामाची पाहुनि मातें अखंड प्रेमा दे भजनाचा व सुजनांचा संग देउनी हे गुरुवर्या दे पद-चर्या श्रीरामसेवनरूप सत्कार्या करीन असें मज दे तूं धैर्या तसी सुबुद्धि दुष्ट अनार्या ॥ देउनि प्रेरक होई नियोजक स्वामी समर्था सिद्धी पुमर्था अभयवरद होउनि मजला ॥ निजधामाप्रति नेई पावन ॥२॥ स्वामि वरिष्ठा अंतरनिष्ठा जगदुद्धारासाठीं सुंदर विग्रहा धरिलें लीलामात्रें भक्त तारिले ॥ त्रिभुवनमंगल कीर्ति तुझी ही रम्य मनोहर मूर्ति गौर ही ॥ सरल सुबाहू

सुष्ठु नासिक स्पष्ट कोमल ओष्ठ तुझे हे आकर्णनयना सुहास्यवदना वियोगशमना इष्टदर्शना ॥ देउनी साधक संतुष्ट करिसी भालीं चर्चित सीत भस्म हें कापायवस्त्र हें कटीवेष्टित सुरेख निऱ्या मध्यें शोभती दोंदिल उदर नाभि चक्रगति कर्दलिस्तंभापरि हे ऊरू वृत्त पट्ट हे वर्तुल जानू शरीरकांति जसि उदेला भानु ॥ दंडकमंडलु पुस्तकमंडित दिव्य चरण हे स्वजनसेवित स्वीय प्रतापें कलिकाला दंडित ऐसा महिमा तव चरणाचा ॥ छंद देईं मज त्वद्भजनाचा वियोग नसावा श्रीरामाचा लोभ असावा तव दासांचा वामनदास म्हणे तूं अमुचा ॥ म्हणुनी तुजला शरण ॥ ३ ॥

## ॥ श्लोक ॥

अधीं भाविला देव हा रामराजा ॥ सवें प्रार्थिला सद्गुरू स्वीयकाजा ॥ असा ग्रंथआरंभ केला रचाया ॥ यथापूर्ण ही नाममाला जपाया ॥ १ ॥ अंकीं जानकि सुंदरा रघुविरा साकेतिच्या पालका ॥ कंठीं मौक्तिकहार धारक कटीं पीतांबरें नेटका ॥ हस्तें चापशरांकित स्मितमुखा राजीवनेत्रें निका ॥ रामा ध्यान तुझें मनास गमतें दे दर्शना सेवकां ॥२॥ व्यापारी तव ज्योति कोण, दिवसा चंडांशु हा, रात्रि गा ॥ दीपादीक, असोत भास्कर दिवा पाहे असी कोण गा ॥ नेत्रानें, तरि झांकितां अवसरीं नेत्रां, तमा पाहिं गा ॥ तेथें धी, तरि तीस कोण, पुसतां मी, जो स्वयें तूंचि गा ॥ ३ ॥ देवातें कवण्या मी जाणुं पुसतां जो जाणतो मानसा ॥ माझें मानस मीच जाणत असें, तूं देव नाहीं कसा ॥ एको देव असी श्रुतीष्ट वदतां तूं कां स्वयें नेणसी ॥ साक्षी व्यापक एक देव असुनी कां व्यर्थ भांबावसी ॥ ४ ॥ रामा दिनानाथ नामें जरी वारि माझे अघादैन्यतापासि रे ॥ देवोनि नामासि त्वत्पादभक्तीस त्वद्रूण गावावया प्रेम रे ॥ सद्रूपवाक्यार्थ श्रुत्यर्थ बोधास दे देशिका नित्य सत्संग रे ॥ सच्चित्सुखानंत शक्त्या स्वभक्तार्थ धारीसि साकार रूपासि रे ॥ ५ ॥ योगी असा कोण भोगी विरागी असे खास जाणावया त्यास रे ॥ छात्रा मना प्रेम आसे तरि ऐक त्याचे सदाचर्णवृत्तास रे ॥ जो दृष्ट बाह्यार्थ सर्वांस नालिप्त जो नेमि इंद्रीयग्रामास रे ॥ इंद्रीयधर्मा मना संग नोहे मनाचा स्वरूपीं सदा वास रे ॥ ६ ॥ दिनकरअनुतापें दुर्लभा सौख्यनिद्रा ॥ म्हणउनी करि

आम्हां शीतता शांतचंद्रा ॥ तुजविण जग सारें तप्त हें तारकेंद्रा ॥ शशधर तुज वंदूं औषधीशा सुभद्रा ॥ ७ ॥ शशधरहिमवातें कंपिता सर्व काया ॥ म्हणउनि करिं आम्हां उष्णतेच्या उपाया ॥ अरुणकिरणयोगें सौख्य दे देवराया ॥ दिनकर जगसाक्षी वंदना दिव्यपाया ॥ ८ ॥ ऐशी मृगांकां तसि अर्यमाची ॥ निंदा स्तुती टाकुनि उत्तमाची ॥ सर्वा प्रिया उक्ति मनोरमाची ॥ तेणें कृपा होय त्रिविक्रमाची ॥ ९ ॥ शुभ्रांशुपीडा निरसा सुवस्त्रें ॥ चंडांशुदाहा व्यजनें सुछत्रें ॥ ऐशा प्रकारें सगुणी सुमित्रें ॥ अंतर्गुणा घ्या जन हो सुवक्त्रें ॥ १० ॥ श्रीसंत मौनी गुरुपादुका हो ॥ ह्या सिद्धिदा सत्वर भाविकां हो ॥ ज्या सेविल्या अक्षयपुण्यराशी ॥ भावी असे त्यास अखंड काशी ॥ ११ ॥ कायाबला राक्षस सेविताती ॥ प्रज्ञाबला मानव मानिताती ॥ सद्धर्मशीला सुर पावताती ॥ साधू त्रयातें सम भाविताती ॥ १२ ॥ धांवे स्यंदन घडघडा तरि जसा घोडा पळे दुडदुडा ॥ मारी चाबुक तडतडा सुत जसा हस्तक्रिये लुडबुडा ॥ स्वामी तेंवि न लडलडा हि करणें कर्णें मना बुडबुडा ॥ तैसा देहची दुडदुडा फिरतसें आत्मा नसे हुडहुडा ॥ १३ ॥ मायाशक्ति सदा अभीष्टफल दे भक्तास जो स्वेच्छया ॥ दाता ईश्वर भावनासमफला भूभार हारावया ॥ नानादैवत रूप तोचि प्रगटे स्वीयप्रभाचेतसा ॥ जो मूर्तिप्रतिमारुपेंहि फल दे नेदी विभू हा कसा ॥ १४ ॥ मुनिजनअभिरामा सच्चिदानंद रामा ॥ रघुपति सुखधामा जानकीशक्तिवामा ॥ सकल भयविरामा चापपाणी प्रणामा ॥ करुं तुज पुतनामा पावना पूर्णकामा ॥ १५ ॥ जगीं पुत्राचे हो पितरचि स्वता जेंकि असती ॥ कसें जे निर्वैरी समधिच बरे साधु गमती ॥ असे तेची पुत्रासिच विषमता जैं अचरती ॥ तरी त्या पुत्रानें शरण कवणा जावें जगतीं ॥ १६ ॥ जया अंकीं माथा असुनिच मुलें स्वस्थ निजती ॥ स्वता धर्माधर्मा पशुवत पहा जे न बुझती ॥ कृता मैत्री आत्मार्पित विनययुक्ता जडमती ॥ अशा बालद्रोहा नहिं उचित विश्वासु महती ॥ १७ ॥ दिग्वस्त्र रुद्रा धनु आयुधानें ॥ त्या काय भस्में मग बायकोनें ॥ जैं स्त्री, तरी काम अपूर्व द्वेष्टा ॥ पाहोनि भृंगी कृश, मानि कष्टा ॥ १८ ॥ व्याधिग्रस्ताविषयिं करिती पंडिता कर्मवादा ॥ अन्ये विप्रा म्हणतिच तया देवता क्षोभभेदा ॥ जोतिर्विप्रा विपरित ग्रहा बोलती मंत्रवेदा ॥ भूतप्रेता झडप वदती, अंगरोगास वैद्या

॥ १९ ॥ वेदानें स्मृतिशास्त्रभार पठणें होणार तें काय हो ॥ स्वर्गाची फलदायका सकलही कर्मांचि सामग्रि हो ॥ संसाराररचना सुदुस्तरभरा तीच्या विनाशा पहा ॥ ब्रह्मज्ञान शिवाय, उद्यम जसा वाणीपणा सर्व हा ॥ २० ॥ शरीररथ इंद्रियें दश तुरंग त्या मानस ॥ असे प्रबल सारथी सकल कार्यकामीं वश ॥ सदा विषय भोगवी अखिल द्वंद्व जीवास गा ॥ मनें करुनि भासते उपशमी परब्रह्म गा ॥ २१ ॥ अहंकार राजा नरा सभ्य मात्रा ॥ सभा नर्तकी धी धरी ताल गात्रा ॥ प्रकाशीं समस्तांस साक्षी प्रदीप ॥ सदा जो उदासीन ज्ञाता समीप ॥ २२ ॥ माया नामें कामधेनू तियेंसीं ॥ जीवेशा हे पुत्र दोघे विलासी ॥ नित्य द्वैतां प्राशिती सावकाशीं ॥ जे का द्वैत ब्रह्मतत्त्वाविनाशी ॥ २३ ॥ अहंकार वंचूनि बुद्धीस सांगे ॥ नको मोडुं निद्रा जिवाजीव जागे ॥ तरी तूं न मी गे तसें विश्व कैचें ॥ नसे खेळ द्वंद्वा जरी ज्ञान साचें ॥ २४ ॥ यावज्जीव उपासन त्रय जया योग्यां टळेना कदा ॥ ईशाची गुरुची तसीच तिसरी वेदांत शास्त्रामुदा ॥ आधीं ज्ञान प्रसिद्धिसाठीं करितां पश्चात्कृतघ्नत्वता ॥ नाशासाठिंच सर्वदा करि मुनी बाधीत वृत्या स्वता ॥ २५ ॥ श्रद्धाळू मुनि पुण्यकर्मविपर्यीं, पापा न बुद्धी जया ॥ तत्वज्ञां तरि मार्ग हाच बहुधा नेमें असे स्वेच्छया ॥ ज्या पुण्येंकरुनीच ज्ञान उमटे तो काय पापां करी ॥ पुण्याचा जरि पूर्वओघ असतां त्या केवि अज्ञासरी ॥ २६ ॥

## ॥ श्लोक–अनुष्टुप् ॥

मायाशक्ति परात्मा जो स्वभक्तां इष्टदायक ॥ दे फला भावनारूप सर्वांतरनियामक ॥१॥ त्या त्या मूर्तिप्रभावानें ईश्वर फल देतसे ॥ न दे तरी विभू कैसा सर्वव्यापी म्हणोनि तो ॥ २ ॥ तत्तन्मूर्तिप्रदेशांत जरि हा ईश्वर नसे ॥ तरी व्यापक कैसा हो एकदेशित्व येतसे ॥ ३ ॥ सर्वेश्वरानुषंगार्थ-प्रतिमा शास्त्रयोजक ॥ सर्वेंद्रियां समाधार मना एकार्थ स्मारक ॥ ४ ॥ निराकारी नसे चित्त जीवाचें या बहिर्मुखा ॥ साकारीं ठेउनी चित्त ईशातें ध्यायींजे सुखा ॥ ५ ॥

## ॥ दशश्लोकी ॥

चंद्रास पाहुनि अहो कवि काय बोले । तें ऐकतां सुमन राघव भक्त

डोले ॥ चंद्रासवें स्मरण मानस रामचंद्रा । वर्णीतसें विरह ज्यास्तव नाहिं निद्रा ॥ १ ॥ हा चंद्रमा यामिनि शीत आहें । ज्या रामचंद्रा चिरशांतताहे ॥ या चंद्रम्या हो क्षयवृद्धि फार । जो रामचंद्र स्थिर निर्विकार ॥२॥ न्यूनाधिका चंद्रकलाचि होती । कलाविहीना परमात्मज्योती ॥ कधीं कधीं हा उगवेचि चंद्र । त्रिकाल आनुस्युत रामचंद्र ॥ ३ ॥ हा चंद्रमा होय परप्रकाश । जो रामचंद्राद्वय स्वप्रकाश ॥ चंद्रासवें सौख्य क्षणार्ध प्राप्ती । या रामचंद्रें निजलाभतृप्ती ॥ ४ ॥ या लोकिं चंद्रा वदती कलंकी । सत्कीर्ति रामा भरली त्रिलोकीं ॥ चंद्रा असोनी जन घेति निद्रा । मायातमानाशन रामचंद्रा ॥ ५ ॥ या चंद्रयोगें तनुशीत वारे । रामेंचि आनंदित विश्व सारें ॥ हा चंद्रमा हो चिरकाल रोगी । या रामचंद्रीं रमतीच योगी ॥ ६ ॥ सस्यादिकां वृद्धि सुधाकरानें ॥ मात्रानरा जीवन राघवानें ॥ असोनि चंद्रा गिरिजावरानें । रामा धरीलें हृदि आदरानें ॥ ७ ॥ सस्यादिकें अल्पचि होय तृप्ती । रामें नरा अक्षय मोक्षप्राप्ती ॥ हालाहला शांतक या उपाया । श्रीरामनामा शिव घे जपाया ॥ ८ ॥ या चंद्रसंगें रमणें विमूढा । जो रामचंद्र प्रिय चंद्रचूडा ॥ हा चंद्र पीडी विरहीजनांला ॥ या रामचंद्रें सुख वामनाला ॥ ९ ॥ वाच्यार्थरूपा समजोनि चंद्रा । लक्ष्यार्थ भावा अज रामचंद्रा ॥ ऐसे प्रपंचोनिहि श्लोक सारे । रामाप्ति हो वाचकमानसारे ॥ १० ॥

## ॥ दशश्लोकी ॥

संतप्रसादमहिमा कवि काय बोले । तें ऐकतां सुमन सद्गुरुभक्त डोले ॥ ज्या लाभतो अमित पार नसेचि त्याला । लोकीं दुजी न उपमा तदनुग्रहाला ॥ १ ॥ तीर्थें उधार फळती फळ तें न फार । हे संत शीघ्र फळती फळ तें अपार ॥ जे देव ते शरण त्या स्वपदानतातें । हे आत्मरूप करिती निजसेवकांतें ॥ २ ॥ गुळें पदार्थां जरि मिष्टता ते । गुळस्वरूपा समता न त्यातें ॥ तैसेंचि देवा फळअंशताते । स्वभावदाते गुरुभाविकां ते ॥ ३ ॥ स्वमिष्ट गूळा परि गोडि नाहीं । गुरुकृपा त्या परलोभ नाहीं ॥ स्वसौख्य तेणें निजरूपिं तुष्ट । पदार्थ नेच्छी न तया अरिष्ट ॥ ४ ॥ इंद्रादि देव पदव्या परि त्या असंत ॥ जैं पुण्यकाल सरतां मग भोग शांत ॥ सच्चित्सुखात्म परभाव अखंड संत। देती जया श्रुति वदे जगिं तोचि शांत ॥ ५ ॥ संतानवृक्ष परि कल्पित अर्थदाता । संता तसें न अविनाश-

पदा अनंता ॥ जे देत साम्यपदवी पुरुपार्थरूप ॥ जेणें चुके सुमन-संसृति कष्ट ताप ॥ ६ ॥ जी कामधेनु अपरा परिमीत कामा ॥ दे स्वाश्रितां गुरु सदा करि पूर्णकामा ॥ ज्या देश काल कृत वस्तु तया न छेद ॥ निष्काम ब्रह्मरुप त्या न कदापि खेद ॥ ७ ॥ ज्यांना उदासजन मित्र अरी समान ॥ ज्यांची कृपा विशद दीनजनां निदान ॥ जे कीं अपूर्व दिसती सुखशांत देव ॥ मानापमान नसतां जनिं सुस्वभाव ॥ ८ ॥ ते धन्य धन्य गुरुदेवचि दीनबंधू ॥ जे स्वात्मबोधवचना जणुं शब्द-सिंधू ॥ देवास देवपण ज्या वचनप्रमाण । शास्त्रप्रकाशक गुरू न तया-समान ॥ ९ ॥ लोकीं सदा मननिष्ठचि मौनभाव ॥ मौनी म्हणोनि दुसरा अभिधान भाव ॥ नारायणेंद्रचि सरस्वति स्वामि नांवें। पादारविंद-नत वामन पूर्णभावें ॥ १० ॥

मिति कार्तिक कृष्ण ७ शके १८०३ चे दिवशीं दशश्लोकी केली मुक्काम सिन्नर. ( ब्रह्मपुरीं ) सरस्वती तट. जिल्हा नासिक.

॥ आर्या ॥

सत्संधा रामाचा जगदुद्धारार्थ पूर्ण अवतार। तन्नामसत्र तोडी जनि मृतिरूपा अनादि ही तार ॥ १ ॥ गीती ॥ पतीतपावन रामा मज निज-दासासि नेइगा धामा। पड्रिपु सर्पविषाची दीनदयाळा सगर्व बाधा मा ॥ २ ॥ श्रीगुरुबोधकथारस सर्व रसांमाजि गोड हो सुरस ॥ त्यातें रसिकज-नांनीं प्राशन केला जसा सुधासुरस ॥३॥ रघुनाथ तत्व मौनी द्यावा तव पदिं मला दिना ठाव। ब्रह्मावलोक विग्रह गेला तरि मग असा न ये डाव ॥४॥ ब्रह्मउदधि गुरुदेवा सच्चित्सुखरूप पूर्ण आधार। वामन तरंग तूझा त्या जिवना मग दुजा नसे थार ॥ ५ ॥ सच्चित्सुखघन रामा ब्रह्मचि तूं पूर्णरूप समसिंधू। देवा अगाध नीरा अनन्य जरि मी तुझाच कीं बिंदू ॥ ६ ॥ उदधितरंग तयाचा महाल्प ऐसा उपाधिनें भेद । वास्तव जीवनरूपें पाहूं जातां असेच ना भेद ॥ ७ ॥ रत्नाकरतट मुंबई ग्रामस्थ गुरु ईश इष्ट सुजनांनीं। वामनगुंफित माला घालावी ही स्वकंठिं भजनांनीं ॥ ८ ॥ तुम्ही उदार भाविक गुरुदैवत भक्त संत सुज्ञानी ॥ दीना आश्रय द्यावा परमार्थी कीर्तिमंत तज्ज्ञांनीं ॥ ९ ॥ अवतार मौनिगुरुचा या जगिं झाला जडा तराया हो। तत्पद समरस भजनीं योग्य न दीनां जनांतराया

हो ॥ १० ॥ तक्षक रक्षि धनाला तैसा दुर्जन सदाश्रया रक्षी ॥ स्वपर-स्वार्थ न पाहे अन्यायें जीवना परा लक्षी ॥ ११ ॥ वाक्योपचारपूजा पावो रामा गुरू सुपदकमलीं ॥ भजनीं वृत्ति असो मम सकलां भूतीं तसीच ही नमिली ॥ १२ ॥

## ॥ "श्रीराम सम देव न" वाक्यघटित आर्या ॥

श्रीराम हाचि आत्मा, सुबुद्धि सीता सुशील बंधुजन ॥
प्रियरामपाद मानस, भक्तचि हा एकनिष्ठ हनुमान ॥ १ ॥
रावण अहंपणा त्या, विटंबुनी दुष्ट राक्षसाहंका ॥
जेणें दग्धचि केली, विचित्र मायास्वरूप ही लंका ॥ २ ॥
महींद्र कांता सीता, विद्यारूपी तया विशुद्धि करी ॥
षड्रिपु वैरी जिंकुनि, पाहे रामास स्वीय ऐक्य करी ॥ ३ ॥
सद्रूप राममुद्रा, वळखुनि सीता निमग्न रामपदीं ॥
विसरुनि दृश्य पदार्था, अभेद पतिसमचि होय स्वीयमुदीं ॥ ४ ॥
महदानंदचि रामा, लक्ष्मण लक्षुनि अनन्य भाव धरी ॥
गीतामृतरव श्रवणें, कृतार्थ तो तत्पदा अदास्य करी ॥ ५ ॥
देवा त्वत्पदिं रमती, योगी हृदयाब्जचंद्र तापहर ॥
त्वन्नामआश्रयानें, शमवी विप शांतचित्त शंभुहर ॥ ६ ॥
वदत मुखीं तव नामचि, वाल्मिक मुनिपद वरिष्ठता पावे ॥
ज्या भवसिंधु तराया, रामायण ग्रंथ पोत जन पावे ॥ ७ ॥
नमित पदा तव रामा, जेणें उद्धार गौतमा रामा ॥
मुनिजनमनआरामा, दे गति मजला उदार अभिरामा ॥ ८ ॥
सिद्धस्वरुपिं जयाच्या, रमती यासाठिं नाम अन्वर्थ ॥
श्रीराम हेंचि साधक, वाचे घे सर्व पापशमनार्थ ॥ ९ ॥
श्रीगुरुपादरजाला, चिंतामणि कामधेनु सुरतरुसी ॥
दृश्यद यास्तव नुपमा, पादरजें साध्य ब्रह्म अविनाशी ॥ १० ॥
मृगचर्मपादुकांनीं, कधिं अनवाणीच चालतो योगी ॥
भाविक भक्त भिडेनें, कधिं नरवाहन तयांसही भोगी ॥ ११ ॥
श्रीगुरुराज दयानिधि, दावा मजलागिं तूमचे चरण ॥
अंगीकृत जो त्याचें, पाळण करणें तुम्हां सदाचरण ॥ १२ ॥

अपराधि बाळकाचा, जी माता तिस नसे जसा राग ॥
तैसा शरणागत मम, तुमच्या छात्रा करूं नका त्याग ॥ १३ ॥
वामनकृत ह्या कविता, लक्षुनि अर्थास योग्य कामासी ॥
हे जन सुखवा स्वांता, लक्षुनि छिद्रा नऱ्हां तुम्ही माशी ॥ १४ ॥

## ॥ आरती गणपतीची ॥

जय जय संकटनाशक वरदायक देवा ॥ सुरनर कार्यारंभीं करिती तव सेवा ॥ रंगणिं नाचती घेती तव मंगल नांवा ॥ पुरविसी तूं तत्कामा पाहुनि दृढ भावा ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय जय गजवदना ॥ नीरांजन निज-भावें अर्पी सुखसदना ॥ ध्रु० ॥ शुंडादंडमुखानें शुभदर्शन देसी ॥ चौ हस्तें पुरुषार्थी, नाशुनि अघराशी ॥ अष्टमहासिद्धी ह्या असती तव दासी ॥ फळती तवानुकंपें त्वत्पदिं रत त्यासी ॥ २ ॥ दासा देउनि विद्या तत्तम निरसावें ॥ सच्चित्सुख निजरूपें हृदयीं प्रगटावें ॥ ऐसा तूझा महिमा दर्शन मज द्यावें ॥ गौरीनंदन वंदन वामन करि भावें ॥ ३ ॥

## ॥ आरती गुरुत्रयाची ॥

विधिहरिशंकररूपा त्रिगुणात्मक देवा ॥ सुरसनकादिक मनुजा दुर्लभ तव सेवा ॥ अनुसूया मुनि अत्रि त्यां तूं निजठेवा ॥ भक्तां पुरविसी कामा देउनी दृढ खेवा ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय सद्गुरु दत्ता ॥ रघुनाथायति मौनी नाथा वरसत्ता ॥ ध्रु० ॥ जगदुद्धरासाठीं मनुजाकृति धरुनी ॥ नाशिकक्षेत्रीं वससी गंगातटभवनीं ॥ भाविक नर अज्ञातें निज-बोधा करुनी ॥ तारक रघुनाथा मज आश्रय दे चरणीं ॥ २ ॥ ब्रह्मपुरीं अव-तारा धरुनी गुरुदेवा ॥ भाविक निजजन तारिसी देउनी निजठेवा ॥ नाराय-णेंद्र सरस्वती स्वामी पद केवा ॥ इच्छित मौनीनाथा वामन तव सेवा ॥३॥

## ॥ आरती दत्तात्रेयाची ॥

हरिहरविधिरुप दत्ता जय जय भगवंता ॥ अत्री अनुसूयात्मज वरदायक संता ॥ अवदुंबरतरुछाये तिष्ठसि अनंता ॥ पाळिसि धेनु शुनीतें भूतीं तव समता ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय दत्तात्रेया ॥ पंचारति ओंवाळू तुज अप्रमेया ॥ध्रु०॥ त्रिमुखाकृति अवधूता शोभत विधु भाला ॥ कंठीं स्फाटिक अक्षविलंबित वनमाला ॥ षड्भुजिं त्रिशूल डमरू कमंडलुमाला ॥ धरी

शंखचक्रा कांसे पट पिंवळा ॥२॥ मस्तकिं मुगुटासम धरि त्रिजटा कलापा ॥ करिती साधक स्तवना गाती अलापा ॥ सर्वव्यापक देवा सच्चित्सुखरूपा ॥ वामन तव पद वंदित हारिं मम भवतापा ॥ ३ ॥

## ॥ आरती रामाची ॥

आरति दशरथनंदनाची ॥ जानकीजीवन राघवाची ॥ ध्रु० ॥ मंदस्मित वदनशोभा ॥ पाहुनी मन्मथ स्तब्ध ऊभा ॥ श्यामसुंदर मूर्ति आभा ॥ झळकत मुगुट पद्मनाभा ॥ चाल ॥ धन्य अवतार भक्तकामा ॥ दूत अंजनी-सुत रामा ॥ शक्त दोर्दंड, धरुनि कोदंड, वधुनि दशतुंड, लंका विभीषणा दिली त्याची; पूर्णकामना सुमनसांची ॥ १ ॥ निर्जर अंतरिं तुष्ट झाले ॥ व्योमयानीं वसुनी आले ॥ पुष्पवृष्टिला तिहीं केलें ॥ श्रीरामचरण पाहुनि धाले ॥ चाल ॥ थै थै अप्सरा नृत्य करिती ॥ गंधर्व मंगलनाम गाती ॥ लाउनी सारंग, वाजे मृदंग, करिती समरंग, जयजयकार मंगलाची; गगनीं कोंदली ध्वनी साची ॥२॥ सीतासहित पूर्णकामी ॥ मागुती येउनि स्वीय-ग्रामीं ॥ सिंहासनीं दिव्यधामीं ॥ करितसे राज्य लोकस्वामी ॥ चाल ॥ निर्भय तदा पशुपक्षी ॥ भूगौब्राह्मण संत रक्षी ॥ सर्वसाक्षी, न्याय पक्षी, प्रजा लक्षी, प्रीती भरत शत्रुघ्न लक्ष्मणाची; तया पंचारती वामनाची ॥३॥

## ॥ आरती रामाची ॥

भूभरहरणास्तव तूं देवीं प्रार्थियला ॥ दशरथसदनीं मानवरूपें अवतरला ॥ सीताव्याजें समरिं रावण निर्दळिला ॥ रामा भक्त विभीषण राज्यीं स्थापियला ॥१॥ जय देव जय देव जय देवा रामा ॥ अगणित महिमा तूझा मुनिजन-विश्रामा ॥ ध्रु० ॥ संसृतिचक्रीं फिरतां मुढजन बहु श्रमले ॥ निर्हेतुक सत्कर्मे तिहीं तुज तोषविलें ॥ तत्तरणास्तव दैशिकरूपा तूं धरिलें ॥ भूमानंद स्वरुपीं स्थापित मन केलें ॥२॥ विकसित कमलासम मुख मंदस्मित तूझें ॥ आजानुबाहो सीता वामांकीं साजे ॥ धृतशरधनुपा अद्भुत तव कीर्ती गाजे ॥ विश्वंभर तव दास्यें अंजनिसुत राजे ॥ ३ ॥ भरतादिक भक्तांचें त्वत्पदिं मन रमलें ॥ भगवत्कृपाकटाक्षें भवसिंधू तरले ॥ लक्ष्मणासि उपदेशें निजरुप लक्षविलें ॥ नामाक्षरप्रतापें सागरिं नग तरले ॥ ४ ॥ औपाधिक शक्तिस्तव साक्षी विश्वाचा ॥ उद्भव पालन नाशन करिशी तूं

साचा ॥ वास्तव स्वरुपें ब्रह्मचि निर्गुण ईशाचा ॥ निशिदिनिं वांछित वामन आश्रय चरणांचा ॥ ५ ॥

## ॥ आरती गुरूची ॥

जय जय यतिवर स्वामी अक्षय सुखराशी ॥ त्वत्पदिं प्रयाग फल्गु गोदावरि काशी ॥ जाणुनि तव पदमहिमा त्वत्संन्निधिवासी ॥ त्यांची भ्रांति हराया निजबोधा गासी ॥ १ ॥ जय देव जय देव जय सद्गुरुराया ॥ आरति ओंवाळुं वंदुनी तव पायां ॥ ध्रु० ॥ भस्मांकित तनु हस्तीं धरिसी तूं दंडा ॥ शोभे ग्रंथकमंडलु खंडिसि पाखंडा ॥ रंजित सुवस्त्र तेजें कांसे दोर्दंडा ॥ वास्तव स्वरुपें निर्गुण विरहित करतुंडा ॥ २ ॥ ग्रार्हस्थाश्रमिं तुजला मुक्तीनें वरिलें ॥ मुक्तिसुखास्तव विद्वत्संन्यासा धरिलें ॥ ब्रह्मानंद-समाधी निशिदिनिं मन रमलें ॥ सच्चित्सुखस्वरूपीं मन उन्मन झालें ॥ ३ ॥ तापत्रयदुःखें वहु साधक जे श्रमले ॥ शमादि साधनयोगें दृढ मन जिहिं शमिलें ॥ तारय तारय प्रार्थुनि तव चरणां धरिलें ॥ करुनी सदूप-देशा तद्ज्ञाना हरिलें ॥ ४ ॥ निजमंदिर निजनिकटीं स्थापुनियां रामा ॥ भक्तिप्रभाव संतति निजजनिं सुखधामा ॥ मंगल उत्सव करिती भाविक तव कामा ॥ मौनीचरणा वांछित वामनसुतनामा ॥ ५ ॥

## ॥ काकडआरती ॥

निद्रावसान होतां प्रळयाचे अंतीं ॥ उत्पत्ती पथ ईक्षक ईशा विज्ञसी ॥ जागृत दैवत रामा सच्चित्सुखमूर्ती ॥ भास्कररूपें ज्ञानप्रकाश कारें जगतीं ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय रामचंद्रा श्रीरामचंद्रा ॥ भक्तोद्धारण अर्था त्यज मायानिद्रा ॥ जय० ॥ ध्रु० ॥ नीराजन नरदेहा धरुनी या बोटीं ॥ त्रिगुणाच्या ह्या वाती घालुनी एकवटिं ॥ अज्ञानघृतसहिता हृदयांतरनि-कटीं ॥ कांकडआरति दीपें पाहूं जगजेठी ॥ २ ॥ जय० ॥ नरदेहीं जग-जीवा चारी पुरुपार्था ॥ संपादक क्षम बुद्धि देउनी सामर्थ्या ॥ भक्तां संकटनाशक तत्पालन अर्था ॥ रामा विग्रह इच्छित वामनचरणार्थां ॥ ॥ ३ ॥ जय० ॥

## ॥ शेजारती ॥

जगदीश्वर हे जगदुद्धारा लोकीं अवतरले ॥ सृष्टिविलासें लीलाविग्रहि

व्यापारीं श्रमले ॥ यास्तव माया निद्रावलंबन देवाला गमलें ॥ लक्ष्मी-रूपें सीता तीसह सुखशयनीं निमले ॥ १ ॥ जय जय रामा निजजन-कामा पूर्ण कृपा नयना ॥ शेजारति ओंवाळुनी पाहूं समचरणां ॥ जय देव जय देव ॥ध्रु०॥ चार वाणी पद देह पलंगीं हृदयाचें तल्प ॥ परपुरुपांच्या शयनकाळीं स्तवनाचा जल्प ॥ सनकादिक मुनी भाट करिती त्यांना ते स्वल्प ॥ अगम्य यास्तव विषयी नरातें ज्यांची मति अल्प ॥ २ ॥ प्रलयोदकांत वटपत्रावरि नरजीवन धाम ॥ यास्तव नारायण ऐसें अन्वर्थचि नाम ॥ कोमल रूपें भक्तभावना समाधि विश्राम ॥ शांत स्वरूप धरुनी कामना योगी निष्काम ॥ ३ ॥ जगनग आकृति विक्षेपाचें रामाश्रमहरणा ॥ करा निवांत पररुपकनकीं निजरूपीं शयना ॥ क्रियाशक्ति विक्षेप शक्तीचे झांकुनियां नयना ॥ अर्पुन शेजारतिला तुम्हां वामन करि नमना ॥ ४ ॥

॥ दिंड्या ॥

दयासिंधो हे प्रभो रामराया ॥ शुद्धनामा दे पावन गुण गाया ॥ असे नामाचा योग जया ठाया ॥ तया विघ्नांचा लाग नसे जाया ॥ १ ॥ भक्त-कामा हे सगुणरूप दूजें ॥ शक्तियोगें रे सर्व नाट्य तूझें ॥ भाव पाहुनी करिसी पूर्ण कामा ॥ देत निष्कामा मोक्षतत्व रामा ॥ २ ॥ नष्ट गंगेनें सकल जीवात्पाप ॥ शांत चंद्रें हो अखिल जनां ताप ॥ नाश दैन्याचा कल्पतरूचेनी ॥ जाय पापादि सर्व साधुचेनी ॥ ३ ॥ पक्षपातांचा हेतु नाहिं जेथें ॥ सरल न्यायाला उणें काय तेथें ॥ न्याययोगें हो प्रसाद भगवंता ॥ वदे कीर्तीचें कथन भाग्यवंता ॥ ४ ॥

॥ साक्या ॥

कलियुगिं साधन भूत पवित्रा दे तव अक्षयनामा ॥ निशिदिनिं प्रेमें गाउं चरित्रा त्रिभुवनमंगलधामा ॥ १ ॥ ऐसी आम्हां शुद्ध मती दे सच्चि-द्धन सुखरामा ॥ भवभयपापा नाशउपाया नामा दे विश्रामा ॥ २ ॥ स्वामी देशिक सजल जलद तूं ब्रह्मानंदसम थोर ॥ अधिकारी हा तव बोध गर्जनसुखें सुखित जेविं मोर ॥ ३ ॥ अघ ताप दैन्य एकेक जाय गंगा शशि संतानें ॥ सर्व अनर्थां सद्यचि मुक्त स्वीकृत जो संतानें ॥ ४ ॥ कल्पतरू हा अल्पचि देतो चिंतामणि सामान्या ॥ दे कामधेनुहि दृश्य वैभव शाश्वत गुरु दे मान्या ॥ ५ ॥ अल्पभूमिवर उभा तरू हा सुखवी अन्य जनांला ॥

निजछायेनें शीतल करि दे पत्रपुष्पफलमूला ॥ ६ ॥ स्वल्पार्थानें तुष्ट सदा जो सुखवी तेविं जनांला ॥ भवताप हरोनी साधु पादप दे जो परमपदाला ॥ ७ ॥ दुर्जन साबर बहुत आश्रयीं राहुनि अन्य जनांला ॥ कठोर पीडा देत सदा हो संगें असुख मनाला ॥८॥ गुणेंकरूनी गौरवि आले हरिहर विभूति समर्थ ॥ निर्गुण तेणेंची जया महत्व हें गुरु-नाम आदरार्थ ॥९॥ अल्पचि देणें पितृजननीचें दे अल्पा श्री हारी ॥ अमित पुमर्था दाता सद्गुरु कां न भजे अधिकारी ॥ १० ॥ पुरांधकातें मारि पिना-की केशी कंस हरि मारी ॥ चंडमुंडही मारि भवानी द्वंद्व सकल गुरू वारी ॥ ११ ॥ ध्यानपथानें कृतयुगीं ईश्वर त्रेतीं यजनपथानें ॥ द्वापारिं अर्चनें उपासन कलियुगीं नामजपानें ॥ १२ ॥ युगत्रयीं हो जी फलप्राप्ती तत्फल कलियुगिं आहे ॥ यास्तव यत्न भजनमालेचा मुखीं रामनाम गा हें ॥ १३ ॥ श्रीजगदीश्वर सद्गुरु तुमचे चरणीं टेऊनि माथा ॥ ही भजन-माला भावें अर्पिलि पावन करावी गाथा ॥ १४ ॥ श्रीजगदीश्वर दैशिक त्यांचे गुणानुवादचरित्रा ॥ वामनदासा प्राकृत वाणी वर्णानिं होय पवित्रा ॥ १५ ॥ स्वामी दैशिक माता तूं मम पिसाट विरचित छंद ॥ विलोकुनी तव वामनबाळा पुरविं मनोरथ छंद ॥ १६ ॥

## ॥ सवाई ॥

जो जगकारण पालक नाशक आश्रय पूर्ण करी सकलां ॥ जो हरि सांब विरंचिस शासुनि सूर्यशशी भय दे अनिला ॥ स्थावरजंगमव्यापक जो सम अंतारें पूर्ण असे भरला ॥ सार्वमतें परतत्त्व उपासित तो तूं पदाश्रय दे मजला ॥ १ ॥

## ॥ पाळणा ॥

जो जो जो जो रे आदिपुरुषा, रामा अज अविनाशा ॥ निद्रा करिं बाळा हृषिकेशा, मायाशक्तिपरेशा ॥ ध्रु० ॥ रजप्रधाना परशक्ति, तदाश्रयें गा सृष्टी, तुझा विग्रह दशवदना, मुक्त करीं सुरपाशा ॥ १ ॥ सत्त्वप्रधाना जी विद्या, तद्योगें जगपाळा, विधिहरिशंकर या बाळा, पिता तूं जगदीशा ॥ २ ॥ तमप्रधाना हे माया, तद्द्वारा जगनाशा, प्रळयीं निवांत करिं निद्रा, मायेमाजि रमेशा ॥ ३ ॥ मच्छ कच्छ वराह नृसिंहा, वामन परशुराम रामा, कृष्ण बौद्ध कलंकी तूं धरिसि, भक्तकारणावेषा ॥ ४ ॥ मुनिजन-

मानसीं तूं रमसी, वामनदासा गमसि, हालवी पाळणा कौसल्या, रामा दुष्टविनाशा ॥ ५ ॥

## ॥ श्रीरामाष्टक ॥

स्तवुनि सकल देवीं तोपवीलें प्रभूतें ॥ प्रगटुनि इहलोकीं उद्धरी जो जगातें ॥ अघटित करि कार्या भक्त भूदेव त्यांचे ॥ चरणकमल वंदूं जानकी राघवाचे ॥ १ ॥ मनुजरुप धरोनी प्राप्त भूमंडळासी ॥ अनुजसहित सीता राम साकेतवासी ॥ जनकवचन मानी भोगि आरण्य त्याचे ॥ च० ॥ २ ॥ मुगुट शिरिं जटेचा वल्कलें जो स्विकारी ॥ मुनिसम धरि दीक्षा तापसी पादचारी ॥ त्यजुनि सकल कामा नाम घे शंकराचें ॥ च० ॥ ३ ॥ निजजन-भवहारी तारि देहात्मशोधें ॥ अनुजमिप करोनी ब्रह्मविद्याप्रबोधें ॥ जिवशिव रुप ब्रह्मात्मैक्य वर्णी तयाचें ॥ च० ॥ ४ ॥ क्षितिपति मखिं शोभे राम कोदंडधारी ॥ असुरपति निवारी सज्जनां क्षेमकारी ॥ अवनत मुनिसत्रीं कौशिका तोपकांचे ॥ च० ॥ ५ ॥ अवनि करि पदानें पावना जाड्यरासी ॥ पदरज तिहि शीळा उद्धरे गौतमासी ॥ पुनरपि वधुदाता दिव्य सामर्थ्य ज्याचें ॥ च० ॥ ६ ॥ पवनसुत जयाचा सेवक ब्रह्मचारी ॥ अनुदिनिं करि सेवा राघवा साह्यकारी ॥ सतत करि जपातें रामनामाक्षराचें ॥ च० ॥ ७ ॥ कनकपुरि समर्पी शत्रुच्या सोदरातें ॥ दमउनि अरि दुष्टा सौख्य दे निर्जरांतें ॥ रघुपतिपद अर्थीं ऐक्य हो वामनाचें ॥ चरणकमल वंदुं जानकीराघवाचे ॥ ८ ॥

## ॥ श्रीदत्ताष्टक ॥

विधिहरिहररूपा सद्गुरूराज दत्ता ॥ सकल जग जिवासीं तूझि रे एक सत्ता ॥ सफलित गुरुभक्ता दे मला दर्शनातें ॥ तव पदिं अवडी दे ठाव दे वामनातें ॥ १ ॥ सकल मम मनाच्या वासना रे निवारीं ॥ जननमरण वारी दैन्यसंतापहारी ॥ विपसम विपयांचा वीट येवो मनातें ॥ तव० ॥२॥ अगणित अपराधा राशि माझ्या जरी रे ॥ पतितपुनित तूझ्या अंत नाहीं गुणां रे ॥ गत शरण तुला मी तारिं दत्ता दिनातें ॥ त० ॥ ३ ॥ सकल जनमनांचा साक्षि तूं देवराया ॥ त्रिगुण सगुण काया सज्जनातें तराया ॥ धरुनि भजनमार्गीं रक्षिसी सात्विकांतें ॥ त० ॥ ४ ॥ सकल जनमतांच्या

देवता रे अनेक ॥ सकल सुर तयां जो स्वामि रूपंचि एक ॥ अखिल जग तुलाची वश्य सर्वेश्वरातें ॥ तव० ॥ ५ ॥ बहुविध गुरुरूपें सत्त्वशीला तनूंतें ॥ धरुनि निजरुपाचा बोध देशी दिनांतें ॥ निवटुनि भवदुःखा देत स्वीया सुखातें ॥ तव० ॥ ६ ॥ कितिक सगुण तूतें वांछुनी भूतिकामः ॥ सुरतरुसम देवा ध्याति ते पूर्णकाम ॥ फलद विरज भक्तां मोक्ष दे पाव मातें ॥ तव० ॥ ७ ॥ निशिदिनिं भगवंता संग दे सज्जनांचा ॥ तव गुण अनुवादा छंद दे कीर्तनाचा ॥ निजरुप तव धामीं दे मला आश्रयातें ॥ तव० ॥ ८ ॥ समाप्तम् ॥

## ॥ श्रीरघुनाथाष्टक ॥

विषयलंपट मानस मी सदा ॥ सकल लाज तुला तव एकदा ॥ दुरित नाशुनि दर्शन दे मला ॥ शरण मी रघुनाथ असें तुला ॥ १ ॥ चपल मानस दुर्घट नावरे ॥ स्वमित अर्थ तदाधिक हांवरे ॥ परधना वनितादि स्पृहा मला ॥ शरण० ॥२॥ मजकडे अपराध अनंत रे ॥ सहनता समताहि अनंत रे ॥ तुजकडे भगवन् गति दे मला ॥ शरण० ॥ ३ ॥ भवनदींतुन वाहत चाललों ॥ षड्रिपू मकरें बहू चावलों ॥ गुरुरुपें तुंचि नाविक हो मला ॥ शरण० ॥ ४ ॥ निजतनू अबला सुत आवडे ॥ विरति भक्ति सुसंगति नावडे ॥ विरजभाव तवाश्रय दे मला ॥ शरण० ॥ ५ ॥ सुमन मानस हंस दयाघना ॥ परमहंस मना तव कामना ॥ सकल द्वंद्वहरा वर दे मला ॥ शरण० ॥ ६ ॥ अखिल रामरुपीं रमती मुनी ॥ रमविसी सकलां रमसी मनीं ॥ करिं कृपा भवमोचक हो मला ॥ शरण० ॥ ७ ॥ दिनजनां अभयें ब्रिदपाळका ॥ त्वरित पावसि वामन बाळका ॥ फलद राम मनीं अनुभाविला ॥ शरण० ॥ ८ ॥ संपूर्णम् ॥

## ॥ श्रीगुरुअष्टक ॥

गुरुवर यतिरूपी सच्चिदानंद स्वामी ॥ अनुभव सुखराशी जो सदा पूर्णकामी ॥ अभयवरद भक्तां ब्रीद ऐसें जयाचें ॥ चरणकमल वंदूं देशिकेंद्रामराचे ॥ १ ॥ अभिनव करिं जो का दंड घे पात्र वारी ॥ विमल अरुण शोभे वस्त्र कापायधारी ॥ सतत मनन ग्रंथा सूक्ष्म अर्थादिकांचें ॥ चरण० ॥ २ ॥ दिनजन निजबोधें उद्धरी शक्तिपातें ॥ जिवशिवरुप भेदा भेदुनी अक्षपातें ॥ भवगजहरि दासा ज्ञानदातृत्व ज्याचें ॥ चरण० ॥ ३ ॥

निजजन अधिकारा पाहुनी मोक्षदाता ॥ निशिदिनिं रघुनाथा तृप्ति ना ज्यांसि गातां ॥ निगम गहन अर्थीं भाष्य हो स्पष्ट ज्यांचें ॥ चरण० ॥ ४ ॥ अनल अनिल भूमि व्योम आपादिकांतें ॥ निबिड सघन शुद्ध व्यापुनीयां जगातें ॥ निरवयव असे जो ब्रह्मरूपीं तयाचे ॥ चरण० ॥ ५ ॥ सुरतरुसम शोभे दिव्य हा काय ज्याचा ॥ सुमन जरि उपासी इच्छितार्था तयांच्या ॥ सफल त्वरित दे जो नष्टि स्वानिष्ट त्याचे ॥ चरण० ॥६॥ शमदम करुणा ह्या साधनें सिद्धयोगी ॥ सतत करि समाधी सिद्धि साम्राज्य भोगी ॥ विगत सकल तृष्णा भाग्य वैराग्य ज्याचें ॥ चरण० ॥ ७ ॥ अखिल विविध माया नीवटी मोहहारी ॥ जनन मरण वारी वासना अंगिकारी ॥ स्वजन सुखद मौनी सद्गुरूदेव त्यांचे ॥ चरण० ॥ ८ ॥ इति ॥

## ॥ श्री प्रातःस्मरणाष्टकं प्रारभ्यते ॥

अज्ञानापद्विमुक्तस्य ब्रह्मविद्याप्रदायिने ॥ गजाननाय चाद्याय शारदापतये नमः ॥१॥ अज्ञानक्षणदांधस्य ज्ञानालोकप्रदायिने ॥ दिवाकर नमस्तुभ्यं जगद्व्यापारसाक्षिणे ॥२॥ सागरोत्पन्नदेवाय सागराल्हादकारिणे ॥ कलाधराय चंद्राय ओषधीशाय ते नमः ॥ ३ ॥ लक्ष्मीनारायणौ चापि सावित्रीकमलासनौ ॥ जगतः पितरौ वंदे पार्वतीचंद्रशेखरौ ॥ ४ ॥ रमंते योगिनो यस्मिन् श्रुत्या ब्रह्मेति गीयते ॥ सीताचेतोब्जचंद्रो मां रामः पातु सबांधवः ॥ ५ ॥ दत्तश्च रघुनाथश्च मौनिनाथश्च ये त्रयः ॥ गुरवः साधवस्तेषां स्मरणं पावनं नृणां ॥ ६ ॥ तस्मै परमहंसाय मौनिनाथाय साधवे ॥ सच्चिदानंदरूपाय शांताय गुरवे नमः ॥ ७ ॥ मत्स्यः कच्छो वराहश्च नृसिंहो वामनस्तथा ॥ परशुरामश्च रामश्च श्रीकृष्ण बौद्ध कल्किनः ॥ ८ ॥ श्लोकाष्टकं पठेन्नित्यं प्रातःकाले समाहितः ॥ सर्वपापविनिर्मुक्तः कैवल्यं याति वै ध्रुवं ॥ ९ ॥

इति श्रीवामनकृतं प्रातःस्मरणाष्टकं संपूर्णम् ॥

इति भजनमाला समाप्ता ॥

॥ श्री ॥

# श्रीमौनीस्वामिचरित्रप्रारंभः ।

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरू समर्थ ॥ सच्चिदानंदा गजानना ॥ मंगलमूर्ति दयाघना ॥ भवभयरूप विघ्ननाशना ॥ नमूं तुज आरंभीं ॥ १ ॥ जयजयाजी मौनीनाथा ॥ चरणीं ठेवूं तुझे माथा ॥ कृपासिंधु हे समर्था ॥ सच्चिदानंदा श्रीगुरू ॥ २ ॥ स्वामी यतिवरा दिनानाथा ॥ करीं कृपाश्रय मज अनाथा ॥ दर्शक परमार्थाचे सत्पथा ॥ तूंचि एक दयाळा ॥ ३ ॥ माझें प्रेम असो तुझे पायां ॥ स्फूर्ति दे मज तव गुण गाया ॥ हेंचि मागणें सद्गुरुराया ॥ भवनाशका गुरुवर्या ॥ ४ ॥ जगदुद्धारास्तव तूं अवतार ॥ धरूनी वाढविला ज्ञानविचार ॥ अनायासें साधक भवपार ॥ कृपाकटाक्षें करिसी तूं ॥ ५ ॥ सिन्नर नामें ब्रह्मपुरीं ॥ ब्राह्मणवृंद गृहस्थाघरीं ॥ देशपांडेपण कुळकर्ण करी ॥ रत्नपारखी उपनाम ॥ ६ ॥ मूळपुरुष नरसी केशव ॥ त्याचे कुळीं परंपरा झाला जो उद्भव ॥ तयापासूनी भिकारामसंभव॥ तया जनकत्व दिधलें तूं ॥ ७ ॥ स्वराज्यापासूनी चातुर्यदक्ष ॥ अर्थसंपादनीं न्याय निःपक्ष ॥ साधिले धर्म अर्थ काम मोक्ष ॥ चतुर्विध पुरुषार्थ समग्र ॥८॥ नारो भिकाजी नामें विख्यात ॥ ऊर्फ नानासाहेब असे जगांत ॥ नामाभिधानें तुज पूर्वाश्रमांत ॥ लोकप्रसिद्ध गुरुदेवा ॥ ९ ॥ श्रीमंता वेळीं मामलती कारभार ॥ राज्यांतरीं जामनेरीं रोजगार ॥ जनक असतां टाकोनी घरदार ॥ विरागडोहळे तुज होती ॥ १० ॥ न रुचे जनका तव उदासपण ॥ तया वाटे प्रपंचीं नागवण ॥ न व्हावें पितृवचनउल्लंघन ॥ भयें मौन धरिलें तूं ॥ ११ ॥ परमार्थपदीं मना आरोहण ॥ प्रापंचभाषणा मानोनी गौण ॥ संवत्सरत्रय वाचे नियमन ॥ वैराग्य उत्कर्प सदृढ ॥ १२ ॥ एकांतवासा अक्षय करून ॥ संसारत्रासें धरिलें मौन ॥ म्हणोनी लोकीं अन्वर्थ वचन ॥ मौनी नाम प्रसिद्ध ॥ १३ ॥ रोजगारानिमित्त जामनेरीं वास ॥ सद्गुरुसाठीं सतत मनीं ध्यास ॥ असें

वर्ततां यतिस्वरूपास ॥ स्वप्नीं तुवां देखिलें ॥ १४ ॥ श्रीक्षेत्र नासीक जन-
स्थान ॥ तेथें श्रीरघुनाथ भटजी स्वामी विराजमान ॥ स्वप्नदृष्टांतें तन्मूर्ति
अनुमान ॥ प्रत्यक्ष दर्शन घेउनी ॥ १५ ॥ अनन्यभावें शरण जाउनी ॥
प्रेमरसें त्या प्रसन्नउनी ॥ तयाचे अनुग्रहा घेउनी ॥ सदसद्विचार तूं
केला ॥ १६ ॥ नाशिकास राहुनी निरंतर ॥ भक्तिज्ञानविरागीं आदर ॥
रात्रंदिवस परमार्थीं तत्पर ॥ समाधियोगा तूं केलें ॥ १७ ॥ सिन्नरीं तुज-
वांचुनी कुटुंब चिंतातुर ॥ तया न निघे तव वियोगकदर ॥ जनस्थाना
जाउनी गुरुचरणीं सत्वर ॥ यथावृत्त कथियेलें ॥ १८ ॥ श्रीगुरुरायें
आयकोन ॥ तुझी अंतरशुद्ध निष्ठा पाहोन ॥ परमार्थीं अनुकूल देखोन ॥
धर्मिष्ठ कुटुंब जाणोनी ॥ १९ ॥ प्रपंचीं असोनि परमार्थ निर्व्यंग ॥ तुज
घडेल असें वरदान अभंग ॥ देउनी विज्ञापिलें तुज हा सुसंग ॥ विरोधी
नव्हे परमार्था ॥ २० ॥ गुरुआज्ञेस्तव पुन्हा सिन्नरास ॥ वर्तत असतां
प्रपंचीं त्रास ॥ खानपान व्यवहारीं उदास ॥ मना निवास स्वरूपीं ॥ २१ ॥
लक्ष्मीनारायणमंदिरीं ॥ जाउनी रोज भजन करी ॥ प्रेमें ऐकती सर्व
नरनारी ॥ भक्तिमहिमा अगाध ॥ २२ ॥ असें असतां प्रपंचनिमित्त ॥
कार्याकरितां गमन मुंबईंत ॥ तेथील साह्य मंडळी एकमत ॥ करुनी तुज
राहविलें ॥ २३ ॥ प्रपंचपरमार्थी मंडळी सहायक ॥ होउनी शरण तुज
गुरुनायक ॥ कृष्णानुग्रहें त्या मोक्षदायक ॥ सुखकारक सर्वांसी ॥ २४ ॥
दिवसादिवसीं परिजनमेलन ॥ कथापुराण श्रवण भजन ॥ स्नानसंध्या
देवतार्चन ॥ सांगोपांग करिसी तूं ॥ २५ ॥ भाविकां करविलें वेदांतश्रवण ॥
खंडन मंडन युक्तिबोधनीं गहन ॥ अगणित चातुर्य मनोहरण ॥ श्रवणें
श्रोते उन्मन ॥ २६ ॥ असें असतां यथाविधि शरीरधर्म ॥ क्षणभंगुर
जाणावे म्हणोनी निष्कर्म ॥ व्हावें तांतडीनें चतुर्थाश्रम चरम ॥ वालुके-
श्वरीं धरियेला ॥ २७ ॥ तीर्थराजतट परशुराक्षक्षेत्र ॥ बाणगंगा नामें तीर्थ
पवित्र ॥ जाति गोत्र मित्र पुत्र सर्वत्र ॥ टाकून राहे त्या स्थळीं ॥ २८ ॥
श्रीगुरुसमाधिदर्शनास ॥ पुढें जाउनी जनस्थानांस ॥ मठीं राहुनी संन्यास-
धर्मास ॥ यथाविधि आचरलासी ॥ २९ ॥ यतिवर श्रेष्ठ शांति ब्रह्मेंद्र ॥
त्यापासूनी योगपट्ट नारायणेंद्र ॥ सरस्वतीस्वामी तूं सुभद्र ॥ विद्वत्संन्यास
पूर्ण केला ॥ ३० ॥ कितीएक दिवस तेथें राहुनी ॥ गंगास्नान आनि

 ग्रं. क्र. १३० 

भिक्षा सारूनी ॥ श्रीशंकरविलास प्रस्थानत्रय विलोकुनी ॥ आनंदें काळ घालवीतसे ॥ २१ ॥ तव साधुधर्ममहिमा विलोकून ॥ गांवोगांवीं तुज नेती भाविकजन ॥ चार दिवस उत्साह भजन पूजन ॥ पावन करिशी साधकां ॥ २२ ॥ पुनरपि दर्शनोत्सुक परिजन ॥ पुराणश्रवणास्तव पुन्हां नेऊन ॥ मुंबई गिरगांववाडींत तुज ठेऊन ॥ निशिदिनिं सत्संग तिहीं केला ॥ २३ ॥ कायावाचामनेंकरून ॥ श्रवणासाठीं लोटांगणें घालून ॥ भाविक जन शरण येऊन ॥ प्रेमातिशय करितातीं ॥२४॥ जसें आचरती श्रेष्ठ जन ॥ तसें तसें वर्तती इतर जन ॥ ऐसें गीतेंत भगवंतवचन ॥ सन्मार्गप्रवर्तक तेंवी तूं ॥२५॥ आतां बोलूं प्रथम यात्राक्रम ॥ नित्यक्रम सारुनी अल्पमार्ग आक्रम ॥ यात्राप्रकार जसा केला यथाक्रम ॥ क्षेत्र नामें तीं ऐसीं ॥ २६ ॥ शिवपुरीं श्रीत्र्यंबकेश्वर ॥ गंगामूल कुशावर्त सुनीर ॥ शिवालय क्षेत्ररचना मनोहर ॥ सिंहस्थयात्रा तूं केली ॥ २७ ॥ श्रीविष्णुपुरीं नाशिकक्षेत्र ॥ गंगा रघुवीर स्थल पवित्र ॥ गुरुस्थानीं राहुनी पंचरात्र ॥ दर्शनयात्रा तूं केली ॥ २८ ॥ सिन्नरनगरी ब्रह्मपुरीं ॥ पूर्वाश्रम जन्मभूमीवरी ॥ ग्रामरचना सरस्वती-नदीतीरीं ॥ पुनरावलोकन तूं केलें ॥ २९ ॥ तेथून प्रस्थान कोल्हापुर ॥ अघटित देवालय मनोहर ॥ विराजमान भगवती सुंदर ॥ रम्य स्थळ अवलोकिलें ॥ ४० ॥ तेथून राशिनाप्रत जाऊन ॥ तेथें श्रीभगवतीदेवी पाहून ॥ नंतर नरसिंहपुराप्रत येऊन ॥ तेथें पंचरात्र वास केला ॥ ४१ ॥ तेथून प्रस्थान केलें पंढरपुरीं ॥ विठ्ठलक्षेत्ररचना भीमातीरीं ॥ ठाई ठाईं कीर्तनगजर परोपरी ॥ एकसरां नामघोष ॥ ४२ ॥ तेथुनी नरसोबाची वाडी करून ॥ रामदास परळीगडावर जाऊन ॥ श्रीराममूर्तीसन्निध समाधी पाहून ॥ पर्वतीं त्रिरात्र राहोनी ॥ ४३ ॥ तेथुनी वांईक्षेत्रीं येऊन ॥ सुंदर देवालयरचना पाहून ॥ पंचरात्र कृष्णातीरीं राहून ॥ देवदर्शन तूं केलें ॥ ४४ ॥ तेथून महाबळेश्वर पर्वत दुर्गम ॥ श्रीशंकरस्थान पंचगंगासंगम ॥ तेथुनी कृष्णानदीचा उगम ॥ ते तीर्थयात्रा तूं केली ॥४५॥ तेथून शंभुमहादेवाप्रत जाऊन ॥ उंच पर्वतीं शिवदर्शना घेऊन ॥ तेथून फलटनाप्रत येऊन ॥ श्रीरामदर्शन तूं केलें ॥ ४६ ॥ तेथून जेजूर पर्वत गड ॥ निवासस्थान कडेपठाड ॥ विराजमान मल्हारी प्रचंड ॥ तीव्र दैवत देखिलें ॥ ४७ ॥ तेथुनी सासवड चिंचवड करून ॥ आळंदी देहूस

अवलोकून ॥ नंतर भीमाशंकराप्रत येऊन ॥ ज्योतिर्लिंगदर्शन तूं केलें ॥ ४८ ॥ भीमानदी मूल पर्वत अफाट ॥ मार्ग अवघड चढाव घाट ॥ व्याघ्रादि श्वापदांचा गजगजाट ॥ वृक्ष संकीर्ण घनदाट ॥ ४९ ॥ तेथून शेवटीं वज्रेश्वरी ॥ देवी माता भुवनेश्वरी ॥ स्वयंभ उष्णोदककुंडें परोपरी ॥ देवतास्थान देखिलें ॥ ५० ॥ पुन्हां मंडळींनीं तुज प्रार्थून ॥ पूर्ववत गिरगांववाडींत ठेऊन ॥ भाविकां पुराणश्रवण करवून ॥ आनंदें काळ जातसे ॥ ५१ ॥ ऐसें लोटतां कांहीं संवत्सर ॥ उपजला महायात्रा-निश्चयांकुर ॥ भाविकें आश्रय जीवन भरपूर ॥ देउनी अंकुर वाढविला ॥ ५२ ॥ प्रस्थान केलें नाशिकाप्रती ॥ गंगारघुवीर गुरुदर्शन यथाप्रीतीं ॥ केली तीर्थयात्रा क्रम यथारीतीं ॥ कांहीं दिवस राहुनी ॥५३॥ तेथुनी उज्जनी महाकाळेश्वर ॥ ज्योतिर्लिंग भक्तपावन परमेश्वर ॥ दर्शनयात्रा केली यतिवर ॥ स्थानमहिमा अगाध ॥ ५४ ॥ तेथून मथुरानगर यमुनातीर ॥ तेथें विराजे श्रीकृष्ण परमेश्वर ॥ सुखें नांदुनी भक्तां रक्षी निरंतर ॥ ते तूं समग्र अवलोकिलें ॥ ५५ ॥ मग जाउनी वृंदावना ॥ श्रीकृष्णाचे क्रीडास्थाना ॥ सुरम्य मंदिरें अपूर्व रचना ॥ पुष्पवाटिका परोपरी ॥५६॥ नंतर जाउनी श्रीगोकुळा ॥ श्रीकृष्णजन्म भूमिसत्कुळा ॥ श्रीकृष्णचरणाब्जपरिमळा ॥ सेवुनी तृप्त भक्त-भृंग ॥५७॥ ऐसें वृंदावन गोकुळ विलोकून ॥ तेथून ब्रह्मावर्ताप्रति जाऊन ॥ तप आराधनस्थान रम्य पाहून ॥ भागीरथीतीर सुक्षेत्र ॥५८॥ तेथून प्रस्थान अयोध्यानगरी ॥ अपूर्व शहररचना शरयूतीरीं ॥ राजाधिराज श्रीरामचंद्र-पुरी ॥ अयोध्याधीश नांदतसे ॥ ५९ ॥ ठाईं ठाईं देवालयें सुंदर ॥ रम्य परोपरी श्रीराममंदिर ॥ भक्त हनुमान गढीं मनोहर ॥ मना उल्लास पाहोनियां ॥ ६० ॥ तेथून महाक्षेत्र वाराणसी ॥ तेथें विराजमान कैलासवासी ॥ पुण्यभूमि मृत्युलोक कैलास काशी ॥ अपूर्व रचना विस्तीर्ण ॥ ६१ ॥ सगर उद्धरण्यासाठीं भगीरथीं ॥ प्रयत्नें आणिली भागीरथी ॥ त्रैलोक्य-पावन सहाय मोक्षपथीं ॥ साधनभूत साधकां ॥ ६२ ॥ जिचे तीरीं रचना घनदाट ॥ परोपरी एकसरी अपूर्व घांट ॥ अगाध निर्मल नीरपात्र अफाट ॥ नावा सुंदर फिरताती ॥ ६३ ॥ सुंदर मठिया पाटांगणें ॥ नाना दीप नाना तारांगणें ॥ जेंवी आकाशीं शोभती उडुगणें ॥ प्रवाहीं दिसती तेंवी दीप ॥ ६४ ॥ तिचे तीरीं उंच उंच अफाट घांट ॥ त्यांवरी शोभे देवालयांची

थाट ॥ मध्यें मध्यें इमारती गृहरचना दाट ॥ उतार गायघाट पायऱ्या ॥ ६५ ॥ मुख्य दैवतें विश्वेश्वर बिंदुमाधव ॥ धुंडिराज दंडपाणी कालभैरव ॥ काशी गुहा गंगा महामहादेव ॥ तशी भवानी मणिकर्णिका ॥ ६६ ॥ श्रद्धें करावें पंचगंगातीर्थस्नान ॥ नित्य यात्रा देवदर्शन सत्पात्रदान ॥ ब्राह्मणसंतर्पण मंत्रजागरण ॥ कथापुराण शिष्टसभा ॥ ६७ ॥ ठाईं ठाईं वेदघोष ॥ शास्त्राध्ययना उत्कर्ष ॥ वेदांतचर्चा निर्दोष ॥ मना संतोषकारक ॥ ६८ ॥ लक्षानुलक्ष यात्रेस लोक येती ॥ अनेक प्रकारें विश्वेश्वर उपासिती ॥ अधिकारानुरूप तसी गती ॥ भोग मोक्ष देई जो ॥६९॥ अंतीं तारकेश्वर शिव येऊन ॥ तारकमंत्र प्राण्या उपदेशून ॥ अधिकाऱ्या तत्काळ मुक्त करून ॥ देई निरतिशय मोक्षपदा ॥ ७० ॥ अनधिकाऱ्या स्थलमर्यादे ठेवून ॥ भैरवयातना समग्र भोगवून ॥ शुद्धांतःकरण जालिया मंत्रा बोधून ॥ करी मुक्त तयासिही ॥ ७१ ॥ ऐशा रीतीं क्षेत्रमर्यादेंत ॥ ज्या ज्या प्राण्या मृत्यु येत ॥ त्या त्या श्रीशंकर मोक्ष देत ॥ वस्तुमाहात्म्य स्थळविशेष ॥ ७२ ॥ प्राण्या व्यवहारीं सुख विशेष ॥ नाना तऱ्हेचे पदार्थ मिळती अशेष ॥ कारागिरी चातुर्य पाहुनी संतोष ॥ शरीरनिर्वाह उपयोग ॥ ७३ ॥ मिष्टान्नभोजन सर्वत्रांस ॥ अल्प प्रयासें मिळे गरिबां सुग्रास ॥ येनकेन प्रकारें अधु अशक्तांस ॥ शिवप्रसादें अन्नपूर्णा देई अन्न ॥ ७४ ॥ मुखविलास जिलेबी अति सुरस ॥ मोतीचूर चांचणीदार लाडू सरस ॥ दधि चिवडा मोरंबा कारागिरीस ॥ उपमा नसे भूमंडळीं ॥ ७५ ॥ ऐसे क्षेत्रीं तूं एकादश मास राहून ॥ यथाक्रम समस्त दर्शन यात्रा करून ॥ पंचक्रोशी इत्यादि यात्रा हिंडून ॥ गयाप्रस्थान तूं केलें ॥ ७६ ॥ फल्गुतीरगयास्थान ॥ विष्णुपददर्शन यथाविधान ॥ यात्रा सारुनी काशीप्रस्थान ॥ पुनरागमन तूं केलें ॥ ७७ ॥ दयासागरा गुरुवर्या ॥ दे मज अखंड पदचर्या ॥ दिनानाथा सत् आर्या ॥ उत्तम पुरुषा श्रीगुरू ॥७८॥ तुझा पूर्ण निश्चय काशीवासा ॥ वारंवार बोधुनी सांगावें दासा ॥ जैसा जीवनावीण तळमळे मासा ॥ तैसा तुज वियोग न साहे ॥ ७९ ॥ पुनरागमन करावें मागुती ॥ शुश्रूषा करावी सुसंगती ॥ म्हणोनी बरावर अंतोबाप्रती ॥ देउनी गोंविले भावसूत्रीं ॥ ८० ॥ इकडे गिरगांवीं नवें सदन ॥ भक्तरायें तयार करवून ॥ मंडळीहस्तें तुज पत्रा पाठऊन ॥ प्रार्थना करुनी आणिलें ॥ ८१ ॥ जसीं भीष्म-

प्रतिज्ञा अर्जुना जिंकीन ॥ किंवा देवा तव करीं शस्त्रा धरवीन ॥ प्रसंगीं देवें आपुली प्रतिज्ञा हरून ॥ भक्तप्रतिज्ञा सिद्ध केली ॥ ८२ ॥ तेंवी तुझा काशीवास दृढ निश्चय ॥ देहधर्म व भक्तप्रारब्धउदय ॥ होउनी आडवा तीव्रकर्मसमय ॥ प्रतिज्ञावृत्ती खुंटली ॥ ८३ ॥ जेंवी सामर्थ्यें कोरी भृंग काष्ट ॥ तरी कमळा न कुचुंबी अटकोनी कष्ट ॥ भोगी परी भंग न करी प्रेमसुख इष्ट ॥ तेंवी प्रकार हा तुझा ॥८४॥ तेथुनी आगमन प्रयागासी ॥ अवलोकिलें त्रिवेणीसंगमासी ॥ गंगा यमुना सरस्वतीस्नानासी ॥ करूनी तीर्थ पवित्र ॥८५॥ भारद्वाज सोम वासुकीचें ॥ अक्षयवट शेषादि नाना दैवतांचें ॥ वेणीमाधवदर्शन करुनी सर्वत्रांचे ॥ मनोरथ पूर्ण करिसी तूं ॥८६॥ ऐसें करुनी तीर्थाटन ॥ पुन्हां क्रमिला मार्ग कठिण ॥ पुनरपि गंगारघुवीरा भेटून ॥ नासिकीं गुरुदर्शना तूं केलें ॥ ८७ ॥ नंतर येउनी सिन्नराप्रती ॥ जनकसमाधी अतिप्रीतीं ॥ सुंदर बांधविली तिजप्रती ॥ अर्चन योजना तूं केली ॥ ८८ ॥ त्रिरात्र राहुनी सिन्नरास ॥ समाधिअर्चाउत्सवास ॥ करविलें यात्रामावंदें काळाष्टकास ॥ कथाकीर्तन समारंभा ॥ ८९ ॥ पुन्हा येउनी नाशिकास ॥ मुंबईकर धांवले दर्शनास ॥ मंडळी समारंभउत्सवास ॥ करुनी तुज प्रार्थिलें ॥ ९० ॥ लोटांगणें घातलीं चरणांसी ॥ आळविलें तुज गुरुरायासी ॥ उपेक्षूं नको आम्हां दासांसी ॥ भावातिशय तिहीं केला ॥९१॥ अंतरीं जाणुनी मंडळीचें प्रेम ॥ परमार्थउत्सुका व्हावें क्षेम ॥ दया येउनी तयाचें काम ॥ पूर्ण केलें गुरुनाथा ॥ ९२ ॥ नंतर सर्व मंडळीसहवर्तमान ॥ गिरगांवीं केलें तव प्रस्थान ॥ पुनरपि श्रवणें तत्त्वानुसंधान ॥ करुनी सत्काळ क्रमियेला ॥ ९३ ॥ नित्य श्रवण मनन निदध्यास ॥ त्याचा परिपाक समाधी अभ्यास ॥ मनोनाश वासनाक्षयाचे उपायास ॥ बोधकयुक्ती सुंदर ॥ ९४ ॥ अन्नादिपंचकोश देहत्रय ॥ जाग्रदादि अवस्था त्रितय ॥ ज्ञानकर्मेंद्रियपंचविषय ॥ अंतःकरणपंचक ॥ ९५ ॥ प्राणादि सर्व जडवर्ग ॥ अहंममत्वें प्रचंड दुर्ग ॥ अज्ञान उल्लंघुनी दे अपवर्ग ॥ श्रोत्या बोधुनी परमात्मा ॥ ९६ ॥ मना सुटे विषयानुसंधान ॥ श्रोते होती ब्रह्मपरायण ॥ बोधें प्रगटे हृदयीं नारायण ॥ श्रवणमात्रें कृतार्थ ॥ ९७ ॥ श्रवणें देहबुद्धीस नुरे ठाव ॥ हा प्रपंच भासे समूळ वाव ॥ प्रगटती अष्ट सात्त्विक भाव ॥ सहज श्रोत्यां समाधी ॥ ९८ ॥ कीं हें श्रवण निगमाग-

माचें सार ॥ कीं हें भक्तिमुक्तिचें माहेर ॥ कीं साम्राज्यसुखाचा वडिवार ॥ अमृतवर्षाव साधकां ॥ ९९ ॥ ज्या श्रवणाचा अमोघ प्रताप ॥ अधिकाऱ्याचा हरी भवताप ॥ अनधिकाऱ्या करी निष्पाप ॥ सफल जेंवी सुकृत ॥१००॥ जेंवी दारिद्र्या मिळे आयतें धन ॥ किंवा क्षुधिता सिद्धान्नभक्षण ॥ तेंवी श्रवणें परमपद सप्रमाण ॥ प्राप्त होय साधकां ॥ १ ॥ नलगे तीर्थयात्रा खटपट ॥ व्रत तप नेम कर्मांची खटपट ॥ अष्टांगयोग अभ्यासचटपट ॥ शास्त्राभ्यास तैसाची ॥ २ ॥ एक पुरे श्रोत्यां अनुसंधान ॥ तेणें निर्मल होय ब्रह्मज्ञान ॥ इतर साधनां नसे मान ॥ श्रवणें कल्याण आपैसें ॥ ३ ॥ हा सर्व महिमा तव श्रवणीं असे ॥ सांप्रत ऐसा न कोठें दिसे ॥ म्हणोनि भाविकां तव चरणाचें पिसें ॥ सर्वकाळ एकनिष्ठा ॥ ४ ॥ कितीएक वर्षें श्रवणानुष्ठान ॥ अपूर्व वक्ता तूं अधिष्ठान ॥ सज्जन श्रोत्यां सफल गर्विष्ठां न ॥ भावनानुरूप कल्पद्रुमा ॥५॥ अकल्पित उद्भवले देहधर्म ॥ भवितव्य कार्यउदय सत्कर्म ॥ भाविकें जाणुनी पुढील मर्म ॥ स्थलसंकल्प उपजला ॥ ६ ॥ तीर्थराजतट मुंबापुरांत ॥ ठाकुरद्वारमार्गीं मुगभाटवाडींत ॥ समर्याद स्थल प्रसिद्ध जगांत ॥ भूमी विक्रय घेतला ॥ ७ ॥ सर्वीं दशसहस्र मुद्रिका जमवून ॥ सुंदर मंदिर इमारत बांधून ॥ श्रीरामविग्रह मूर्ती स्थापून ॥ समाधिस्थळा नेमिलें ॥८॥ कीं हें ईश्वरसंकेत योगसूत्र ॥ भक्तभावनारचित तंत्र ॥ श्रीरामगुरुमहिमावर्णन सत्र ॥ परमार्थआगर भाविकां ॥९॥ कथा पुराण मंत्रजागरण ॥ वेदांतश्रवण अनुष्ठान ॥ ब्राह्मणसंतर्पण भजनपूजन ॥ नव नव उत्सव जयंत्यादि ॥ ११० ॥ इत्यादि सत्कार्यांकारण तूंचि एक ॥ नवविध भक्तिप्रकार अनेक ॥ श्रीरामोत्सव तव प्रसादें चालो निःशंक ॥ हेंचि मागणें यतिवर्या ॥११॥ लघुबोध स्वात्मबोध ॥ समाधिप्रकरण ग्रंथ प्राकृत सुबोध ॥ वेदांतरचना अगाध ॥ आरत्या पदें अभंग इत्यादि ग्रंथां तूं केलें ॥ १२ ॥ तव गुणमहिमा असे अगाध ॥ मी अल्पवाणीं वर्णितां ये बाध ॥ परी तव भजनाविण मी मदांध ॥ यास्तव अल्प वर्णिलें यथामति ॥ १३ ॥ तव संस्थान चालवावया अधिकार ॥ त्वत्‌शिष्य पूर्वाश्रमींचे पुत्र कामगार ॥ आम्ही उभयतां बंधु वारसदार ॥ दे दोघांस बुद्धी गुरुदेवा ॥ १४ ॥ संपलें येथून निरूपण ॥ श्रीगुरुमहिमाकथावर्णन ॥ मौनिचरित्रनामें ग्रंथ नवीन ॥ वामनदासें रचियेला ॥ १५ ॥

त्राहि त्राहि रे गुरुदेवा ॥ दे मज अखंड तव सेवा ॥ पूर्वपुण्यसुकृतांचा ठेवा ॥ प्रतिबंधमोचक तूं एक ॥ ११६ ॥ विभो करुणाकर सुखसदना ॥ अनाथनाथा भवहरणा ॥ कायावाचामनें तव चरणा ॥ सादरें वंदन करितसें ॥ ११७ ॥ मौनिचरित्रा करिती जे श्रवण ॥ तयां घडे अनेक दैवतांचें भजन ॥ वाचकां पुण्यश्लोक नामस्मरण ॥ भावें प्राप्ती इच्छितार्थां ॥ ११८ ॥ शके सत्राशें सत्याण्णवांतरीं ॥ हा ग्रंथ युवनामसंवत्सरीं ॥ माघ शुद्ध एकादशी मंदवारीं ॥ सिन्नरग्रामीं रचियेला ॥ ११९ ॥

इति श्रीवामनदासविरचितं मौनिचरित्रं समाप्तं ॥

श्रीराम समर्थ ॥ श्रीगुरु समर्थ ॥ शुभं भवतु ॥

श्रीमौनीगुरुचा सुकल्पतरू हा साकार आकार गा ॥
ब्रह्मीं शांतचि होय सागरतटीं मुंबापुरामध्य गा ॥
सत्राशें नव अष्ट भाद्र पहिली तेरावि तीथी यदा ॥
रामाचे निकटीं समाधिरचना ठेवूनि देहा तदा ॥ १२० ॥

श्रीमौनीनाथार्पणमस्तु ॥ श्रीरस्तु ॥



॥ श्री ॥

# अथ सिद्धबोधानुवाद प्रारंभः ।

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीसीतारामचंद्राय नमः ॥ श्री-मौनिनाथसद्गुरवे नमः ॥ अथ श्रीसिद्धबोधानुवादग्रंथप्रारंभः ॥ श्लोक ॥ अथानंतद्वैमातुरचरण वंदूं सम तुझे ॥ असे देवा हस्ते परशु पहिल्या पुस्तक दुजे ॥ भयाज्ञाना जेणें शमन तिसऱ्या लाडु जलज ॥ प्रसादार्थी चौथ्या तव भजनशीलाहि सुखज ॥१॥ सदानंदारूपा परमपुरुषा शक्तिसगुणा ॥ जगाचा तूं साक्षी सुमनसुखदा पापशमना ॥ धरा आपा तेजा पवन गगना व्याप्य भरला ॥ दयासिंधो रामा चरणकमलां वंदुं विमला ॥ २ ॥ दिनानाथा मौनी अभयवरदा दैशिकवरा ॥ घडे आत्मत्वाचा स्वजन अतुरा योगचि बरा ॥ तुझ्यारे सत्संगें भवभयहरा तापशमना ॥ सदा द्वंद्वातीता तव निरुपमा वंदुं चरणां ॥३॥ दत्तावधूत भगवान् रघुनाथस्वामी । जे छात्र संसृतिरुजा सुभिषक्पदामी ॥ वंदीतसे त्रिगुण हंसगुरुस्वरूपा ॥ शांतः कृपाकर जया भवदुःखतापा ॥४॥ श्रीशंकराचार्य परात्मवाद ॥ ज्या प्रीय आख्या जनिं प्रौढपाद ॥ भेदी करी सिंह करि प्रसाद ॥ ग्रंथावलोकें सुमना प्रमोद ॥५॥ संतानरूपी भवमुक्ति कंद ॥ आश्रीतभक्तां पुरवीत छंद ॥ वंदूनि मी तें चरणारविंद ॥ ग्रंथा करीं प्राकृत बुद्धिमंद ॥६॥ श्रीरामा गुरुच्या कृपें वदतसें स्वीयामनारंजिका ॥ ब्रह्मात्म्यैक्यविवेकसारसहिता जी सौख्यदा भाविका ॥ जो का संसृतित्रस्त मानस तया जिज्ञासु सत्साधका ॥ स्वल्पायासविवेचनें करुनियां बोधार्थही लापिका ॥७॥ होते काय तरीहि पूर्वजगता वा सत्यकालान्वयें ॥ श्रोतुर्बुद्धिविबोधनार्थ तरि ही श्रुत्युक्ति प्रश्नान्वये ॥ अध्यारोप तरी वदूनि पहिला भिन्नापवादादये ॥ जें का निष्कल निष्प्रपंच अवधी तें ब्रह्म बोधी स्वयें ॥ ८॥ रज्जूवरी जेंवि दिसे भुजंग ॥ ब्रह्मावरी तेंवि जगा प्रसंग ॥ अध्यस्तआरोपचि निर्विवाद ॥ आधारबुद्धि प्रसवापवाद ॥ ९ ॥ हे देशकालत्रयवस्तु पाही ॥ याचे परिच्छेदविना सदाही ॥ निर्धर्म जे का अविनाशभावें ॥

ब्रह्मा अखंडा जिहीं ओळखावें ॥ १० ॥ अध्यारोपास येथें वदुनिच पहिले तेंवि भिन्नापवादा ॥ तीं हीं अद्वैतब्रह्मप्रवचन समजा लक्षणावृत्तिवादा ॥ अज्ञाना ब्रह्मबोधा सुगमचि वदतो सिद्धबोधानुवादा ॥ नामें ग्रंथा सुवृत्तारचित सुजन हो टाकुनी क्लिष्टवादा ॥ ११ ॥ राम हे प्रभो स्वामिदेशिका ॥ स्फूर्ति द्या मला दीन सेवका ॥ तैंच ग्रंथ हा जाय शेवटा ॥ होय साधका बोध गोमटा ॥१२॥ जसा ऊर्णनाभि स्वयें सूत्र जाला ॥ करी ईश तैसें जगा इंद्रजाला ॥ उपादानरूपें निमित्तेंहि कोळी ॥ तसें कारण ब्रह्म रे सृष्टिकाळीं ॥१३॥ होतें एकचि ब्रह्म पूर्व जगता जें नित्य गा अक्रिय ॥ तें मायासमवेशयुक्त असतां अव्याकृता आश्रय ॥ तें बीजात्मकरूप मायिक असे अव्यक्तसृष्ट्याश्रय ॥ त्यापासूनच व्योम सूक्ष्म उपजे तन्मात्र शब्दालय ॥१४॥ त्या स्पर्शात्मक वायु सूक्ष्म उपजे त्या तेजरूपात्मक ॥ त्या आपाजनिहो रसात्मक तया पृथ्वीहि गंधात्मक ॥ त्या त्या भूतिगुणा स्वकीय असुनी जें पूर्विचें भौतिक ॥ तें भूतीं गुणव्याप्त ब्रह्म सकलां भूतां गुणां व्यापक ॥१५॥ छिद्रधर्मी सदा व्योम ॥ पदार्थां अवकाश दें ॥ शब्दानुमेय ते जाणा ॥ अनुद्भूताद्य भूत जें ॥ १६ ॥ आकाशीं गुण एक शब्दचि असे स्वीयागुणें युक्त ते ॥ वायूचे तरि शब्द स्पर्श गुण हे तेजा गुणा तीन ते ॥ शब्द स्पर्श रुपा असेचि उदका ते चार ते कोणते ॥ शब्द स्पर्श रुपा रसा क्षितिगुणा गंधाधिकां पंच ते ॥१७॥ भूतां सूक्ष्म जनी असीं वदुनियां तत्कार्य हें लिंग गा ॥ भूतां सात्विक अंश भिन्न तरि त्यां श्रोत्रादि इंद्रीय गा ॥ भूतां मीलित सत्व अंश करुनी झालीं मनादीक गा ॥ भूतां राजस अंश भिन्न करुनी कर्मेंद्रियें होत गा ॥१८॥ भूतां राजस अंश सर्वेचि तिंहीं मीळूनि हे प्राण गा ॥ ऐसा लिंगउपाधि सर्व उपजे सूक्ष्मांग जीवास गा ॥ ब्रह्मांडा सकलास हेतु तरि हा हीरण्यगर्भेंचि गा ॥ होतो कारण व्यष्टिभिन्न सकला लिंगा अनुस्यूत गा ॥१९॥ सूक्ष्मापासुनि स्थूलभाव तरि त्या भूतांत रे प्राप्त गा ॥ त्यापासूनि विराट स्थूल उपजे अंशा तया पिंड गा ॥ ज्या पंचीकृत भूतसंभव तसा कर्मे तरी प्राप्त गा ॥ भोगादुःखसुखा सदाऽयतन हे जीवा उपाधीच गा ॥२०॥ बाह्याभ्यंतर इंद्रियें करुनि हो जीं देवतानुग्रहें ॥ अन्वीता असतां अपाप विषयां जें ज्ञान विस्पष्ट हें ॥ तीही जागरिता क्रमास वशगा जीवा अवस्थाच हे ॥ दोघांचा अभिमानवान असतां वा विश्व त्यां नाम हें ॥२१॥ श्रोत्रत्वक्नयनेचिघ्राणरसना हीं पांच ज्ञानेंद्रियें ॥ वाक् पाणी

पदपायुगुह्य तरि वा हीं पंचकर्मेंद्रियें ॥ अंतर्मानसबुद्धिचित्तअहमा हें वृत्तिचातुष्टय ॥ प्राणापानउदानव्यानसम हे जे जीवना आश्रय ॥ २२ ॥ वा आकाश समीर तेज जल भू हें सूक्ष्मभूतपंचक ॥ स्वाविद्यासह काम कर्म मिळुनी गा लिंगपूर्यष्टक ॥ हेंची सूक्ष्मशरीर साधन असे जीवास हें मायिक ॥ करणाचा उपराम होत तरि त्यां जागृत्प्रबोधात्मक ॥२३॥ संस्काररूप ग्राह्यग्राहक असे तें स्वप्न स्फूर्त्यात्मक ॥ दोघांचा अभिमानवान तरि वा जो स्वाप्नशारीरक ॥ तेणें तैजस नाम सर्व वदती जीवास सोपाधिक ॥ रूपें तैजस विश्व यासि समजा हैरण्य वैराजक ॥ २४ ॥ जें अज्ञान ससूक्ष्मस्थूल शरिरां तें हेतु अव्याकृत ॥ ब्रह्माभाससहीत मोहक असे अव्यक्त हें संमत ॥ ज्ञानें बाध्य असेच नाश तरि त्यां जे सत्य बोलों नये ॥ अज्ञोहं अपरोक्षता जरि तरी बोलां असत्या नये ॥ २५ ॥ सत्यासत्य विरुद्धधर्म तरि त्या द्वैरूपता कैशि रे॥ दोघां भिन्न पदार्थ कांहिंच नसे जो दृष्ट कोणास रे॥ स्वातंत्र्यें जरि भिन्नरूप असतां अद्वैतहानी असे ॥ आत्मा भिन्न म्हणों यदा तरि तयां बाधे चिदात्मा नसे ॥२६॥ भिन्नाभिन्न विरुद्धधर्म तरि त्यां प्रत्येक बाधा असे ॥ भिन्नाभिन्नरहीत ऐशि न दिसे कांहींच वस्तू असे ॥ ज्याला आदि न त्यांस भाग म्हणणें अत्यंत खोटेंच हो ॥ जें हेतू समवेत होय तरि त्यां साकारता सिद्ध हो ॥२७॥ तत्कल्पीत समस्त भूतरचना जी अंशरूपें असे ॥ यासाठीं तरि त्यां विचार करितां निर्भागही तें कसें ॥ एकासीच विरुद्धधर्म तरि हे साभाग निर्भाग हें ॥ भागाभागविहीन वस्तुच असी न दृष्ट त्रैलोकिं हे ॥२८॥ ज्याला अनिर्वचनीय शास्त्र वदतें यासाठिं मिथ्याचि गा ॥ अज्ञानां तरि आश्रयाच विषयां निर्भागचिच्छुद्धगा ॥ ब्रह्मात्म्यैक्य अखंड ज्ञान तरि त्यां निर्मूळ हे शांत गा ॥ स्वाज्ञाना तरि पूर्व उत्तर तया दृश्यत्व त्याज्यत्व गा ॥ २९ ॥ जागृत् स्वप्न विशेष ज्ञान नसतां वा वृत्तिनानात्व जें ॥ प्रज्ञा कारणरूप लीन असतां ती सुप्ति गा जाणिजे ॥ ऐसे कारणदेह सुप्ति उभयां जीवाभिमानी असे ॥ तो हा प्राज्ञ समस्तकारण जगा ईशात्मना होतसे ॥ ३० ॥ देहा अन्नमय प्रकोश वदती कर्मेंद्रियें पंचका ॥ प्राणाप्राणमया तसेंच वदती ज्ञानेंद्रियेपंचका ॥ तेणें युक्त मनोमयास वदती जो बुद्धिरूपें निका ॥ जो आनंदमय क्रमेंचि वदती अज्ञान गा तात्विका ॥३१॥ स्थूलशरीरीं अन्नमयातें ॥ सूक्ष्मशरीरीं कोशत्रयातें ॥ प्राणमनो वा बुद्धिमयातें ॥ कारणदेहीं सौख्यम-

यातें ॥ ३२ ॥ जाणुनि ऐसें पंचहि कोशां ॥ तीन शरीरीं याचि प्रशंसा ॥ या सकलांचें आत्मप्रकाशा ॥ वर्तन होतें गा हृषिकेशा ॥ ३३ ॥ जागृत् स्वप्न सुषुप्ति यांहि सकलां विश्वादि हे जीव गा ॥ स्थूलादीक समस्त भोगरचना साक्षी असे भिन्न गा ॥ दृश्याचा व्यतिरेक होत असतां साक्षीन्वयें सिद्ध गा ॥ एकाएक परस्परांत नसती आत्मा सदा एक गा ॥३४॥ जागृत्स्वप्नसुषुप्तियुक्तदिन हें जाती जसें येत रे ॥ तद्योगें सुखदुःख येत असतां जो येत ना जात रे ॥ बालत्वादिक युक्त अन्य शरिरां टाकीतसे घेत रे ॥ जीवा जन्म अनंत होत असतां जो नित्य अव्यक्त रे ॥३५॥ जन्मांध स्वप्नीं सुपदार्थ पाहे ॥ जो पंगु स्वप्नीं स्वगतीस पाहे ॥ स्वप्नीं शिरच्छेद दिसे स्वकीय ॥ संस्कार जन्मांतरिचे न काय ॥ ३६ ॥ मी आहें तरि सिद्ध काय नव्हतों पूर्वीं तरी मीच गा ॥ पूढें मी असणार साच वदनीं लोकां असें वाजगा ॥ त्रैकालीं तरि सिद्धता जरि असी एकाच देहींच गा ॥ देहा पूर्वपरा अनंतजनना घेतां तसी जीव गा ॥३७॥ ज्या पूर्वापरसुकृता अनुमिति कर्मा करी वा तसें ॥ जो पक्षी गमनासमागति तया पाहोनि स्वप्नीं असे ॥ बालाचें प्रथमस्तनाग्रहण हे कैसेनि जीवा असे ॥ नाना जन्म जरी तयास नसतां ऐशी प्रचीती नसे ॥ ३८ ॥ मूढा बुद्धि बरी समस्त मनुजा रूपाकृतीचे ठसे ॥ कर्माकर्मविचार कांहिं नसतां वैषम्य ईशा दिसे ॥ ऐसें हो असतां मनास न कळे जन्मांतरांचें कसें ॥ स्मृत्यादीक विचार एकचि मना एकाचि देहीं दिसे ॥ ३९ ॥ मृत्यूचे तरि लक्षणास वदती अत्यंत विस्मृत्य गा ॥ स्मृत्यादीक मनास धर्म असती आत्मा असे नित्य गा ॥ मी आहें अथवा नव्हेच म्हणुनी वीकल्प कोणा नसे ॥ जागृत्स्वप्नसुषुप्तिकाल समयीं वस्ती अखंडा असे ॥ ४० ॥ एवं त्रिकालीं असतांचि सिद्ध ॥ सद्रूप आत्मा परिपूर्ण शुद्ध ॥ जाणोनि ऐशा अविनाश भावें ॥ सद्रूप ब्रह्म समजोनि ध्यावें ॥ ४१ ॥ ज्या ज्ञानें शशिसूर्यदीप अवघे सद्भाव त्यांचा कळे ॥ जेणें ही अयना सुवर्णगणना रात्रीदिनाची पळे ॥ ज्यायोगें सकळां पदार्थरचना स्वप्नीं नद्या देउळें ॥ भावाभाव समस्त भासत असी ती ज्योति ना मावळे ॥४२॥ निद्रेमाजि अभाव सर्व विषयां द्वैविध्य झाला तरी ॥ जाणूनी सुखरूपतेस वदतो नेणीव जी अंतरीं ॥ कां हो मी बहुकाळ गोड रहसीं निद्रिस्थ होतों जरी ॥ सौख्याची तरि साक्षिता मज असे निर्बाध नीरंतरीं ॥ ४३ ॥

रूपांतें तरि चक्षु जाणत असे चक्षू मनें जाणले ॥ भावाभाव मनाप्रमाणसहिता धीवृत्तिनें पाहिले ॥ बुद्धिर्निश्चयरूप ज्यास कळते तो देव साक्षी असे ॥ त्रैकालीं उदयास्त नाहींच जया सर्वां प्रकाशीतसे ॥ ४४ ॥ रूपा जाणत बाह्य दृश्य विषयां जो चक्षु सर्वांस गा ॥ चक्षूंतें मन जाणते तरि मना साक्षी परात्माच गा ॥ जाणे तो निरपेक्षवृत्ति दुसरी हंवृत्तिनें तीस गा ॥ वेदांतीं स्वपरप्रकाशि वदती निर्वाहका वृत्ति गा ॥ ४५ ॥ जैसा अग्नि स्वयें प्रकाशक जनां तैलाप्लुता वातिनें ॥ तेजःपुंज दिसे उपाधिकरुनी स्वीय प्रभा कांतिनें ॥ तैसा हा पुरुषात्मदेव सकलां दृश्यास हो वृत्तिनें ॥ भावाभाव समस्त जाणत असे जो शुद्ध चित्‌शक्तिनें ॥ ४६ ॥ प्रमाता प्रमाण प्रमेयादि ऐसे ॥ जयाचेनि भासा त्रिपूटी विभासे ॥ तया मान ज्ञानासि दूजें नसे रे ॥ स्वतःसिद्ध भासे स्वयें तेंचि तें रे ॥४७॥ वैश्वदेवीवृत्त ॥ अंतःकरणावच्छिन्न चैतन्ययत्ता ॥ तत्वज्ञ त्यातें बोलतीरे प्रमाता ॥ तैसे वृत्यावच्छिन्न चैतन्ययत्ता ॥ नामें जाणा तेंचि प्रमाणाक्षभूता ॥४८॥ जी कां अर्थावच्छिन्न चैतन्ययत्ता ॥ जाणा ऐसें त्या मेय गा दृश्यभूता ॥ माता माना मेयादिकांतें समस्तां ॥ साक्षीची गा या त्रीपुटीलागीं सत्ता ॥ ४९ ॥ जडजग चितियोगें भासतां तीस कांहीं ॥ अपर जडप्रकाशा बा नसे साह्यता ही ॥ सतत त्रिविधकाळीं वर्ततां लोप नाहीं ॥ अनुभव जरि ऐसा ब्रह्मचिद्रूपता ही ॥५०॥ कधीं मी नसावें असें बा कदा रे ॥ न वाटेच जीवा असावें सदा रे ॥ परप्रेम वाटे जया जीवना रे ॥ त्रिकालीं वसे आत्मकामी सुखी रे ॥ ५१ ॥ आत्माराम सदा असे म्हणुनियां स्वप्रेम जीवां असे ॥ पुत्रादीक समस्त दृश्यविपर्यीं कालें प्रिती बा नसे ॥ यासी हो प्रतिकूल पुत्र असतां अप्रीय वाटे मना ॥ दुर्वृत्तारमणी असे तरि जनीं वाटे भुजंगी जना ॥ ५२ ॥ कालेकाले प्रीय ते दुष्ट होती ॥ कोणी कोणी दुष्ट ते आप्त होती ॥ आत्म्याची बा मुख्य तात्वीक प्रीती ॥ दीनाहीना प्रीयता स्वीयरीती ॥ ५३ ॥ तैसें हो गृह क्षेत्र द्रव्य सकलां अप्रीय वाटे तरी ॥ अग्नी साव तसेंच तस्करभयें ते त्रस्त आहे जरी ॥ रोगग्रस्त जरी शरीर अथवा क्षुत्तृट्‌व्यथा अंतरीं ॥ तेणें अप्रिय होतसेंच नसतां आत्मार्थ होती बरी ॥ ५४ ॥ व्याधिग्रस्तशरीर फार असतां त्यातें म्हणे हें नसो ॥ किंवा इंद्रिय कांहिं व्यंग असतां त्रासे म्हणे हें नसो ॥ क्षुत्तृट्‌व्याधि तया व्यथिष्ट नसतां प्राणा शरीरीं वसो ॥ चिंतेनें

जरि फार व्याकुळ तरी उर्मी मनाची वसो ॥ ५५ ॥ निजप्रेम वाटे दुजी नाहिं गोडी ॥ जगत्कर्तृ देवा विनाअर्थ सोडी ॥ जया शेष तेणें समस्तांचि गोडी ॥ तया ब्रह्म आनंदरूपास जोडी ॥ ५६ ॥ त्रैकालीं कधिं बाध नाहिं म्हणुनी जें सत्य निर्बाध गा ॥ ज्या ज्ञानें सकलां मनादिकरणां शक्ती तरी ज्ञान गा ॥ ज्यायोगें सुखता समग्र विषयां आनंद आगाध गा ॥ जें नाशा जडतांहि दुःख न पवे सच्चित्सुखब्रह्म गा ॥ ५७ ॥ जें सत्य ते चित्सुख तेचि जाणा ॥ पर्यायशब्दा नसतीच नाना ॥ सच्चित्सुखानंद स्वरूप ज्ञाना ॥ बोधार्थ हे शब्द श्रुतिप्रमाणा ॥ ५८ ॥ मिष्टा सिता साखर शीत ध्याना ॥ एकार्थसिद्धी जरि शब्द नाना ॥ किंवा सुगंधी कटु शीत नाना ॥ शब्दें यथा चंदन एक जाणा ॥ ५९ ॥ घट कलशहि नामें सर्व एकार्थ वोध्य ॥ कलशविहिन घटानें अर्थ संपूर्ण सिद्ध ॥ सतचितसुख ऐसे शब्द-सापेक्ष नाना ॥ रहित सकल दृश्या ब्रह्मबोधार्थ जाणा ॥ ६० ॥ वृक्षीं हो स्वगत प्रभेद तरि हा पत्रें फुलें वा फळें ॥ वृक्षा अन्य सजातिभेद समजा वृक्षांतरें वेगळे ॥ वृक्षा तेचि विजातिभेदक पहा शीलादिका हें जसे ॥ ब्रह्मा तेविच तीन भेद दिसती निर्भेद ते गा कसें ॥ ६१ ॥ सतचित सुख ऐसे शब्द भिन्नार्थ नाना ॥ स्वगत त्रिविध रूपें भेद ब्रह्मास जाणा ॥ उभयहि शिवजीवा भेद ब्रह्मा सजाती ॥ चिति जडरुप ऐसा ब्रह्म माया विजाती ॥ ६२ ॥ साकारीं दिसती भेद ॥ निराकारीं तसे न ते ॥ साकार नामरूपेंचि ॥ निर्विकारा न ते विभू ॥ ६३ ॥ शीतप्रकाशामृतरूप चंद्रा ॥ शब्दा जसें लक्ष्यक तारकेंद्रा ॥ सत्‌चित्सुखा एकचि अर्थ लब्धा ॥ ब्रह्मा तसें लक्ष्यक तीन शब्दा ॥ ६४ ॥ येणेंचि भेदा स्वगता नसे उरी ॥ सच्चित्सुखा-नंत विशेषणें वरीं ॥ ब्रह्मा विशेष्या तरि एक लक्ष्य गा ॥ बोधार्थ शिष्या श्रुति शब्दभिन्न गा ॥ ६५ ॥ माया तुच्छ तया न भेद समजा रज्जू भुजंगा-परी ॥ खोट्याचेनि कदा न द्वैत करवे सत्ता न त्या दूसरी ॥ नाधिष्ठान कदापि भ्रांतिच नसे आरोप सत्यावरी ॥ भासे स्वाश्रयनिष्ठ तेच तरि गा अद्वैतभेदा जुरी ॥६६॥ जीवेशा हे आश्रयें वर्तताती ॥ जीच्या ती गा तुच्छ ना तो सजाती ॥ मिथ्या माया कैशि भेदा करीती ॥ भेदाची गा नाहीं शंका विजाती ॥ ६७ ॥ असत्वानिरासा जया सत्यता रे ॥ जडत्वास बाधा-वया ज्ञानता रे ॥ नसे दुःख ब्रह्मा वदे सौख्यता रे ॥ श्रुति ब्रह्मबोधार्थ

सच्चित्सुखा रे ॥ ६८ ॥ उपजति जिहिं भूतें पासुनी या भवांते ॥ तिंहि जर्नि असतांहो पावती जीवनाते ॥ प्रविशत तिंहि अंती प्राप्त होती क्षयांते ॥ मुनि वदति तटस्थालक्षणा ब्रह्म गा ते ॥ ६९ ॥ सतचितसुख जें का ब्रह्म आहे अनंत ॥ वदति मुनि स्वरूपालक्षणा ते पसंत ॥ वरिल प्रथम ऐसी लक्षणा वाच्यकोटी ॥ समजुनि दुजि ध्यावी लक्षणा लक्ष्यकोटी ॥ ७० ॥ उत्पत्ती स्थिति नाश होय सकळां भूतां जयाचेनि हो ॥ ब्रह्मा हेचि तटस्थ-लक्षण असे बोधार्थ हे युक्त हो ॥ सत्यं ज्ञानमनंत ब्रह्मचि असे प्रत्यक्ष जें सिद्ध हो ॥ ब्रह्मा हेंचि स्वरूपलक्षण जया जीवां घडे ऐक्य हो ॥ ७१ ॥ धर्मांची व्यवहारभेदरचना औपाधिका जाणिजे ॥ धर्मीं एक जसा उपाधि करुनी नामा पृथक् बोलिजे ॥ बुध्याभासविशिष्ट जीव म्हणती भ्रांत्या तया बद्धता ॥ दृश्यालंबनरूपता उपहिता साक्षित्व हें वर्ततां ॥ ७२ ॥ त्यालाची उपलक्षितत्व असतां गा शुद्ध कूटस्थता ॥ शेखीं त्या उपरंजकत्व म्हणुनी अद्वैत ब्रह्मात्मता ॥ ऐशीं चार विशेषणें गृहित जीं बोधार्थ ही भिन्नता ॥ एक ब्रह्म विशेष्य व्यापकगती भेदां नसे तत्वतां ॥ ७३ ॥ नीळें पद्म विशेषणेंचि निळता वैशिष्टता जाणरे ॥ तैसा लोहितयुक्त स्फाटिकमणी त्या औपहीतत्व रे ॥ शाखेनें उपलक्षितत्व समजा चंद्रास त्या वेगळें ॥ सूर्यानें उपरंजकत्व सकळां सत्ता प्रकाशा बळें ॥ ७४ ॥ बुध्याभास सबिंब चेतन तरी तो जीव कर्ता असे ॥ व्यष्ट्यज्ञानवधीस आश्रय जया कूटस्थ तो गा तसें ॥ मायाबिं-बित आश्रयासह असे तो ईश सर्वां जगा ॥ बाह्याभ्यंतर एक पूर्णचि विभू चैतन्य तें ब्रह्म गा ॥ ७५ ॥ देहा इंद्रियधर्म आत्मींच खरें मानोनि आरो-प गा ॥ कर्तृत्वाद्यभिमान वाहत अशा बोधा अभेदास गा ॥ त्यासी त्वंपद वाच्य हेच म्हणती कर्तृत्व मानोनि गा ॥ जागृत्स्वप्नसुषुप्ति भिन्न विषयां भोगी असा जीव गा ॥ ७६ ॥ बुध्यादींद्रिय देहधर्म सकळां साक्षी असे भिन्न गा ॥ भासे हो अवबोध केवळ असा जो शुद्ध चैतन्य गा ॥ त्यासी त्वंपदलक्ष्य हेच वदती जो पूर्ण कूटस्थ गा ॥ जागृ-त्स्वप्नसुषुप्तिभासक सदा आत्मा स्वयंज्योति गा ॥ ७७ ॥ निगमशिर सुवाचा वेद्य जो ईश जाणा ॥ सकल जग तयाचा कारणाधारराणा ॥ नियमन करि सर्वां युक्त सर्वज्ञतादी ॥ वदति सुजन त्यातें तत्पदावाच्य वेदीं ॥७८॥ विविधजग उपाधी मुक्त जें शुद्धनित्य ॥ अनुभवअभिवेद्यं द्वैत-

शून्यं हि सत्य ॥ सतचितसुखब्रह्मा ज्या नसे अंत आदी ॥ वदति मुनि तयातें तत्पदालक्ष्य वेदीं ॥७९॥ जीवाचा अधिकार अल्प असुनी किंचिज्ञता ही दिसे ॥ ईशाचा स्वतसिद्ध प्रेरक असा सर्वज्ञताही असे ॥ दोषांसी असि मुख्य अर्थसहिता एकात्मताही नसे ॥ भागत्यागविलक्षणा गृहित जी सोयं असी होतसे ॥८०॥ जीवेशां उभयां उपाधिसहिता किंचिज्ञ सर्वज्ञता ॥ टाकोनी जरि वाच्यभाग मग त्या लक्षासि एकात्मता ॥ जीवा ऐक्य इशा असेच उभयां अन्योन्यतादात्म्यता ॥ जो साक्षी अवबोध तोचि भगवान् तत्त्वं असी पूर्णता ॥ ८१ ॥ तूं ब्रह्म शिष्या असतांचि सिद्ध ॥ देहाभिमानें तरि होसि बद्ध ॥ देहात्मतेनें तरि दुःख आहे ॥ ब्रह्मात्मतेनें सुखरूपता हे ॥ ८२ ॥ स्थूलादीक जडास भिन्न असुनी सूक्ष्माहुनी भिन्न हा ॥ साक्षित्वें स्वतसिद्ध पूर्ण अवघा जो कारणाधार हा ॥ सर्वांभूतिं समग्र व्यापुनि असे साक्षित्वभावास हा ॥ शेखीं टाकुनि जीव ब्रह्म विलसे सच्चित्सुखानंद हा ॥ ८३ ॥ विश्वाचा प्रतिषेध सर्व विषयां जो नामरूपात्मक ॥ त्यातें हो व्यतिरेक हेंचि वदती जो नेतिनेत्यात्मक ॥ अस्तीभातिप्रियत्वरूप तरि त्या ब्रह्मान्वया जाणिजे ॥ जो जो कुंभ दिसे सबाह्य तरि त्यां ती सर्व माती सुजे ॥८४॥ जीवा वस्तु कळावया श्रुति पहा बोधीत सृष्टिक्रमा ॥ साक्षात्कार तया बरा तरि ह्मणे या सर्व मिथ्याभ्रमा ॥ द्वैताचें निरसोनि शांतस्वरुपा अद्वैत नीरूपमा ॥ ब्रह्मा स्वीय असे नरा समज तूं निर्गूणबोधें सिमा ॥८५॥ अज्ञानजीवा विधि कर्मकांड ॥ मध्यस्थ त्यांतें तरि ध्यानकांड ॥ सत्साधका निर्मल ज्ञानकांड ॥ यथाप्रसंगें निगम त्रिकांड ॥ ८६ ॥ द्वैता घेउनि विश्वसर्गरचना सत्यार्थ बोधावया ॥ वेदीं हे उपदेश शास्त्रवचनें मिथ्यार्थ बाधावया ॥ वेदा काय पहा प्रयोजन असे अन्यार्थ बोलावया ॥ ब्रह्मा देशवकालवस्तुविहिना भेदा नसे ठाव या ॥८७॥ रज्जूवरी भुजग कल्पित तेविं माया ॥ जी स्वात्मकल्पक असोनि दुजा पराया ॥ अर्थास कल्पित तया प्रति अन्य द्दष्टा ॥ आत्मा असोनि न भजे सुखदुःखकष्टा ॥८८॥ ब्रह्माविना स्वपरकल्पक नाहिं माया ॥ मायेविना स्वपरभासकता कराया ॥ आत्मा समर्थ नहि पूरुप शक्तिसंग ॥ तादात्म्य कल्पित कसा तरि भेद सांग ॥ ८९ ॥ अमूर्तआकाश तयीं पदार्थ ॥ समूर्त केसे तरि हाचि अर्थ ॥ कशा प्रकारें उभयांहि संग ॥ विचारुनी सांग मला तूं अंग ॥ ९० ॥ संगाविना संग्रह हा तयांत ॥ जाला कसा सांग जसें

मनांत ॥ यद्वा म्हणूं त्या उभयांहि संग ॥ होतो तरी व्योम कसें असंग ॥९१॥ व्योमा पदार्थां तरि जेविं योग ॥ रज्जूभुजंगा उभयांहि योग ॥ कल्पीत संबंध न भेद खास ॥ माया जगातें विमृषा विलास ॥ ९२ ॥ देहादि मूर्तांसह कल्पनेचा ॥ संबंध कैसा तरि वासनेचा ॥ अहंपणें स्पष्ट दिसेच त्यांचा ॥ दोघांपरी सर्व पदार्थ यांचा ॥९३॥ जी कां अमूर्ता नहि मूर्तरूपा ॥ स्थूलापरी दृश्य नसे अरूपा ॥ ती कां अरूपा तरि चित्स्वरूपा ॥ वृत्त्यंतरें स्पष्टचि दृश्यरूपा ॥९४॥ बाह्या घटादीक पदार्थ यांचा ॥ या मूर्त देहांतारें वासनेचा ॥ जी मूर्त ना मूर्तचि शक्ति तीचा ॥ तादात्म्यसंबंध अमूर्त त्याचा ॥९५॥ आकाश आत्मा असती अमूर्त ॥ दोघे तसें व्यापक हे यथार्थ ॥ दृश्यत्व शून्यत्व गुणेंचि व्योमा ॥ बाधा असेना तसि आत्मरामा ॥ ९६ ॥ अमूर्त आत्मा उभयाहि माया ॥ घटादि देहा सुविचित्र बाह्या ॥ पदार्थमात्रा असतीच मूर्त ॥ कल्पीत संबंधचि त्या यथार्थ ॥ ९७ ॥ देहादीक स्थुलाहुनीच असती जी सूक्ष्म इंद्रीय गा ॥ इंद्रीयाहुनि सूक्ष्म मानस पहा तैशाचि तद्वृत्ति गा ॥ त्या वृत्तीहुनि सूक्ष्म ब्रह्म विलसे जें नित्य चैतन्य गा ॥ संकल्पा उदयास्त होत असतां तत्रापि त्या नास्त गा ॥ ९८ ॥ आकाशीं जसि देशकालसवडी अर्था तसा वास गा ॥ ज्या देशीं तरि अंभकुंभ भरला त्या देशिं अन्यार्थ गा ॥ दुग्धापूरित कुंभ अर्थ अथवा हें दुग्ध त्या कुंभिं रे ॥ आसे नातरि देशकालकथनें दृश्यत्व व्योमास रे ॥९९॥ मायेमाजि पहा चराचरजगा या देशकालाविना ॥ आसे बावचि एक हेतु सकलां जीवाश्रया कल्पना ॥ अज्ञाना तरि अंश अल्प असुनी संकल्परूपींच गा ॥ स्वप्नांमाजि मनांत सर्व जग हें मातें कसें चित्र गा ॥ १०० ॥ स्वप्नीं स्वप्नपदार्थ कल्पित जसे माती मनामाजि गा ॥ तैसा बाह्यपदार्थसंग्रह कसा एका मनीं या जगा ॥ जे जे बाह्य जिवा पदार्थ दिसती ते ते मनें भासती ॥ निद्रेमाजि मन प्रलीन असतां दृश्यार्थ हे लोपती ॥ १ ॥ स्वप्नादीक विचित्र सर्व जग हें भासे जरी मानसा ॥ ते गा मानसबुद्धि जाणत असे त्या बुद्धिचेष्टा तसा ॥ भावाभाव समस्त जाणत असे आत्माच कूटस्थ गा ॥ आधिष्ठानविना विकल्परचना पूर्वापरा केविं गा ॥ २ ॥ मायेचा तरी अल्प अंश अवघा संकल्परूपीं असे ॥ ब्रह्माचे तरी अस्तिभातिप्रियता आनंत्यतादी तसें ॥ द्वैता कल्पनरूप अंश समजा संकल्प मायाच गा ॥ संकल्पोस्ति च भातिप्रीय

म्हणुनी आधार ब्रह्मेष्ट गा ॥ ३ ॥ संकल्पें तरि दुःख होतचि मना नाहीं
तरी सौख्य गा ॥ पूर्वींचा तरी नष्ट होउनी पुन्हा अन्या नसे ऊर्मि गा ॥
मध्यें जी अवधी सुशांतचि दशा जी निर्विकल्पांतिं गा ॥ ब्रह्माची स्थिति
तेच स्पष्ट सुखदा संकल्प तूं सोडिं गा ॥ ४ ॥ संकल्पयोगें तरी द्वैत भासे ॥
संकल्प नोहे तरी ब्रह्म तैसें ॥ द्वैतानुसंगें तरी दुःख होतें ॥ अद्वैतभावें
सुखताचि तूं ते ॥ ५ ॥ बीजा भर्जित नाहिं उद्भव तया अंकूरपत्रा कसें ॥
क्षुत्च्छांतीस्तव मात्र भक्षण असे त्या भोग जैसा तसें ॥ ज्ञानाग्नी करुनी
सवासन असे निर्मूळ हें कर्म गा ॥ होतां दग्ध तया पुनर्भव नसे प्रारब्ध
भोगीत गा ॥ ६ ॥ प्रारब्धभोगें तरि शांत होत ॥ संचीत ब्रह्मानुभवेंचि
जात ॥ आगामिकर्मा प्रिय दुष्ट नेत ॥ त्रैविध्यकर्मा गति शांत होत ॥ ७ ॥
ब्रह्मांडीं जरी जीव सिद्ध असती किंवा नवीनाचि गा ॥ त्या जीवां गणना
असेच अथवा नाहीं तयां अंत गा ॥ जे ज्ञानें तरी मुक्त होत असतां तैं
सृष्टिसंकोच गा ॥ अन्यार्थीं नियमेंचि कैंवि सकलीं नेतृत्व ईशास गा ॥८॥
अनंतत्व जीवा तसें जीवकर्म ॥ परेशा कसा त्या नियंतृत्वधर्म ॥ जिवो-
त्पत्तिहेतू कसें जीवकर्म ॥ इशा शक्तिकार्या कसें काय धर्म ॥ ९ ॥ जशी
स्वप्न अर्था दिसे सत्यता रे ॥ तशी जागृदर्था दिसे सत्यता रे ॥ जसें स्वप्न
द्रष्टा नसे अंत जीवा ॥ तसें विश्वद्रष्टा नसे अंत जीवा ॥ ११० ॥ शशशृंग
अज्ञात त्याचेनि योगें ॥ असर्वज्ञता तें जिवानंतयोगें ॥ इशाच्या गुणांचा
जरी अंत नाहीं ॥ तरी सर्व मिथ्या न आश्चर्य कांहीं ॥ ११ ॥ अनंतत्वयोगें
जिवा मोज नाहीं ॥ अनादित्वयोगें जिवोत्पत्ति नाहीं ॥ जसें मोजसंख्या-
विना स्वप्न जीवां ॥ तसें ब्रह्मबोधें विमुक्तत्व जीवां ॥ १२ ॥ अविवेकरूनी
दिसे सत्यता रे ॥ सुविवेकरूनी असे तुच्छता रे ॥ अशी ईशमाया अनंता-
गुणी रे ॥ जगत्कर्तृलीला अगम्या असे रे ॥ १३ ॥ असंख्यात रे पिंड
एकाच अंडीं ॥ असे अंडकोटी धरी शक्ति चंडी ॥ तया शक्त ईशा
परेशाहि पोटीं ॥ असे ईश्वरीं नश्वरीं शक्ति मोठी ॥ १४ ॥ नियंता सदा
जो समस्ता जगांचा ॥ पहा ब्रह्मरुद्रादिकां धाक ज्याचा ॥ भयें वायुचंद्रा-
ऽर्यमानें फिरावें ॥ जयाधीन माया तया त्वां भजावें ॥ १५ ॥ कर्तृत्वाविण
कार्य कांहीं न घडे कर्ताहि कोणी असे ॥ क्षित्यंकूर समग्र कार्यरचना
कर्त्याविनाही नसे ॥ मातीचा घट पाहुनी म्हणति या कोणीही कर्ता असे ॥

ब्रह्मांडा अनुमानमान पहतां कर्तृत्य ईशा वसे ॥ १६ ॥ यथापूर्व भावें जगा देशकालां ॥ जनीं भूतसंघा क्रमे विश्वपाला ॥ यथा बीजअंकूर नेमादिकांला ॥ न भंगी कदाही अशी ईशलीला ॥ १७ ॥ कर्मावीण जरी उगीच अपुल्या प्राप्ती शरीरामता ॥ ऐसे साच तरीही दोष असती अभ्यागमा अकृता ॥ केल्याची तरी हानि स्पष्टचि असे निर्बीज वृक्षागमां ॥ पर्जन्या अतिवृष्टिरूप अथवा आवर्षणा वासना ॥ १८ ॥ यथाकर्मभोगा सदा ईश दाता ॥ जनां जन्मजन्मीं विना पक्षपाता ॥ इशा स्वामिभावा दुजा दासभावा ॥ अविद्याच कल्पी अशा द्वैतभावा ॥ १९ ॥ निद्रारूपें घालवी सारि रात्र ॥ दावीत जीवा क्षणकाळ मात्र ॥ दावी क्षणें दीर्घचि काल चित्र ॥ जैसें पहा स्वप्न दिसे विचित्र ॥ १२० ॥ तैसें क्रमानेंच पुन्हां विचित्र ॥ बाह्यार्थ दावीत सदा स्वतंत्र ॥ ऐशी इशा शक्ति असे विचित्र ॥ जीवा तया दृष्ट प्रपंचचित्र ॥ २१ ॥ स्वप्नीं कालगताचि दीर्घ उणिता भासे जयाचेनि हो ॥ तैशी विश्वगताचि दीर्घ क्रमता भासे तरी काय हो ॥ ऐशी ही उभयप्रकार रचना मायागुणें भासते ॥ शेखीं दीर्घ उणा विचित्र जरी ही ज्ञानें दशा लोपते ॥ २२ ॥ जैशी जीवगताही झोंप रजनीं वैचित्र स्वप्नास गा ॥ दावी दुर्घट तीस: शास्त्र वदतें शक्तिर्मलीनाचि गा ॥ जी विद्या मग ईशशक्ति रचना विश्वादि हें चित्र गा ॥ नाहीं ज्या अघटीत गूढ महिमा आहे जगत्कर्तृ गा ॥ २३ ॥ युगपत जग कल्पीं जीव स्वप्नांत सारे ॥ अखिल जगक्रमाची कल्पना ईश्वरीं रे ॥ सहजचि असतां हो यांत आश्चर्य कां रे ॥ म्हणुनि जग पदार्थां प्रत्यभिज्ञा दिसे रे ॥ २४ ॥ उभय कल्पित ईश पहातसे ॥ परि पराधिन जीव तसा नसे ॥ अशि भिदा तिहि शक्तिकृता असे ॥ सकल अर्थि न जीव प्रभा वसे ॥ २५ ॥ वेदां ईश्वर कर्मशास्त्र सकलां सत्यत्व व्याहारिक ॥ जी पूर्वापर अर्थसंगति तशी धार्मीक धी आस्तिक ॥ तैशी ईश्वरभावनादि पर जे सत्यार्थ हे मायिक ॥ एक ब्रह्म विभू निरंजन खरें तें सत्य पारमार्थिक ॥२६॥ जरी वस्तुता सत्यता या जगा रे ॥ तरी त्या व्यवस्था तसी संगती रे ॥ जसें बालकांतें वदे माय गाया ॥ जगद्धर्म वर्णी तशी वेदमाया ॥ २७ ॥ जसें स्वप्न खोटें तशी त्या निवृत्ति ॥ जसे द्वैतशास्त्रां तशी हो प्रवृत्ति ॥ जसा यक्ष तैसा बली हाच न्याय ॥ स्थिरास्थीरमाया तरी सत्य काय ॥ २८ ॥ जैसें कारण कार्य

सर्व युगपत् स्वप्नींच कल्पीतसे ॥ माता, पुत्र व नातु सर्व जग हें एकाच कालीं दिसे ॥ तेथें सत्यचि भासतें नच तसें जीवा अवस्थांत रे ॥ तेवीं अज्ञदशेंच सत्य जग हें ज्ञानदशा तुच्छ रे ॥२९॥ एका दुःख जसें तसेंच तरि गा अन्या न तें होतसे ॥ एका स्वप्न दिसे जसेंच तरि तें अन्या दिसेना तसें ॥ तेवीं संसृतिरूपबंध अवघा ज्यातें जया वृत्तिनें ॥ ती जीवां तमवृत्तिरूप नसतां त्यां विश्व ना पाहणें ॥ १३० ॥ केव्हां हें तम या गुहेंत भरलें ऐशा विचारेंविना ॥ दीपा नेउनि त्या तमास दवडी स्वेच्छीत पाहे धनां ॥ जीवा हें तमरूप बंधन तसें पूर्वीं कधीं प्राप्त गा ॥ याचा अंत न पाहतां गुरुकृपें बोधें तमा अंत गा ॥ ३१ ॥ जीच्या हो वर उंच पर्वत असे खालीं धरासंधि हा ॥ मध्यें जो अवकाश खडक उदरीं ऐसी स्वयंभू गुहा ॥ जीवां दैववशें सुमार्ग गवसे खडकाशि हो भेदितां ॥ तन्मध्यें मणिरत्न हेंचि धन गा दृष्टांतिंही साम्यता ॥ ३२ ॥ घटोत्पत्तिकालीं घटाभाव जैसा ॥ स्वयें नष्ट जीवा अविद्याविलासा ॥ पहावें तसें हो जरी पूर्वशक्ती ॥ तरी नष्ट ज्ञानें नरा बंधमुक्ति ॥ ३३ ॥ विविधजगपदार्थां सर्व ज्या कल्पनेंत ॥ तमरूप तिच वृत्ती नष्ट ज्ञानेंच होत ॥ हरिगुरुपदचर्यें ज्ञान संपादवावें ॥ तरि मग तमबंधापासुनी मुक्त व्हावें ॥३४॥ शंका श्लोक ॥ दिसो हें सुखें द्वैत आम्हां सदा हो ॥ असो जन्मवार्ता भवा वर्तता हो ॥ सदा सौख्यदा भोग भोगीत जावें ॥ जयासी पहा ईशकार्ता स्वभावें ॥३५॥ समाधान श्लोक ॥ दुःस्वप्नां अवलोकुनी तरि भयें अत्यंत दुःखीत गा ॥ होतो तेविंच बाह्य विश्वरचना पाहोनियां त्रस्त गा ॥ पाहे भेद तया भयें श्रुति म्हणे अर्थी सदा दुःखिता ॥ त्याचें अर्जन पालन व्ययगुणें क्लेशा नसे पूर्णता ॥३६॥ संकल्पा स्मरतां सकाम विषया तें दुःख वाटे मना ॥ दैवें प्राप्तचि अर्थ पाहुनी तदा संकल्प सोडी मना ॥ संकल्पा नसतांचि सौख्य प्रगटे ऐसें कळेना जना ॥ चित्तीं चिंतन कांहिंएक नसतां स्वानंद सर्वात्मना ॥ ३७ ॥ स्वगत रुधिर चाटी बाह्य अस्थिप्रहारें ॥ अधिकअधिक कुत्रा शुष्कखंडा डसेरे ॥ सकल मननशांत्या सौख्य होतें मना रे ॥ विषयगतचि मानी जेविं कुत्रा तसा रे ॥ ३८ ॥ तैसा हा भवदुःखरूप अवघा चक्रापरी वर्तता ॥ त्याचा अंत न ईशदेशिककृपेवांचोनि नान्यकृता ॥ मृत्यूजन्मजराधिव्याधि सकलां क्षुत्तृट्व्यथेक्रांतता ॥ गर्भादीक अनंत दुःख असतां विश्रांति ना तत्वतां ॥ ३९ ॥

वस्त्रें चंदन दुग्ध साधन सुखा तैसेंचि दुःखाचिया ॥ कांटे नर्क विषादि साधन पहा ईशकृता लीलया ॥ त्यांमध्यें सुखसाधनार्थ झटसी अन्या उपेक्षूनियां ॥ मा अत्यंत स्वकीय सौख्यजलधी आत्माचि नेच्छा तयां ॥ १४० ॥ लघुसुखविषयांतें इच्छिसी बा कसा रे ॥ सकलसुखसमुद्रा नेच्छिसी तूं असें रे ॥ क्षणिक विषयअर्थांसाठिं हा शीण सारा ॥ सततसुखपरात्मा त्यां नसे गा विचारा ॥ ४१ ॥ जरि तुज विषयेच्छा पाहुनी कर्म माना ॥ सुखअसुख तदर्थां जन्म दे देव नाना ॥ विगतविषयतृष्णारूप ब्रह्मात्मज्ञाना ॥ अनुभव तुजलागीं तैं कसे जन्म नाना ॥ ४२ ॥ जशी भावना ईशचित्तीं जयासी ॥ तसें पाहुनी दे गती हो तयांसी ॥ जशी वासना मानसीं ज्यां तशी रे ॥ प्रवृत्ती जनां होतसे सर्वथा रे ॥ ४३ ॥ जीवानेक असी तसीच रचना विश्वादि नानात्व गा ॥ सत्याबुद्धि, पदार्थमात्रविषयीं जाणीव एकास गा ॥ सर्वां कल्पक एक जीव असतां ईशादि द्वैतास गा ॥ मूलाज्ञानसहीत जीव निरसी ज्ञानेंचि तो ब्रह्म गा ॥ ४४ ॥ स्वप्नां सोडुनि जागृतीस धरतां खोटें दिसे स्वप्न तें ॥ अज्ञानांतुनि मुक्त जीव मग त्या नाना मृषा दीसते ॥ जो जागा नर तोचि मुक्त तरि त्या स्वप्नादि दुःखांस गा ॥ जो योगी निजरूपिं जागृत तसा तो द्वंद्व निर्मुक्त गा ॥४५॥ अप्रकाशरुपीं माया ॥ प्रकाशाश्रय ती कशी ॥ अप्रकाशरुपी छाया ॥ प्रकाशाश्रय ती तशी ॥ ४६ ॥ पदार्थां घेउनी छाया ॥ प्रकाशाश्रय ती जशी ॥ उत्पन्न कल्पना पूर्व ॥ संकल्पाश्रय ती तशी ॥ ४७ ॥ प्रकाशाश्रय संकल्प ॥ पदार्थांवांचुनी नव्हे ॥ कल्पना अर्थरूपानें ॥ अनादीशक्ति ही अशी ॥ ४८ ॥ अनादि सादि बोधानें ॥ मिथ्यामाया गुरुकृपें ॥ निष्कामकर्मे भक्तांची ॥ माया नष्ट करी हरी ॥४९॥ आत्मज्ञान अनंतजन्मसुकृतावांचून नाहींच गा ॥ पुण्यापुण्य समान भाग तरि त्या कर्मेंचि जो प्रापगा ॥ तो ज्ञाना नरदेह प्रापक तरी प्रत्यक्ष ज्या सिद्ध गा ॥ तैसे शास्त्र गुरु प्रसाद्य तरि हे त्या धन्य रे भाग्य गा ॥१५०॥ ते धन्य ज्यां ज्ञान असे अनन्य ॥ श्रीराम दैशीक प्रसादजन्य ॥ वैराग्यभक्ती जरि हे समस्त ॥ त्याचेनि भाग्या कधिं नाहिं अस्त ॥ ५१ ॥ जे कां असें ज्ञानचि भक्तिमूल ॥ वैराग्य त्यासी जरि सानुकूल ॥ तेणेंचि हें संसृतिवृक्षमूल ॥ नासे जरी ईशकृपानुकूल ॥ ५२ ॥ म्हणोनी मना भक्तियोगा करावें ॥ सदासर्वदा श्रीहरीला भजावें ॥ तयाधीन माया तया मुक्त

व्हावें ॥ रघूनायका नाम वाचे वदावें ॥ ५३ ॥ जो ईश कर्ता सकला जगाचा ॥ निष्कामकर्मे करुनी तयाचा ॥ प्रसादयोगें तरि दैशिकाचा ॥ मायाभ्रमा वारक बोध साचा ॥ ५४ ॥ अशा विचारें कृतकृत्य व्हावें ॥ समाधियोगें मन शांतवावें ॥ विज्ञानयोगें भवपार व्हावें ॥ अखंड रामा तरि आठवावें ॥ ५५ ॥ योगी असा कोण भोगी विरागी असे खास जाणावया त्यांसरे ॥ छात्रा मना प्रेम आसे तरी ऐक त्याचे सदाचार वृत्तास रे ॥ जो दृष्टबाह्यार्थ सर्वा नसे लीन जो नेमी इंद्रीयग्रामास रे ॥ इंद्रीयधर्मा मना संग नोहे मनाचा स्वरूपीं सदा वासरे ॥५६॥ जयाच्या हो बोधें उभय विषयाची उपरती ॥ गुरू तोची जाणा निरतिशय ब्रह्मीं स्थिरमती ॥ करी शिष्यां तोची निगम गुरुवाक्यीं समरती ॥ असे निष्ठा ईशा निजस्वरुप ब्रह्माअवगती ॥ ५७ ॥ शताधीका सत्तावन सकळ श्लोकेंचि रचना ॥ करोनी श्रीरामा गुरुपदिं नमस्कारचि मना ॥ समाप्ती या ग्रंथा भवहरणयोगास्तव जनां ॥ असो द्यावी तुम्ही मजवर कृपालोकनयना ॥५८॥ अठराशें उन एक ईश्वर अशा संवत्सराभीतरीं वैशाखीं तरि वद्यपक्ष नवमी तीथीस शंवासरीं ॥ झाला सिन्नरिं पूर्ण ग्रंथ अवघा नारायणासूत गा ॥ कर्ता वामनदास अर्पित मुदा श्रीराममौनीस गा ॥ १५९ ॥ समाप्तमगमत् ॥

इति श्रीसिद्धबोधानुवाद ग्रंथ संपूर्णमस्तु ॥ श्रीराम प्रसन्न ॥

॥ श्री ॥

# अथ स्वरूपज्ञानादर्श ग्रंथप्रारंभः ।

॥ श्लोकाः ॥

आकाशरूप जसि पोकळि तेविं आत्मा । ज्ञानस्वरूप अज मी नभ एक सद्मा ॥
कुंभांत व्यापक तसें सम अंडपिंड। सर्वत्र व्यापक असी चिति मी अखंड ॥१॥
जेवीं उपाधि असतां निजपोकळींत । अभ्रास धारण करी नभ तेविं संत ॥
द्रष्टा सदा सकळ जीव तनुत्रयांत। मी जाणता विषय इंद्रिय धी अनंत ॥२॥
तूं जाणता तरि वदे दुसऱ्या मनास। कां नेणसी स्वरुप निश्चल स्वप्रकाश ॥
कर्पूरवाससम चंचल दृश्यवृत्ती । तीला गती तसि न चालत आत्मज्योती॥३॥
अर्थांस कल्पित मती चिति त्यांस पाहे । पाहोनि ध्यास न धरी प्रतिबुद्धि राहे ॥
बुद्धीद्वया मधिल ज्ञान नसोनि अन्य। तेथील वृत्त इकडे अवधानशून्य ॥४॥
आकाशिं शब्द भरपूर असे निवांत। संयोगिं भेरि टिपरा उमटोनी शांत ॥
तत्तदुपाधिकृत ज्ञान दिसे विशेष। तत्रापि मूळ चिति व्यापक निर्विशेष ॥ ५ ॥
जेथील तेथ समजे चितिला यथार्थ । प्रत्यक्षभाव तदभाव मृषा पदार्थ ॥
माया तदंश परि कल्पित दृश्यभावा। द्रष्टा असंग विभु कारण सृष्टि देवा ॥६॥
जातां घटीं नभ न जात स्थळांतरासी । जातां उपाधि चिति ना परलोकवासी ॥
जीवास भ्रांतिकृत संसृतिचा प्रयास। जैसें तुडुंब नभ तेविं चितिप्रकाश ॥ ७ ॥
वायू फिरे रज फिरे गति दृश्यअर्था । आधारदृश्य चल तेविं अधेय अर्था ॥
चांचल्यता तसि न शुद्धस्वरूपज्ञाना। साक्षीउपाधिस्थळिं जाणत अर्थ नाना॥८॥
सर्वेश्वरीं महतशक्ति गती अपार । सर्वज्ञ तो मनुजबुद्धिगती न फार ॥
धी एकदेशि निजरूपिं विकल्प नाहीं। धी अंतराय मग ज्ञान न अर्थ पाहीं॥९॥
धी जात मी न फिरतां बहु अर्थ पाहे । देहेंद्रियार्थमतिवांचुन स्वस्थ राहे ॥
तद्देशकालगत अर्थ जसे अपार। वृत्ती अनेक चिति एकचि निर्विकार ॥ १० ॥
सामान्यज्ञान सविशेष असा विभाग। बोधार्थ मात्र परि वास्तव निर्विभाग॥
सामान्य सोडुन न सत्य विशेष अर्थ । अग्नीच उष्ण नहि तस दुजे पदार्थ॥११॥

अग्नीं न लांकुड खिळा जळ तेल वात । संघात तेविं जड दृश्य न ज्ञान त्यांत ॥
अग्निप्रताप समज्ञानरुपीं अखंडा । सर्वप्रकाशक चिती मति काय रंडा ॥१२॥
जीच्यामुळेंचि विमला नसता अरोप । मी जीव पामर अमंगळ देहरूप ॥
नानाविकारिं सुखदुःखद नाशरूप । दृश्यार्थीं तीव्र ममता अभिमान खूप १३॥
ज्याच्याश्रयें असत ओळख त्याचि नाहीं । भोगीत अन्य विपयां सुखदुःख साही॥
स्वामी सुखांत लिन होत सुखस्वरूप । स्वामी शुभें समज साधक शांत कोप १४
जन्मादि दुःखहर सात्विक कर्मयोगें । ईशप्रसाद फळतां अपवर्ग मागे ॥
देहात्मबुद्धि जनिं मृत्यु हरावयातें । साक्षित्वबोध स्वरुपा शरणागतातें॥१५॥
आनंद सत्य सह त्वंपद लक्ष्य साक्षी । देहादि जाड्य अवधी जडहे उपेक्षी ॥
तूं वेगळा विमल शुद्ध चितिप्रकाश । कारुण्यसिंधु गुरुचा महतोपदेश ॥१६॥
मूळस्वरूप परमार्थ जिवेश्वराचें । तें एक सत्य चितसौख्यरुपत्व त्याचें ॥
बोधार्थ ज्ञान उपदेश चितिस्वरूपा । न द्वैतद्वैतमिव बोध अभेदरूपा ॥१७॥
लक्ष्यार्थ एक उभयां परि दृश्यभेद । मायाकुतूहल वृथा प्रभु अल्प भेद ॥
सर्वांस सर्व कळतां जगदांध्ययोग । यासाठिं दुःखद भवांत भिदा प्रसंग॥१८॥
जसिजसी सिद्ध सामग्री । तसतसें द्वैत पाहणें ॥
मृति मूर्च्छा सुप्ति स्वप्न । जाग्रद्व्यापारदर्शनें ॥ १९ ॥
श्रीमंत दीन गरिबां जळ एक जैसें । मुख्यार्थ साम्य सकळां परि अन्न पैसे ॥
तद्भेद तेविं परमेश्वर जीव यांचा । कल्पीत भेद म्हणुनी अपवर्ग साचा ॥ २० ॥
सर्वत्र अग्नि परि इंधनिं प्रज्वलीत । तेथें उजेड चटका न परेंधनांत ॥
तैसा जरी सकलव्यापक चित्प्रकाश । जाणे न भिन्न दुसऱ्या मति निश्चयांस॥२१
सत्ताबळें न हलता धनि सारथ्याच्या । हस्तक्रियें हयगती धडका रथाच्या ॥
पाहे तसा सकळ व्यापक चिद्विलास । अक्रीय चेतन करीत अचेतनास॥२२॥
दृग्दृश्यभेद हरि सद्गुरु भक्तिभेद । बाधीत वृत्तिभवमूल निरस्त भेद ॥
उर्मीविना सहज तो विदुपां न दोप । प्रारब्धभोग शरिरापरि निर्विशेष ॥२३॥
आरोपितास जड अर्थचि हेतु जेथें । द्रष्टा दुजा परि उपाधि विकल्प तेथें ॥
द्रष्टा न भिन्न स्वयमेव विकल्प साक्षी । अग्नींधनासह प्रकाशक अन्य अक्षीं॥२४
तेवीं विकल्पसह बाह्य विकल्पद्वारा । अर्थांस जाणत चिती परि निर्विकारा ॥
अग्नींधनाद्यसत जेविं प्रकाशकर्ता । साक्षी विकल्प उठतां शमता अकर्ता॥२५॥
साक्षी उदासिन समीपक ज्ञानवंत । पाहोन अन्य न कधीं अभिमानवंत ॥

पाहात जात अवघे व्यवहार साक्षी। त्याला नसे सुखपिडा जसि अन्यपक्षीं॥२६
ज्ञानी तसा परळ घागर माठ डेरा। मातीच पाहत मृपा कृतिचा पसारा॥
सच्चित्सुखाब्धि जाळिं नामरुपातरंग। प्रारब्धभोग अवधी बघता असंग॥२७॥
बुद्धी विकल्प प्रसवे स्थित वासनेनें। त्यां वासना विपय ज्यां मतिआश्रयानें॥
निष्कामता धरुनि अर्थ अनर्थकारी। जाणोनि मूलहत धी जनिं मृत्युवारी॥२८॥
ऐशा रिती सकळ अर्थ मृपा न सत्य। जाणे प्रसंगिं गुरुच्या मति अर्थ सत्य॥
मिथ्या विकल्प न धरीं स्वरुपीं विलग्न। होतांच नष्ट तम रे भवचक्र भग्न॥२९॥
चित्रें चितारि करितो नृपआश्रयानें। राजा बघे न करिता न बघे न जाणे॥
जेणें विकल्प करि धी तिस ज्ञप्ति जाणे। ध्यासाविनान्यमतितें चिति काय जाणे
ध्यासाविना सकल दृश्य पदार्थ साक्षी। यासाठिं सर्वमति आणि विकल्प लक्षी॥
सर्वत्र व्यापक चिती धिपणा अनेक। तत्तदुपाधि स्थितब्रह्मस्वरूप एक॥३१॥
अक्रीय अव्यय सुखाद्वय सत्य बुद्ध। निःसंग निर्विपय ज्ञानचि ब्रह्म शुद्ध॥
तें मी अखंड अविनाश मृपा अनेक। ज्ञानें प्रपंचिक परी निजज्ञान एक॥३२॥
व्यापार दृष्ट तितके नसती मनांत। शब्दार्थजाल तितके नहि लेखनांत॥
लेखीं प्रशस्त तितुकें स्मरणांत नाहीं। ध्यासस्मृतीविण चिती द्युतिलोप नाहीं॥
अज्ञान बाल जडधी स्थित अर्थ पाहे। सज्ञानबुद्धिपटुता विशदार्थ पाहे॥
ज्यायान्मती भ्रमणतान्वित अर्थ पाहे। पाहात ध्यास न धरी चिती स्वस्थ राहे॥
जाड्यांश बुद्धि परि ध्यासहि जाड्यराशी। जीवा सदा नसत केवळ चित्प्रकाशीं॥
कैसा वदे समसमान चितिस्वरूप। साक्षी असंग विभु ब्रह्मचि मी अरूप॥३५
शब्दार्थयुक्त जितुकें जडमात्र आहे। देहांतरीं न तितुकें मतिनिष्ठ राहे॥
सर्वार्थध्यास मतिनिष्ठ तरीहि कष्ट। बुद्धीमुळें जड निवर्तक ज्ञान श्रेष्ठ॥३६॥
ध्यासस्मृती विपरिलोपविना अवस्था। साक्षित्वबोध निरसी विदुपां व्यवस्था॥
सापेक्ष दृश्य नसतां मग साक्षि नाम। मिथ्या समस्त विलयावधि मी अनाम॥
वंध्यासुतापरि जरी मुळिं विश्व नाहीं॥ अद्वैत सर्व तरि सद्गुरुशास्त्र यांही॥
मोक्षार्थ व्यर्थ जरि प्राप्ति निपेध तीचा। संयुक्त शास्त्रचितिबोध असंगतेचा॥३८
वंध्यासुता स्थिति नसे नहि कार्यता ही। यत्सत्य तें जग दिसे सतकार्य पाहीं॥
आरोपितास जसि वास्तव वस्तु हेतू। विश्वास बाध अवधी सतब्रह्महेतू॥३९॥
सत्तेविना असत तत्व मृपा पुमर्थ। ज्ञानाविना अवधि शून्यमता अनर्थ॥
आनंद शून्यस्वरुपा पुरुषार्थ जातो। अन्वीत कार्य उलटें तरि बाध होतो॥४०

सत्य स्वभाव मुळचा तसि आत्मइच्छा । मृत्यू नसो सतत राहिन मी यमेच्छा॥
मृत्यूस हेतु निजकर्मपथें तरीही । वांचूं असी सहज अन्वित सत्यता ही॥४१॥
अद्भूत कार्यहि जरी दुसऱ्यानिं केलें । तें नापसंत निजकृत्य बरें खतेलें ॥
चातुर्यहीन निज अक्कल फार गोड । ज्ञानस्वभाव मुळ अन्वित त्याचि चाड ॥
सर्वेश्वरादि जग त्याहुन स्वात्मप्रेम । आत्मार्थ देव भजतो न भजे अकाम ॥
सारे पदार्थ कधिं अप्रिय प्रीय होती । स्वानंदअन्वित सदा निजकार्य ख्याती ॥
सच्चित्सुखात्म निजविग्रह या जिवांचा । त्यांपासुनी करुनि भ्रष्ट जडत्रयाचा ॥
संसर्गबुद्धि कृत शाश्वत नाहिं भावी । चौघांस भारभुत दुःखगृहांत ठेवी॥४४॥
अत्यंत नश्वर तनुस्थिति नेम नाहीं । केव्हां निदानघटिका कळणार नाहीं ॥
राज्याधिकार तटबंध गृहाधनांचा । आधार मूढमतिनें तरि नाश साचा ॥४५॥
अज्ञान अंतरिं कसा धन प्राण अक्ष । चौघे उठाव करिती न तरी अलक्ष ॥
चौखाणिचे जितच मत्सरि जीव त्यांना । जे भारभूत अथवा मृतवाहकांना ॥४६
ज्यां जन्म दुःखद विवर्धत दुःख वारी । अज्ञान दुःख तरुणस्थित दुःख भारी ॥
व्याधी अनेक तनु जर्जर द्वंद्वपीडा । ठेवी जिवा मति अशा प्रतिलोम नीडा ॥
सद्बोधहीन जग वांझसुतासमान । बोधें असत्यफल कार्यगती निदान ॥
मिथ्या तया नसत भाव जगा निवृत्ती । संसारचक्र विनिवर्तक अप्रवृत्ती ॥४८॥
सत्याश्रयें असत सत्य रुपांत भासे । सत्यस्वरूपिं लिन जाणत सत्य नासे ॥
ऐसा प्रकार जगता अभिमानयोगें । मिथ्या तुतेंचि जग ईतर काय सांगें॥४९॥
वस्तुस्वभाव तरि व्यंजक वस्तु अन्य । आहे तरीच समजें गुळ गोड मान्य ॥
जिव्हेवरोन तस व्यंजक स्वांत तेथें । साक्षित्वबोध मज दर्शित मौनिनाथें॥५०॥
पाण्यांत मीठ मिळतां जरि एकरूप । भासे तरी मधुर पाणि रसस्वरूप ॥
खारेपणा लवणनिष्ठ कळे जिभेला । ब्रह्मीं विकल्प नहि ज्ञान नसे जडाला॥५१॥
बुद्धी विकल्पमय ज्ञानस्वरूप आत्मा । एकत्र भ्रांतिकृत भासतही परात्मा ॥
साक्षी सदा अनुभवें जडवर्ग भिन्न । आत्माचि ज्ञान जड दृश्य मृषा न भिन्न५२
आदर्श आणि प्रतिबिंबित सर्व श्वाना । पाहात श्वान प्रतिबिंबित श्वान श्वाना ॥
पाहे न तेविं सकलां निजज्ञान पाहे । वृत्तीविना सम सदा मग काय पाहे५३
ऐकोनि चित्त भय शंकित साधकाचें । अंतस्थ साधन असे दुसरें जिवाचें ॥
तेणें मती अवरितां मग लीनतेनें । आत्म्यास जाणत रुजू निजनिश्चयानें ॥५४॥
नाहींच द्वैत मुळिंचें मग बाध काय । वंध्यासुतास पळवा मुख शब्द वाय ॥

प्राप्तीविना अनुभवा सुख ओल नाहीं । अत्यंत दुःखरहितां गुरुशास्त्र नाहीं५५
लोहेंचि लोह तुटि तेविं जडत्वबाधा । दृगृदृश्यभेद स्वरुपा तिहि काय बाधा ॥
मिथ्या जडा सुखनिवर्तक द्वैत सिद्ध । सच्चित्सुखप्रभृति शब्द अभेदसिद्ध॥५६॥
डोळा पहात असतां मति लक्षहीन । साक्षीहि व्यापक तरी न यथार्थ ज्ञान॥
ज्ञानार्थरूप चिति दृश्य स्वभावग्राही। धीदृश्यरंजित पटासम घेत पाहीं॥५७॥
आधेय दृश्यसम आश्रय दृश्य जाणा। दृश्यार्थ कल्पन असे मतिनिष्ठ ज्ञाना॥
सात्वीक सन्निहित बुद्धि उपाधि आहे । बुद्धी विकल्पस्थित ज्ञप्ति विशेष पाहे॥
बुद्धी विकल्प करि तद्गत वृत्ति नाना । जेथील तेथ मतिनिष्ठ रहात त्यांना ॥
कर्माविना न गति ज्ञप्ति उदास ज्ञान । जेथील तेथ स्थित वृत्त दुजे स्थळीं न॥
डोळा पहात असतां न यथार्थ जाणे । बुद्धीविना न मति केवळ कल्पनेनें ॥
जाणे न अर्थ मतिचक्षु समस्त साक्षी। ध्यासाविना सकळ तत्स्थितिनाशलक्षीं६०

## ॥ ओवी ॥

सूर्यप्रकाशीं भ्रामकें चळे । पहाती मांसमय डोळे ॥
जाणे मन, बुद्धीस कळे । यावेगळी चैतन्यसत्ता ॥ ६१ ॥

ग्रीवास्थ तुंड प्रतिबिंबित तुंड आर्सा। इत्यादि भेद दिसण्या बिज एक आर्सा॥
द्रष्टा नसोन परि तो जड आसतांना। जैसा उपाधि मति दाखवि तेविं नाना॥६२॥
नानात्व द्वैत स्थितदृश्य पदार्थगामी । एकत्व द्वैत हतद्रष्टृ पदार्थगामी ॥
द्रष्टे अनेक तरि दृश्य पदार्थगामी । दृग्दृश्य वाक्य निगमागमसारगामी॥६३॥

## आर्या ॥

कां हो अहमाकारा–वृत्ती साक्षीस साधनीभूत ॥
करणाकारण बोले, शंकरगुरु अर्थ काय अद्भूत ॥ ६४ ॥

## श्लोक ॥

साक्षी विकल्प असतां, नसतांही शांत । सत्यस्वरूप सुखसिंधु अगाध त्यांत॥
जीवेश्वरादि जग द्वैतमृषातरंग । अद्वैत नीरसम, निश्चल मी असंग ॥ ६५॥
सूर्यप्रकाशक प्रकाशक तेविं साक्षी । जाणे असें वदु नका चिति काय लक्षी ॥
अग्नी रवी जड प्रकाशक वस्तु लोकीं । ऐसी न आत्मचिति, ज्ञानचि तें विलोकीं॥
सूर्यप्रकाश नहि जाणत नेत्र पाहे । ना तो प्रकाशक तसी मति जाणताहे ॥
जाणे बघे उभय चेतनधर्मरूपा । बोद्धृत्व उक्ति तिहि ज्ञान अवाच्यरूपा॥६७॥

ध्यास स्मृती जड विकल्पहि बुद्धिनिष्ठ । त्यावीण वस्तु सहचारि जनांस इष्ट ॥
तद्बोधनार्थ सतज्ञानसुखस्वरूपा । द्रष्टृत्वबोधन न दोष अवाच्यरूपा ॥६८॥
बुद्धींत जाणिव निरीक्षण डोळियांत । ज्याचें तयांस वदतां न स्वभावघात ॥
सूर्याग्नि हे शबलकृत् जरि ऊर्ध्वगामी । त्याचा प्रकाश जड तो नहि ज्ञानगामी॥
बुद्धी सुनेत्र रविभा जरि साधनें हीं । तत्रापि ज्ञान मुळचें निजरूप पाहीं ॥
भासे उपाधिविण जें सम सर्व ठायां । तें ज्ञान हृस्थ मति चेतविं अक्षकाया॥
संस्कारध्यास स्मृति वा क्रमयुक्त जीवा । किंवा स्वकल्पित दिसे तिहि द्वंद्व गोवा॥
संस्कार ध्यास स्मृति प्रक्रमवीण पाहे । साक्षी अलेपकविना अवधान राहे॥७१
माया उपाधि लघु जीव उपाधिद्वारा । साक्षी पहात परकल्पित मी पसारा ॥
पाहोन ध्यास न धरी गतवृत्ति नान्य । मध्यें निवांत निजज्ञान विकल्पशून्य ॥
डोळा पहात विषयां मतियुक्त प्रज्ञा । साक्षात द्वंद्व समजे युत चक्षुप्रज्ञा ॥
बाह्यार्थ बुद्धियुत जीवही इंद्रियानें । पाहात द्वैत सकलां गति आत्मभानें॥७३
जो वासनासहित इंद्रियवृत्तिद्वारा । पाहात द्वैतपुरुषा भवचक्रफेरा ॥
जे कल्पनासहित दृश्य असंगतेनें । पाहात तुच्छ पुरुषा गति आत्मज्ञानें॥७४॥
अर्थां बघे नयन त्यांस न द्वंद्व ओझें । द्वंद्वा मतीस हत हस्तचि घेत ओझें ॥
ध्यासाविना सकल दृश्य पहात द्रष्टा । जो लिप्त ना रसिक भोगित जीव कष्टा ७५
कां जीव शुद्ध चितिधी प्रतिभास सांग । तिन्ही मिळून तरि त्यांतिल लक्षभाग॥
सर्वेश लक्ष्यसम तो उभयां अखंड । वाक्यार्थ हेतु चितिबोध असे प्रचंड ॥७६॥
प्रत्यक्ष सिद्ध अथवा मथनाग्नि जाळी । जेविं प्रकाशित समिंधन प्राप्तकाळीं ॥
तेवीं उपाधि अवधी निजरूपज्ञान । पाहे उपाधिविलयीं मग एक भान॥७७॥
मिथ्या पदार्थ क्रमशः कथना श्रुतीचे । तात्पर्य नाहिं स्वरूपावरणा जिवांचे ॥
नाशार्थ शब्द सतज्ञान सुखादि बोध । पृच्छान्वयें न पुसतां तरि काय बाध॥७८
भ्रांतिप्रतीत भवबंध सतां अबोधें । भ्रांतीनिवृत्त फलमात्र निजात्मबोधें ॥
प्राप्ताचि प्राप्ती स्वतःसिद्ध स्वरूप एक । अद्वैत हा तरि सरे मतिचा विवेक॥७९॥
व्यापार साक्षि जिव तो व्यवहार लक्षी । सत्यत्व भावित प्रमान्वित द्वैतपक्षीं ॥
अज्ञान स्वप्न भ्रम ज्ञान समस्त अर्थां । साक्षी समान सम लिप्त न मी अनर्था ॥
पाहे मृषा मृगजळा परि सत्य प्रज्ञा । नाहीं तसें अति मृषा जगभान सूज्ञा ॥
आकाशिं नीलछत पाहात ही असंग । मिथ्या उपाधि दिसतां स्वरूपीं न भंग॥
सर्वां बृहत् म्हणुनि ब्रह्म अभेद एक । सापेक्ष भेदचि अवाच्य रूपा अनेक ॥

नामें जया परमतत्व कळे तयानें । अद्वैतभाव सत भासत द्वैतभानें ॥८२॥
सर्वत्र ब्रह्म दिसतें नहिं दृश्यभान । अद्वैत ब्रह्मविण भासत नाहिं आन ॥
पूर्णस्वरूप मति ही न धरी विकल्प। दृग्दृश्यबोधविण केवळ निर्विकल्प॥८३
ब्रह्मा विवर्त तमकल्पित नामरूप । व्यावृत्त शब्द सतज्ञान सुखस्वरूप ॥
बोधार्थ मात्र परि सिद्धचि मी प्रसंग । सापेक्ष दृश्य अभिधानविना असंग ८४
मिथ्या उपाधिभ्रम कारणकार्य साप । दोघांस आश्रय जसा गुण सत्य बाप ॥
माया उपाधि भ्रम कारण द्वैतभास ॥ दोघांस आश्रय तसी चिति स्वप्रकाश८५
जे सर्प कार्यगुण कारण यांस द्रष्टा । आधार सत्य जड कारण तेथ द्रष्टा ॥
सत्यार्थ भिन्न असतो असतां न भान । सत्याविना असत कारण अप्रभान ॥
सत्यानुपूर्व गुण सर्प दिसे भ्रमेंची । तैसी प्रतीति कधिं वांझसुता नसेची ॥
मिथ्या उपाधि तिहिं भासत कार्य मिथ्या । दोघांस आश्रयपणा तरि ब्रह्म तथ्या॥
सांचे सुतावरुनि वांझसुता मुखांत । ये शब्द तेविं सत ब्रह्म असे तयांत ॥
कालत्रयीं असत विश्व अभाव उक्ती । सत्याश्रयाविण नसे सतभाव मुक्ती ॥८८
सापेक्षनाश सतभावविना स्वतंत्र । मी सत्य तेविं जड संगविना स्वतंत्र ॥
मी ज्ञान सौख्यविण सौख्यचि मीं स्वतंत्र । सापेक्ष शब्द जगबाधविना स्वतंत्र॥
सत्यानृता मिथुनिं द्वैतविकल्प भाव । दृश्यार्थ भास तरि घेउन साक्षिभाव ॥
सापेक्ष्य साक्षिस्वरुपाप्रति सत्यभाव । सापेक्ष्य भावविण कांहिं मला न नांव॥९०
अक्रीय मी सतत बाधित द्वंद्वकष्टा । प्रारब्धभोग घडतां अतिरिक्त द्रष्टा ॥
ऐसा समस्त व्यवहारिं अलिप्त बोध । संघात सक्रिय तया मज नाहिं बाध॥९१
ज्ञानावरी शरिर कारण कर्मसंग । मिथ्या दिसे मृगजळापरि मी असंग ॥
संगक्रियाविहिन साक्षि सदा अबाध । दृश्यार्थ वाव लहरी जल मी अगाध॥९२
वंध्यासुता न भ्रमदर्शन बाध कांहीं । भ्रांती प्रतीति भवबंध निरास पाहीं ॥
अत्यंत वाव भव सत्य असत्ययोगें । दे दुःख यास्तव निराकृत ज्ञानयोगें ॥९३॥
सद्भावबोध निरसी सहजें असत्या । मिथ्या उपाधि क्षय मात्र निजात्मसत्या ॥
होणें नसे सतत शाश्वत एकरूप । सच्चित्सुखात्मक विभू अज चित्स्वरूप॥९४॥
जो कांहिं प्रत्यय तयांप्रति अंश दोन । भावांश एक दुसरा करणांश जाण ॥
भावांश चेतन असे करणांश वृत्ती । चैतन्य मी अनुभवें मम दृश्यवृत्ती ९५
जी घेत रंजित पटासम दृश्य गांव । दावी अलिप्त पुरुषाप्रति स्वप्न वाव ॥
तें स्वप्न नष्ट मग दृश्य मतीविहीन । साक्षी स्वयंप्रभ सुषुप्तित विद्यमान ॥९६॥

देहादि सत्य मतिनें डवरे प्रपंच । मिथ्या प्रपंच कळतां मति निष्प्रपंच ॥
सत्याश्रयें उभय निश्चय या मतीचे। धीज्ञात सत्य न धरी बिजवासनेचे॥९७॥
प्रातीतिकांस व्यवहारिक सत्यबाधे । ईशप्रणीत व्यवहारिक त्यास बाधे ॥
सत्यात्मबोध जिव कल्पित स्वप्न मिथ्या। जागोनि तेविं जग बाधक बोध तथ्या॥
स्वप्नस्थ दुःखक्षय तद्वत सत्यबोधें। तें सत्यही पुरुष जागृत होत बोधें ॥
स्वप्ना निवृत्त करि जागृत सत्यभाव । सर्व प्रपंच निरसी निजसत्यभाव ॥ ९९ ॥
सत्कर्म ईश्वरकृपें जरि बोध साचा। स्वप्नस्थ जागृत तरी क्रम प्राप्त तीचा ॥
सर्वां असे न तरि जागृत द्वैत देवें। केले तयां विफलता गति स्वप्नभावें॥१००॥
मोक्षार्थ सिद्ध जरि कल्पित स्वप्नबोधें । वेदादिकां विफळता जग हें अबोधें ॥
बुद्धिस्थ भाविक तशाचि क्रमें निवृत्त। होतां अलिप्त मति शाश्वति नष्ट होत॥१
विस्पष्ट कार्य फळ जागृत भाव तेथें। जो बुद्धिनिश्चय तया गति सत्य जेथें॥
जीवांस वेद गुरु शास्त्र असे उपाय । दावी सकार्य तमनाशक देवराय ॥२॥
स्वप्नें लहान जरि जागृत द्वैत मोठें। अत्यंत वाव अवघें परिणामिं खोटें ॥
तत्रापि त्यांत व्यवहारिक दृश्य द्रष्टा। सत्यस्वरूप मति जाणत मुक्त कष्टा॥३॥
वृत्ती अनेक उठतां बसतां स्वरूप । ज्ञाना न नाश व्यवहारविना अरूप ॥
बुध्यादि दृश्य असतां नसतां निवांत। मी साक्षि नामविण केवल चित्प्रशांत॥४॥
सत्याश्रयेंचि व्यवहारिक सत्य वाचे। येतां जगा न खगपुष्प समत्व साचें ॥
द्वैतानिमित्त दर्शि हा व्यवहार वाचे। येतो तथापि निजरूपचि ज्ञान साचे॥५॥
मिथ्या असोनि व्यवहारिक पाहुं जातां। वस्तुस्वभावसमता नहिं अर्थजाता ॥
विश्वस्वभाव हत वांझसुतासमान। जैसे तसा निजस्वभावचि ज्ञान जाण ॥६॥
नाना स्वभाव जगसाक्षि चितिस्वभाव। दोघे स्वभावयुत वांझसुता स्वभाव ॥
नाहीं म्हणोन सतआश्रय द्वैत साक्षी। ज्ञानस्वभाव सत एक स्वरूप लक्षीं॥७॥
तुच्छ स्वभाव जगतां सतशक्तिहेतू । दोघे तसे नसति वांझ सुतास हेतू ॥
शास्त्रोक्त लौकिक सतानुभवाविहीन। शून्यात्मता असत ख्याति प्रसंग जाण॥८

पुढें थोडा ग्रंथ करण्याचा राहिला व ग्रंथकर्ते निजधामास गेले सबब त्यांचें नाव वगैरेही आलें नाहीं.

॥ इति वामनकृत स्वरूपज्ञानादर्श समाप्तः ॥ १ ॥

॥ श्री ॥

# अथ रामगीताटीका प्रारंभः ।

विश्वीं मंगल मंगलात्मक तिहीं त्रैलोक्य सर्वोत्तम ॥
श्रीरामायणकीर्तितें करुनियां जें पूर्वजां विक्रम ॥
किंवा राजऋषी जसें अचरले केलें तसें वर्तन ॥
सीतात्याग अनंतर प्रभु करी गीतार्थही वर्णन ॥ १ ॥
जो श्रीराम उदारबुद्धि अनुजें सौमित्रिनें पृष्ट तो ॥
सौमित्रा वदुनी पुरातन कथा धर्मप्रथा सांगतो ॥
विप्रें शापित ज्या प्रमाद करितां तिर्यक्त्व जाले नृगा ॥
ब्रह्मस्वा विमुखत्व सूचित करी कर्मासृती सूक्ष्म गा ॥ २ ॥
सीतालालित पादपंकज असा एकांतवासी यदा ॥
जो आसादित शुद्धमानस असा भावें नमोनी तदा ॥
पूर्वीं रामकथामृतत्वश्रवणें ज्या स्थीर बुद्धी असे ॥
बोले लक्ष्मण नम्र भक्ति विनयें रामास प्रार्थीतसे ॥ ३ ॥
रामा तूं निजशुद्धबोध अससी सर्वां जिवां जीव तूं ॥
सर्वाधीश निराकृतीहि असतां ज्ञानदृश्या मात्र तूं ॥
श्रीरामा दिसशी अहर्निशि तुझे पादाब्जींचे भृंग जे ॥
तत्संगीं तव पूर्ण ब्रह्मरुपता ते पाहती ना दुजे ॥ ४ ॥
योगी भावित श्रीमता भवहरा पादारविंदां तव ॥
आहें छात्र प्रपन्न मी रघुविरा संसारत्रासास्तव ॥
हा अज्ञान अपार वारिधि सुखें जैसा तरे तेविं तूं ॥
माते शिक्षय साधका तुजविना त्राता नसे तारि तूं ॥ ५ ॥
जो श्रीरामप्रपन्न आर्ति हरतो सौमित्रिचें भाषण ॥
हें ऐकोनि प्रसन्न धी समभुतीं भूपांमधें भूषण ॥
जे अज्ञानतमोपशांतक श्रुती वाक्यान्वयें बोधित ॥
तेविं ज्ञानरहस्य सांगत प्रभू योगीजनां संमत ॥ ६ ॥

आधीं स्वाश्रमवर्ण वर्णिति क्रिया श्रद्धे करोनी सुधी ॥
झाल्या मानस शुद्ध ईश्वरकृपें अष्टांगयोगावधी ॥
वैराग्यादिक साधनां रुढ तदा हा कर्मकांडाविधी ॥
टाकोनी, पुरुषार्थ, अर्थ, गुरुतें कीजे कृपांशेवधी ॥ ७ ॥

जीवाच्या शरिरोद्भवामुळक्रिया जी पूर्वजन्मार्जित ॥
त्या देहीं सुखदुःखकारण अशा धर्मीं अधर्मीं रत ॥
तेणें होत क्रिया तया शरिर हें चक्रापरी फीरत ॥
ऐसा हा विषयाभिलाषि पुरुषा संसार हा वर्तत ॥ ८ ॥

अज्ञाना भवमूलकत्व असतां संसारनाशास्तव ॥
अज्ञाना क्षयरूप कर्मकुशलीं विद्या असे वास्तव ॥
तेथें कर्म नसे विरोधि न तमापासोन ज्या संभव ॥
त्या कर्मा तमनाशकत्व न घडे विद्याच नष्टी भव ॥ ९ ॥

अज्ञाना क्षय नाहिं रागविषयां कर्मैं टळेना नरा ॥
होतां कर्म तरी सदोष उपजे संसारसिंधू पुरा ॥
तेणें वाहत चालला परतिरा पावे कधीं हा नर ॥
कर्मानें गति ना म्हणोनि मनुजा तूं ज्ञाननिष्ठा धर ॥ १० ॥

ना हो वेदमुखें प्रचोदित जसी विद्या तसें कर्मही ॥
जीवातें पुरुषार्थ साधन असे कर्तव्यता प्राप्तही ॥
पक्षी पक्षद्वयें जसा उडतसे विद्या क्रिया साह्यता ॥
दोघांच्याहि समुच्चयें परगती ऐकावि कर्तव्यता ॥ ११ ॥

कर्मैं ना करितां श्रुती वदतसे जीवास दोषादिक ॥
यातें नित्य मुमुक्षुनें निजहिता कर्मा करावें ठिक ॥
सिद्धांती वदतो स्वतंत्रचि मनें किंचिन्न आपेक्षिता ॥
विद्याची पुरुपार्थ मोक्षफळ दे कर्माविना जी स्वता ॥ १२ ॥

नाहो अध्वर सत्यकार्य असतां अंगें प्रयाजादिक ॥
देशादीहि अपेक्षितो मग तसी विद्याहि कर्मादिक ॥
वेदानें विधिपूर्वकें कथित तीं आजीव कर्मैं करी ॥
विद्याकर्मसहीत मोक्षफळ दे मुक्तीस दोन्ही वरीं ॥ १३ ॥

ऐसे कोणि वितर्कवादि वदती ते सर्वथा सत्य न ॥
जैसें केवळ कर्मसाधन नसे तद्युक्त विद्याहि न ॥
येथें दृष्ट विरोध कारण पहा देहाभिमानें क्रिया ॥
वाढे देह अहंकृती गत तदा विद्या फळे अक्रिया ॥ १४ ॥

वाक्यालोचन प्राप्त ज्ञानरुप जी श्री देशिका लब्ध ती ॥
अंतःकर्णरुपात्मवृत्ति चरमा विद्या तया बोलती ॥
हे बाह्याखिल कारकादि करुनी यज्ञादि कर्मोदय ॥
विद्या सर्वहि कारकादि निरसी ब्रह्मीं समस्तालय ॥ १५ ॥

विद्या कर्म द्वया विरोध म्हणुनी टाकी समग्र क्रिया ॥
इंद्रीयें अकळी निवृत्तविषयां आत्मानुसंधान या ॥
अभ्यासीं रत होउनी पररुपा सच्चित्सुखा अद्वया ॥
आत्मत्वें दृढ भावितां सकलही जातील द्वंद्वें लया ॥ १६ ॥

मायेनें जंव आत्मबुद्धि शरिरीं तावद्विधी किंकर ॥
होवोनी विधिवाद कर्म करणें ब्रह्मात्मधी शंकर ॥
नेतीत्यादि वचें निषेधुन जगा ज्ञात्वा परात्मा हरी ॥
दृश्याहून विलक्षण क्षयक्रिया जो टाकि सर्वांपरी ॥ १७ ॥

जैं जीवेश विभेद भेदक हृदीं विज्ञानभा उल्लसे ॥
तैं माया लय पावते सकरणा हेतू भवा जी असे ॥
शुद्धांतःकरणीं परात्मस्वरूपीं वृत्ती अखंड स्थिया ॥
जीवा संसृति मूलकारण तमा नाशोन पावे लया ॥ १८ ॥

जी माया श्रुतिवाक्यजन्य विमल ज्ञानें जरी नष्ट ती ॥
कैसी कार्यसमर्थ होइल पुन्हा जी सर्वथा तुच्छ ती ॥
वाक्यार्थश्रवणें तसेंच मननें होतां निदिध्यासन ॥
जी कां शुद्ध सदा द्वितीय विषयां विज्ञानमात्रें क्षिण ॥ १९ ॥

तत्वज्ञान तया विनष्ट उपजे पुन्हा अविद्या कसी ॥
कर्ता मी अशि बुद्धि नाहिं मग तीं कर्तव्यकर्में कसीं ॥
तस्मात्केवल जी समर्थ असतां दूजा न आपेक्षिता ॥
विद्या मोक्षफला स्वतंत्र दिसते साह्याविना जी स्वता ॥ २० ॥

अत्रार्थी श्रुतितैत्तिरीय विरजा त्यागा वदे सादर ॥
कर्मन्यास प्रशस्त बोधित तया पावेऽमृतत्वा नर ॥
एतावद्दिति वाजसीयश्रुति ही ज्ञानास मोक्षार्थ रे ॥
बोले साधन अन्य नाहिं निरसीं कर्मादिकां स्पष्ट रे ॥ २१ ॥

विधेसी ऋतुसाम्यदर्शित तुवां दृष्टांत नोदाहृत ॥
साम्यत्वें उभयां फलैक वदतां तत्रापि ना संगत ॥
ज्या यज्ञा बहु साधनें बहु फलें सिद्धीविपर्यासता ॥
ज्ञानाचा स्तव रे कदापि न घडे ज्ञानक्रिया साम्यता ॥ २२ ॥

कर्मत्यागि नरास दोष घडती तैं अज्ञ जो कीं नर ॥
कर्मावांचुनि प्रत्यवायसह मी होतों वदे पामर ॥
देहात्मा विपरीतधी नर तिहीं कर्मप्रसिद्धि किजे ॥
अज्ञां कर्मविधी प्रकाशित तरी त्यांतें बुधीं टाकिजे ॥ २३ ॥

श्रद्धे तत्त्वमसीति वाक्य गुरुचें ऐके प्रसादें तया ॥
शुद्धांतःकरणीं परात्म उभया एकत्व जाणोनियां ॥
श्रुत्यर्थश्रवणें अखंड मननें ध्यानें परीपक्वता ॥
होतां मेरुसमाप्रकंपन मनें व्हा रे सुखी तत्वता ॥ २४ ॥

वाक्यार्थावगतीस कारण असे तत्त्वंपदार्थां गती ॥
येथें तत्पद अर्थ ईश्वर असे, जो त्वंपदें बोलती ॥
तो हा जीव, तया शिवजिवा एकत्व बोधाप्रती ॥
तत्वं त्यास असी पदत्व वदती जेणें जिवा सद्गती ॥ २५ ॥

प्रत्यक्त्वादिक जीवधर्म असती तैसे परोक्षादिक ॥
ईशा भास्वर धर्मभेद उभयां टाकी विरोधात्मक ॥
दोघांसी कृतलक्षणें करुनियां संशोधितां जी चिती ॥
ती आत्मा निजरूप हें समजुनी अद्वैत हो हृत्पती ॥ २६ ॥

एकात्मत्त्व म्हणोनि त्यक्त जहती, अत्यागही लक्षणा ॥
सर्वग्राह्य विरोधयुक्त, उभयां टाकोन घे लक्षणा ॥
भागत्यागविशेष्य अंशग्रहणें तत्त्वंपदार्थांतरीं ॥
घे चैतन्य विशेषणांश त्यजुनी सोयंपदार्थापरी ॥ २७ ॥

जें पंचीकृत भूतसंभव असे जें द्वंद्व भोगालय ॥
जें आद्यंतवदादि कर्मज तसें आगामि कर्मालय ॥
पृथ्व्यादीक भुताधिकार वसती ऐशा शरीरास रे ॥
स्थूलोपाधि जिंवास धीरु वदती प्रारब्ध अंतीं सरे ॥ २८ ॥

जें कीं सूक्ष्म दशेंद्रियेंसह मनें धी पंचप्राणान्वित ॥
जीवा दुःखसुखास कारण असे जें कीं अपंचीकृत ॥
भूतां कार्यशरीर अन्य वदती जीवात्मया पंडित ॥
स्थूला आश्रय हें कळे अनुभवें ज्याच्या वियोगें मृत ॥ २९ ॥

मायारूप प्रधान कारण नये वाचे अनादी पर ॥
जे नानापरिणामशालि असतां तेणें रुपें नश्वर ॥
वाटे भिन्न जिवेंशरूपमतिनें जे कीं उपाधीभिदा ॥
त्यापासोन निजात्मभिन्न स्वरुपा जाणोन राहें सदा ॥ ३० ॥

जो अन्नादिक कोश त्यासम दिसे आत्मा तयासंगती ॥
जैसा स्फटिक शुद्धरूप असतां दूज्या सर्वे विकृती ॥
अज्ञां स्थूल तसा परंतु विदुषां कोशी असंगी दिसे ॥
वाक्यार्थी सुविचारितां गुरुसुतां अद्वैतता उल्लसे ॥ ३१ ॥

जाग्रत्स्वप्नसुषुप्तिरूप त्रिविधा वृत्ती स्वरूपीं दिसे ॥
ती वृत्तीः त्रिगुणात्मकी मति तिची आत्मस्वरूपीं नसे ॥
आत्मा नित्य शिवस्वरूपच असे एका अवस्थेप्रती ॥
दोघींचा व्यभिचार यास्तव मृषा सत्याद्वयीं शाश्वती ॥ ३२ ॥

देहेंद्रीय मना सुजीव सकलां अध्यास धीचा असे ॥
ती वृत्तीं तममूल लक्षण जिचें अज्ञत्व यावद्वसे ॥
तावद्दुःखद हा भवोद्भव तरी सत्वप्रधानामती ॥
स्वीकारूनि त्यजी तमास हर जा तेणें तुला सद्गती ॥ ३३ ॥

नेतीत्यादि प्रमाणयुक्त वचनें ज्यानें जगा वारिलें ॥
सम्यक् सत्व प्रधान शुद्ध हृदयें ज्ञानामृता स्वादिलें ॥
तेणं दृश्य समस्त त्यक्त करिजे जैसा तृषाक्रांत तो ॥
नारिंगादि फलें तदंतर रसां पीतो त्वचा टाकितो ॥ ३४ ॥

आत्मा नित्य असे कदापि न मरे जन्मा नये सर्वदा ॥
ज्यातें नाक्षय तें विवर्धन नसे तैसा नवा ना कदा ॥
जो सर्वातिशया निरस्त समची सर्वत्र सौख्यात्मक ॥
जो कीं स्वप्रभ प्रत्यगात्मस्वरुपें सत्याद्वयीं व्यापक ॥ ३५ ॥

जो एवंविध तो विकारि नसतां जो ज्ञानरूपीं सुखी ॥
तेथें दुःखमय प्रपंच दिसतो कां ऐक हो सन्मुखीं ॥
अज्ञानेंकरुनी शरीर हृदयीं अध्यासयोगें दिसे ॥
अज्ञानासि विरोधि शास्त्रजनित ज्ञानें लया जातसे ॥ ३६ ॥

भ्रांतीनें जरि अन्य वस्तु असतां अन्य स्थळीं भासत ॥
त्या अध्यास विपश्चित प्रवदती रज्वादिकीं दीसत ॥
जैसा सर्प तसेंच विश्व अवघें ईशस्वरूपीं दिसे ॥
आत्मज्ञानविना यथार्थच असे हें मूढ मानीतसे ॥ ३७ ॥

जो कीं सर्व विकल्पकारण अशां मायेविना केवळ ॥
जो आत्मा सम सर्वकारण विभू निर्द्वंद्व पूर्णाचळ ॥
चैतन्यात्मक त्या निरामयरुपीं ब्रह्मीं अहंकार रे ॥
मायाकल्पित जो स्फुरे प्रथम तो अध्यास तूं जाण रे ॥ ३८ ॥

इच्छादीक सुखादि धर्मिक तशा रागादि धर्मान्वित ॥
ऐशा बुद्धि प्रपंचकारण सदा साक्षी परात्म्याप्रत ॥
जेव्हां धी सुखदुःख भासति तदा धीचे लयानंतर ॥
आत्माराम सुखी अशा अनुभवें निश्चीयला ईश्वर ॥ ३९ ॥

मायोद्भूत अनादि शक्ति दुसरी ऐशा अविद्योद्भुत ॥
जी धी तत्प्रतिबिंब जीव वदती जो चित्प्रकाशान्वित ॥
आत्मा धीहुनि भिन्नरूपचि असे साक्षीत्वरूपें महान् ॥
अंतर्यामिं असंगरूप परि तो बुध्यापरिच्छिन्न हा ॥ ४० ॥

चिद्बिंबासह इंद्रियें मन मती अंतःपरात्मा तया ॥
सर्वासंग अतीशयेंकरुनि तो अध्यास जाणे जया ॥
दृष्टांताऽनलतप्त लोहसम जें एकत्र वासास्तव ॥
दृश्या ज्ञानपणा जिवा जडपणा भासे भ्रमें वास्तव ॥ ४१ ॥

श्रीदैशीकमुखेंकरूनि निगमा सूत्र स्मृती आगमा ॥
तद्वाक्यश्रवणें तदर्थ मननें संजात विद्याप्रमा ॥
तद्वान्स्वात्मरुपा उपाधिरहिता आत्मस्थ सर्वोत्तमा ॥
जाणोनी निरसी अशेष जड हें नाशोनियां हृत्तमा ॥ ४२ ॥

आत्मा शुद्ध सदा निरामयरुपी मी स्वप्रकाशात्मक ॥
भासे स्वीय प्रभे प्रकाशपर जें माझेनि तें भासक ॥
मी मायामलहीन निर्मल असें अद्वैत मी अक्रिय ॥
मी विज्ञानघन प्रसिद्ध अज मी संपूर्ण सौख्यालय ॥ ४३ ॥

आत्मा मुक्त सदैव मीं स्ववश जो स्वाचिंत्य शक्ती असा ॥
स्वीयातींद्रिय ज्ञानशक्तियुत जो अज्ञेय वाङ्मानसा ॥
जो कीं नित्य अनंत अक्रिय असे सच्चित्सुखा आलय ॥
ऐसा नित्य हृदीं विभावित बुधीं तो मी असें अद्वय ॥ ४४ ॥

उक्तात्मींच अखंड चित्त धरिलें ऐशा विवेकी नरा ॥
जी कां निर्मल भावना स्वमतिची वृत्ती उठे अंतरा ॥
ब्रह्मासीत्यपरोक्षरूपचि असी विद्या अविद्या हरी ॥
दे देहांतरकर्म त्यांसह जसी रोगास मात्रा हरी ॥ ४५ ॥

एकांतीं वसला निवृत्तविषयीं जो जिंकुनी अंतर ॥
जो विज्ञान दृगात्मसंस्थित असे ज्यातें न अर्थांतर ॥
ज्ञानावांचुन अन्य साधन नसे मोक्षा अशा निश्चयें ॥
ज्ञाता केवल एक आत्मस्वरुपा ध्यातो विशुद्धाशयें ॥ ४६ ॥

जें हें भूतभविष्य वर्तत असे आत्मीयज्ञानें दिसे ॥
सारें विश्व परात्म कारण रुपीं जो लोपुनी ध्यातसे ॥
वाह्याभ्यंतर दृश्य जाणत नही सर्वत्र ज्या दर्शन ॥
ब्रह्माचें परिपूर्ण रूपचि असा राहे गुरूनंदन ॥ ४७ ॥

सारें विश्वसमाधिपूर्व नर जो ओंकाररूपीं असे ॥
जाणोनी जग वाच्य वाचकतया ओंकार आहे तसें ॥
ब्रह्माकार समाधिलक्षण तरी सर्वार्थ व्यासंग तो ॥
जेणें व्यावृत तो समाधि म्हणुनी पूर्वीं तसें भावितो ॥ ४८ ॥

ओंकारांत अकार विश्ववचनें साक्षी विराट् जागृती ॥
साक्षी तैजस हा उकार वदती हीरण्यगर्भाकृती ॥
स्वप्नीं, प्राज्ञमकार संज्ञक असा साक्षी सुपुप्तीगत ॥
तो अव्याकृतरूप भावित असे पूर्वी समाधिस्थित ॥ ४९ ॥

नानात्वें बहुधा व्यवस्थित अशा भिन्नाकृती विकृती ॥
स्थूलाचा अभिमान वाहत असा जो जागृतीचा पती ॥
नानारूप अकार विश्वपुरुपा कीजे उकारीं लय ॥
तैसें तैजस या उकारपुरुपा कीजे मकारीं लय ॥ ५० ॥

उक्त प्राज्ञ मकार चिद्घनरुपी पूर्णाद्वयीं भाविजे ॥
सोहं ब्रह्म सदा विमुक्तमत तो विज्ञान द्दग्बोलिजे ॥
जो कीं मुक्त उपाधि निर्मल असे तूर्यार्धमात्रागत ॥
हाऽहंकार विशुद्धसाधन असे जीवात्मज्ञानाग्रत ॥ ५१ ॥

ऐसी जात सदा परात्मविपयीं जो भावनाशुद्ध तो ॥
स्वानंदीं परितुष्ट बाह्यविषयां सर्वां परावृत्त तो ॥
साक्षी नित्य सुखप्रकाशस्वरुपीं राहे जिवन्मुक्त तो ॥
जैसा सिंधु स्थिरोदकें अचल रे स्वात्मस्थितीयुक्त तो ॥ ५२ ॥

जो कीं नित्य समाधिनिष्ठ विपयां सर्वेंद्रियां कर्पुन ॥
कामादीक रिपू विनिर्जित असा मातें सदा भावुन ॥
पड्गूणात्मविभू वशीकृत असा मी दृश्य होतों तया ॥
मद्भक्ता विमुखा न सक्तपुरुपा बाह्यार्थ भोगावया ॥ ५३ ॥

ऐशी भावुन आत्मता अनुदिनीं राहे मुनी सर्वदा ॥
जो कीं मुक्त समस्त बंधन असा प्रारब्धभोगी कदा ॥
नाहीं ज्या अभिमान वर्तत जगीं ना ग्राह्य अग्राह्य रे ॥
साक्षात् शुद्ध मनीं उदास नर तो माझे स्वरूपीं विरे ॥ ५४ ॥

आद्यंतीं भय शोक कारण असे मध्यें तसा दुःखद ॥
हा संसार असार जाणुनि तसें विध्युक्त ना सौख्यद ॥
पुण्य क्षीण क्षणीं जिवा पतन त्या कर्मा त्यजूनी सदा ॥
जो मी सर्व जिवांतरीं स्थित अशा आत्म्या भजे सर्वदा ॥ ५५ ॥

हें सारें जग आत्मरूपचि असे जेव्हां विभावीतसे ॥
तेव्हां सर्व परात्मरूपचि तदा नानात्वधी ही नसे ॥
जैसें सिंधुमध्यें प्रविष्ट जल तें सिंधूच दुग्धीं तसें ॥
दुग्ध व्योम नभीं समीर समिरीं एकात्मता उल्लसे ॥ ५६ ॥
ऐसे जागत लोक संस्थित जगीं सारे मृपा भावित ॥
जे कीं वेदप्रमाण युक्ति करुनी मिथ्यारुपें बोधित ॥
इंदुद्वंद्व दिसे भ्रमेंकरुनी तें ज्ञानें जसें बाधित ॥
किंवा दिग्भ्रमबाध तेविं स्वरुपीं नानात्व हें लोपत ॥ ५७ ॥
यावद्विश्वविवर्तमद्रुप असा साक्षात् न जो पाहत ॥
श्रद्धापूर्वक तोंवरी मम सदा आराधनीं वर्तत ॥
ज्या भक्त्यातिशयें प्रपूज्य मतिनें मद्भक्त हें लक्षण ॥
होतों मी हृदयीं अहर्निशीं तयां प्रत्यक्ष नारायण ॥ ५८ ॥
वेदांचें अतिसार गुह्य तुज मी सांगीतलें निर्णित ॥
त्याचा अर्थविचार नित्य करितां जो मुक्तता पावत ॥
पापापासुनि तत्क्षणींच नर तो माझ्या कृपें लक्ष्मण ॥
सर्वां श्रेष्ठ अवाप्तकाम श्रवणें गीतार्थसंभाषण ॥ ५९ ॥
भ्रात्या हें परिदृश्यमान जग तूं माया असे जाणत ॥
चित्तोदासपणेंचि त्यक्त असुनी मद्भावनाभावित ॥
तेणें मानस शुद्ध मत्पर सदा राहे पुन्हा बोलत ॥
आशीर्वाद सुखी निरामय असा श्रीराम छात्राप्रत ॥ ६० ॥
मातें प्राकृत सत्वराजसतमावांचोन जो निर्गुण ॥
सत्यज्ञानअनंदरूप स्वरुपा सर्वात्मना लक्षुन ॥
सेवी जो अथवा सगूणस्वरुपा तो मी असें तो नर ॥
लोकां पूत करी स्विया पदरजें स्पर्शें जसा भास्कर ॥ ६१ ॥
विज्ञानश्रुतिसार एक तुज हें वेदांत वेद्यांबुजें ॥
जें मी गीत तया करीं पठन तें मद्रूपता पाविजे ॥
आहे ज्या निजदेशिकीं मम वचीं विश्वास श्रद्धा जरी ॥
तेव्हां मद्रुप हें यथार्थ समजे साकल्यता ती खरी ॥ ६२ ॥

इति श्रीरामगीता समाप्त ॥

धाता भूपती रंक हे सम जया ऐसा कवी वामन ॥
कोणा भीड न पक्षपात दुसऱ्या स्वीया परा लागुन ॥
तेणें राघवभक्त हेतुरचना श्रीरामगीता टिका ॥
आठ्ठांशांवर पंच अब्दिं कृत ही जी भाविकां वाटिका ॥ ६३ ॥
श्रीमद्राघव दत्त मौनिचरणां वंदोनियां सादर ॥
शब्दें प्राकृतश्लोकरूप रचिली श्रीरामगीतेवर ॥
टीका संसृतिरोगग्रस्तपुरुषां ज्ञानामृताची बरी ॥
चौसष्टी समजोनि भाविक नरें स्वीकारिजे अंतरीं ॥ ६४ ॥

इति श्रीवामनकविकृत श्रीरामगीताटीका समाप्ता ॥ १ ॥

॥ श्री ॥

# अथ श्रुतिस्तुतिप्रारंभः ।

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगंगारघुवीराय नमः ॥

॥ श्लोक ॥

प्रथम श्रीगणनाथ रघूत्तमा । अवधुत स्वरुपा मुनिसत्तमा ॥
स्मरुनियां रघुनाथ गुरूगुरू । स्वगुरु मौनिपदा कथना करूं ॥ १ ॥
पूर्वाध्यायीं प्रभूनें जनक व श्रुतदेवांस तत्वोपदेशीं ॥
वेदें निर्गूण ब्रह्म अवगति वदुनी जात जो द्वारकेसीं ॥
येथें शंका असी कीं अविषय स्वरुपीं वाङ्मना गोचरत्व ॥
साक्षाद्ब्रह्मीं कसें जें जनिं मत निगमा ईश्वरा बोधकत्व ॥ २ ॥

श्रीशुक उवाच ।

हे राजा प्रभुनें चतुर्विध पुरुषार्थांस संपादना ॥
बुद्धींद्रिय मनादि साधन नरा उत्पन्न केलें किं ना ॥
तात्पर्यें वदतों गुणा नभि भुतां सर्वज्ञ सर्वेश्वरा ॥
मायेशा सगुणा श्रुतीविषय तो जो पूज्य देवां नरां ॥ ३ ॥
साक्षाद्वेद उपाधित्याग वदतां निर्गूण बोधा करी ॥
ऐसा शिष्ट अनादिमार्ग असतां संदेह ना तूं धरीं ॥
ऐशी ब्रह्मपरा सदूपनिषदा श्रद्धे धरी जो मनीं ॥
सद्बोधें गुरुच्या परंपदगती पावे कृती तो मुनी ॥ ४ ॥
अत्रार्थीं इतिहास ऐक बरवा नारायणा नारदा ॥
संवादा तुजलागिं सांगत असें श्रीनारदू एकदा ॥
आले चालत आश्रमीं बदरिका नारायणा दर्शना ॥
जे कीं भारतवर्षिं सर्व मनुजां कल्याण तद्रक्षणा ॥ ५ ॥
कल्पापासुनि जैं तपा अचरिती जावोन तैं नारद ॥
जे कीं श्रेष्ठ मुनीसहीत बसले त्या पूसती मोक्षद ॥
पूर्वीं हा तरि ब्रह्मवाद सनकादीकीं जसा ऐकिला ॥
तो हा सांप्रत नारदास मुनिनें श्रुत्यर्थ आरंभिला ॥ ६ ॥

## श्रीनारायण उवाच ।

जाले नारद ब्रह्मसत्र सकलां पूर्वीं तदा तुम्हि हो ॥
देखाया अनिरुद्ध ईशभगवान् श्वेतद्विपां जात हो ॥
ज्ञात्यांचा जयिं ब्रह्मवाद असतां तेथें तुम्हां प्रश्न हा ॥
जो आतां पुसतां प्रवर्तत तयीं झाला जणों लोकिं हा ॥ ७ ॥
जे सारे अरि मित्र मध्यम असे तुल्यांत एका जना ॥
वक्त्यांतें करुनी सुप्रश्न करिती ते आत्मभूनंदनां ॥

## सनंदन उवाच ।

हें सारें जग ईशनिर्मित असे संहारशक्ती तया ॥
नाहींसें करुनी स्वशक्तिसह जो निद्रिस्थ होतां जया ॥ ८ ॥
कल्पांतीं प्रथम स्वभावसमयीं निःश्वास भूतां श्रुती ॥
सत्यादीक गुणेंकरूनि प्रभुतें प्रार्थोनियां बोधिती ॥
जेवीं निद्रित सार्वभौम उपसीं येवोनि बंदीजन ॥
त्यातें उत्तम कीर्तियुक्त स्तवनें बोधीत निद्रेंतुन ॥ ९ ॥
प्रथम श्लोक तयाप्रति पाहुन । विशद भाव अभारुप घेउन ॥
गृहित अर्थ श्रुतिस्तवना करूं । सुमन प्राकृत यास्तव आदरूं ॥ १० ॥

## श्रुतय ऊचुः ।

जयजयाजितही उभया जिवा। घटक दोष अजाजहि माधवा ॥
अखिल शक्त्यवबोधक तूं तुला । सगुण वर्णुन वेद मुकावला ॥ ११ ॥
अनल इंद्र जगा जरि नायक । तरि तयां तुंच कारण पालक ॥
सकल ब्रह्मरुपें अजवर्णना । अवधि तूं जगविग्रह सन्मना ॥ १२ ॥

## क्षेपक अंगभूत श्लोक

उचलिलें पद तें अवनीं पडे। तव कृपें तव ऐक्य जिवां घडे ॥
मनवचाचरितां त्वयिं धारिती । ऋपि तव स्वरूपा प्रति पावती ॥ १ ॥

---

अखिल लोकमलघ्नकथाश्रयें । सुमन स्वीय अघा सुटती भयें ॥
भवभयें वितरागि तवाश्रयें । सुख न पावति कां स्वरुपान्वयें ॥ १३ ॥
तवपदा विमुखा जगणें कसें । इतयश्वास जसें मनुजा तसें ॥
तव अनुग्रह ते अहमादिक । जनक तूं सम पूर्ण प्रकाशक ॥ १४ ॥

किति तुम्हां उदरस्थ उपासिती । हृदय सूक्ष्म रुपारुण पाहती ॥
परमधाम सुपुम्न शिराप्रती ॥ सुमन पावति त्यां नहि दुर्गती ॥ १५ ॥
तवविनिर्मित योनि तदाप्रती। अनलवत् प्रतिदेहिं तुझी गती ॥
वितथ ते परि सत्यरुपाप्रती । विरजधी सम ब्रह्मचि जाणती ॥ १६ ॥
स्वकृत ज्यां पुरि त्यांप्रति व्यापक। पुरुप अंश तुझा अवभासक ॥
सुकृतक्षेत्र असें वदती कवी । भवनिवर्तक पाय तुझे भुर्वी ॥ १७ ॥
विकट आत्मरुपा समजावया । त्वदिय श्रीचरितांबुधि न्हावया ॥
उचित ते अपवर्ग न इच्छिती । सुपद हंसकुला मत जे यती ॥ १८ ॥
त्वदनुवर्ति शरीर असें यदा । अधिन आत्मसुहृत्प्रियवत्सदा ॥
सतत आत्महिता प्रिय सन्मुख । त्वयिं कसें रमती न वहिर्मुख ॥ १९ ॥
यमित प्राणमनेंद्रिय सर्वदा । मुनि उपासति जे तुझिया पदां ॥
अरिभयें वधु कामश्रुती स्मरे । सकल तूं सम उद्धरसी खरें ॥ २० ॥
अवर जीव तवाग्रसरा दुजा । विषय कोण करील जया अजा ॥
उपज त्यां जनिं सर्वभुतां नुरे । प्रलयिं शास्त्रहि वास्तव भक्ति रे ॥ २१ ॥
कितिक भेद जिवा तव मानिती । मृति सता असतां जनिं बोलती ॥
विपणकर्मफला उपदेशिती । स्वमतभ्रांत गुरूपर श्रीपती ॥ २२ ॥
असत विश्वसतासम भासते । मनच हें पुरुषासह कल्पितें ॥
जसि न हेम कटा पृथगाकृती । सकल ब्रह्मरुपें सम तूं भुतीं ॥ २३ ॥
अखिल सत्व गृहां तव सेविती । न गणुनी पद मृत्यु शिराप्रती ॥
धृत असे भवमुक्त सुपूततें । तव वचें भ्रम पावती बद्धते ॥ २४ ॥
अखिल कारक शक्ति धरा भगा । असति इंद्रियहीन स्वरा उगा ॥
बलि अजासह देव तवार्पिती । अधिकृता भयदा सम भूपती ॥ २५ ॥
तव अजा उभयां विहरे जिवां । उपज कर्म त्वदीक्षण जेधवां ॥
तुज असंग नभासम त्याप्रती । अविपया पर ना पर या भुतीं ॥ २६ ॥
ध्रुव अनंत विभू जरि हें असें । सम जिवा तव शासनता नसे ॥
जरि तया त्वदुपाधिकृता जनीं । परनियामक नेणति ते मुनी ॥ २७ ॥
प्रकृतिपूरुप हे नहिं जन्मता । प्रकृतिपूरुष यां उभयान्विता ॥
जनिं जिवा जल बुद्बुदवच्चय । मधुरसा सरिदार्णव वल्लय ॥ २८ ॥

भ्रमति जीव अजेनी तुझ्या असें । मुनिजनां म्हणुनीच तुझें पिसें ॥
त्वदनुभक्त तयां भय हें नसे । भृकुटि कालरुपें विमुखा असे ॥ २९ ॥
अज जितेंद्रिय वायु असा जन । चपल अश्व तसें अकळी मन ॥
गुरुपदाश्रयवीण श्रमा करी । अकृतकर्णधरा वणिजापरी ॥ ३० ॥
सुखनिधी असतां मनुजा तुं रे । विषय तुच्छ तया फळ काय रे ॥
सत न जाणत स्त्रीसुख भोगितां । कवण अर्थ सुखप्रद तत्वतां ॥ ३१ ॥
विमद ते मुनि तीर्थहि सेविती । निगमतत्व परस्पर बोलती ॥
सकृतत्वन्मुख तें गृह नेच्छिती । त्वयिं सदा रत निस्पृह ते किती ॥ ३२ ॥
जनिं सता म्हणुनी जग सत्य हो । नसत तर्कहत व्यभिचारि हो ॥
जगमृषा जरि सत्य नसे तरी । भ्रमविकर्म जडा तव वैखरी ॥ ३३ ॥
जग न पूर्व लयीं जग हें नसे । मधिं तुझे स्वरुपींहि मृषा दिसे ॥
द्रविण जाति विकल्पपथें श्रुतीं । वितथ विश्व वदे सत दुर्मती ॥ ३४ ॥
अज अजें करुनी जिव जेधवां । निज असे अलिंगित तैं भवा ॥
भजति मृत्यु न तद्वश तूं स्वता । अहित्वचेपरि लिप्त न तत्वता ॥ ३५ ॥
जरि न कामजटा यति मुंडिती । तरि तुं दुर्लभ ज्या मुनि धुंडिती ॥
अस्मृतकंठमण्यासम चूकती । असुतृपा इह ना परसद्गती ॥ ३६ ॥
सगुणतज्ञचि ते भवदुत्थती । निजसुखें सुखदुःख न जाणती ॥
विधिनिषेधपरा वच नेणती । तुंचि तयां अपवर्गरुपा गती ॥ ३७ ॥
अमर वेद तवान्त न पावले । तव विभो तव अंत न आपुले ॥
स्वविहिता शशश्रृंग न जाणत । हनि न अंड त्वयीं खरजा भुत ॥ ३८ ॥

## श्रीभगवानुवाच ॥

ऐसे नारद ब्रह्मपुत्र अवघे आत्मस्वरूप श्रुत ॥
जाणे आत्मगती सनंदन तया पूजोनि सत्कारित ॥
हें ऐसें निगमागमोपनिषदां तात्पर्य सर्वां असें ॥
पूर्वीं ब्रह्मऋषी तिहीं मथित हें सिद्धामृतान्नें जसें ॥ ३९ ॥
कामा भर्जन आत्मतत्वचि नरा पृथ्वींत संचारुनी ॥
राहे स्वीयहृदिं तदुक्तकथनां धारोन विश्वासुनी ॥

## श्रीशुक उवाच ॥

ऐकोनी कृतकृत्य नारद असा आत्मप्रभे शोभतो ॥
प्रेमानें ऋपिशासना गृहित जो नारायणा बोलतो ॥ ४० ॥

## नारद उवाच ॥

भूतांतें अपवर्ग इच्छुनि प्रभू नाना कलाधारि तो ॥
तूंचि कृष्णस्वरूपधारि अमला तूतें नमस्कारितों ॥
ऐसें भाषण नारदें करुनियां वंदूनि नारायणा ॥
पश्चान्नारद तेथुनि निघुनियां गेले सुव्यासायणा ॥ ४१ ॥
व्यासानें नमनादरा करुनि तैं सत्कारिलें नारदा ॥
त्यांनीं आद्य ऋषीमुखें श्रुत तया सांगीतलें सौख्यदा ॥
त्वत्प्रश्नासम वर्णिलें तरि अतां निर्गूण ब्रह्मास्तव ॥
सारा वेद वदे गुणासह इशा वोलों नये वास्तव ॥ ४२ ॥
विग्रहास घे ईश त्यांप्रती ॥ निर्गुणावधी वर्णिती श्रुती ॥
नेति नेतिनें विश्व बाधिती ॥ सत्यरूपिं त्या अंत पावती ॥ ४३ ॥
विश्वालोचक आदि मध्य निधनीं जो शक्ति जीवेश्वर ॥
जो या लिंगपुरा प्रवेशुनि जिवा देहा करी नंतर ॥
शास्ता ज्याप्रत जीव पाउनि अजा निद्रिस्थ देहापरी ॥
टाकी मुक्त निरस्त योनि अभयीं ध्यावा सदा तो हरी ॥ ४४ ॥
अतत व्यावृतिनें तुज बोधिती । निधनरूप अशा फळती श्रुती ॥
अवधि तूंचि अजासह वर्णना । शरण वामन उद्धरि चिद्धना ॥ ४५ ॥

इति श्रीमद्भागवत दशमस्कंधस्थ सप्ताशीतितम अध्यायस्थित श्रुतिस्तवनं समाप्तं ॥ ८७ ॥

वेदस्तुति समाप्ता ॥

नारायणात्मज वामनेन कृतं ॥ मिति ज्येष्ठ शु॥ २ गुरुवार शके १८०५
श्रीराम समर्थ ॥ श्रीमौनिनाथ समर्थ ॥

॥ श्री ॥

# अथ षट्पदिस्तोत्रप्रारंभः ।

॥ आर्या ॥

अविनय घालवि विष्णो, दमवि मना शमवि विषयमृगतृष्णा ॥
भूतदया विस्तारीं, तारीं संसारसागरीं कृष्णा ॥ १ ॥
गंगा ही मद ज्याची, वास जया भोग सच्चिदानंदें ॥
श्रीपतिपदारविंदा, भवभयखेदा विनाशका वंदें ॥ २ ॥
गतभेदही जरी मी, नाथ तुझा दास मी तुला नमितों ॥
होय तरंग समुद्रा, काय तरंगा समुद्र होइल तो ॥ ३ ॥
गोवर्धनधृत वामन, दैत्यारी चंद्र अर्यमा नयन ॥
तूं ते जाणत असतां, सुख जनिं त्या कां भवां नव्हे शमन ॥ ४ ॥
मत्स्यादिकअवतारीं, विविधा रक्षुनि पुन्हां समग्र मही ॥
रक्षिसि प्रभुत्वशालित, मी त्वद्भवताप भीत काम अही ॥ ५ ॥
दामोदरगुणमंदिर सुंदरवदनारविंद गोविंद ॥
हे भवनिधिमिथ्नंदर, मम दर दुर कर दुरंतकृत भेद ॥ ६ ॥
नारायण करुणालय, आश्रयकृत मी तुझेचि पदकमला ॥
ऐशी षट्पदि माझे, देवा राहो सदा वदनकमला ॥ ७ ॥
पुण्यश्लोका आर्या, वंदुन त्वत्पाद शंकराचार्या ॥
षट्पदि भा तव सूर्या, प्रतिभा आर्या स्वबोधना कार्या ॥ ८ ॥
वाचे अमोघवीर्या, जगदुद्धारार्थ शंकराचार्या ॥
विग्रह तव पदचर्या, दुर्लभ सुरवरसमार्यमा आर्या ॥ ९ ॥
वेदार्थस्फुटकार्या या, जगिं अवतार शंकराचार्या ॥
तत्कृत आर्या ग्रंथें, तोषचि पाहुनि तदर्थ सौंदर्या ॥ १० ॥
स्फुटकृत नवनव आर्या, प्राकृत आर्या प्रबोधसौकर्या ॥
श्रीराम मौनिवर्या, वचनसपर्या हि वामनाचार्या ॥ ११ ॥

इति श्रीमच्छंकराचार्यविरचित षट्पदी स्तोत्र भाषांतर
आर्या वामनकृत समाप्तः ॥

ग्रं. क्र. ९३४२

॥ श्री ॥

# अथ निर्गुण परा पूजा ।

॥ श्लोक ॥

आत्मा ब्रह्मचि पूर्ण देव असतां सच्चित्परानंद जो ॥
त्या ठायीं नर भिन्न बुद्धि करुनी साकार मूर्तीस जो ॥
मानी वेद तया भयत्व वदतो देवा पशूतुल्य तो ॥
आत्मा आपण एक सिद्ध असुनी भेदा कसा कल्पितो ॥ १ ॥
आत्मा पूर्ण तया अवाहन कसें द्यावें कसें आसन ॥
सर्वाधार तयासि स्वच्छ रुप त्या पाद्यार्थ प्रक्षाळन ॥
शुद्धा आचमना कसें तदुपरी स्नानें कसीं निर्मला ॥
जो विश्वोदर देव वस्त्रचि कसें अच्छादना त्याजला ॥ २ ॥

निरालंब त्या यज्ञसूत्रा कसें रे । कसा चंदना लेप निर्लेपका रे ॥
सदाऽवासकामाऽक्षता तांदुळासी । समर्पूं कसें फूल निर्वासनासी ॥ ३ ॥
अलंकार कैसे सदा रम्य त्यासी । निरीहा कसें द्रव्य अर्पूं सुवासी ॥
निराकार नीरंजना ईश्वरासी । कसें धूपदीपादि अर्पूं तयासी ॥ ४ ॥
तृप्तासि नैवेद्यहि तांबुलें तसीं । बा दक्षिणाऽनंत प्रदक्षिणा कसीं ॥
नित्याद्वयातें नमना करूं कसें । वेदा अवेद्या न तया स्तुती वसे ॥ ५ ॥
नीराजनें कायचि चित्प्रकाशा । नोद्वासनं व्यापक पूर्ण ईशा ॥
ब्रह्मात्मविद्वामन एक देवें । पूजा परा भावित एकभावें ॥ ६ ॥

॥ इति श्रीमच्छंकराचार्यविरचित परापूजा प्राकृत भाषांतरं
श्रीमौनीशिष्यवामनकृतं समाप्तं ॥ १ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १३४२
REFBK-0001342
REFBK-0001342

